सोलापूर

# तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा


छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर बुधवार, दि. २५ जून २०२५ वर्ष - तिसरे अंक ८३ पाने : ८ किंमत रु. ६/-

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## इस्रायलने शस्त्रसंधीचे उल्लंघन केल्याने ट्रम्प प्रचंड नाराज

वॉशिंगटन , २४ जून - इराण-इस्रायलयुद्धात सीझफायर झालेले असताना इस्रायलने शस्त्रसंधीचे उल्लंघन केले असून मी प्रचंड नाराज असल्याचे, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हणलं आहे.



सीझफायर लागल्या लागल्याच एवढा मोठा हल्ला करायला नको होता, असे ट्रम्प म्हणाले आहेत. ट्रम्प यांनी युद्धबंदीची घोषणा केल्यानंतर इस्रायलने इराणवर शस्त्रसंधीच्या उल्लंघनाचा आरोप केला होता. इराणने त्यापूर्वीच आपण हल्ला केला होता, असे सांगत हे आरोप फेटाळले होते. यानंतर इस्रायलने देखील इराणवर हल्ले चढविले आहेत. यामुळे आता ट्रम्प भडकले आहेत. इराणवर मी खूश नाहीय पण इस्रायलवर खूप नाराज असल्याचे ट्रम्प यांनी म्हटले आहे. इस्रायल, ते बॉम्ब टाकू नका. जर तुम्ही असे केले तर ते मोठे उल्लंघन आहे. तुमच्या वैमानिकांना ताबडतोब माघारी बोलवा असे ट्रम्प यांनी म्हटले आहे. युद्धविराम लागू झाल्यानंतर लगेचच हल्ला करण्याची कृती मला आवडलेली नाही, असे ट्रम्प यांनी म्हटले आहे. बीर शेवा शहरावर हल्ला झाला तेव्हा आम्ही इस्रायलवर शेवटची मिसाईल डागली होती. तेव्हा शस्त्रसंधीची घोषणा झाली नव्हती. आम्ही स्वसंरक्षणासाठी हा हल्ला केला होता. यानंतर एकही मिसाईल इस्रायलकडे गेलेली नाही, असे इराणने म्हटले आहे.

# भारतीयांचे रक्त सांडणाऱ्यांना माफ केले जाणार नाही - पंतप्रधान मोदी

नवी दिल्ली , २४ जून : भारतीयांचे रक्त सांडणाऱ्यांना माफ केले जाणार नाही. अशा दहशतवाद्यांसाठी जगात कुठेही ठिकाण सुरक्षित नाही आणि भविष्यातही सुरक्षित राहणार नाही, असा थेट आणि कठोर संदेश पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तानला दिला आहे. ते आज (दि.२४) नवी दिल्लीतील एका कार्यक्रमात बोलत होते. यावेळी पाकिस्तानला कडक इशारा देत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज(दि.२४) नवी दिल्लीत भारताचे दोन महान अध्यात्मिक व नैतिक नेते श्री नारायण गुरु आणि महात्मा गांधी यांच्यात झालेल्या ऐतिहासिक संवादाच्या शताब्दी समारोहाच्या उद्घाटन कार्यक्रमात सहभाग घेतला. या प्रसंगी पंतप्रधान मोदींनी दहशतवाद आणि दहशतवाद्यांना आश्रय देणाऱ्यांना स्पष्ट शब्दांत कठोर संदेश दिला.भारतीय नागरिकांना मारणाऱ्या दहशतवाद्यांना सोडले जाणार



नाही. दहशतवाद्यासाठी कोणतेही ठिकाण लपण्यासाठी सुरक्षित नसेल. दहशतवाद्यांना आणि त्यांना संरक्षण देणाऱ्या लोकांना कधीच माफ केले जाऊ शकत नाही. त्यांना सडेतोड उत्तर दिले जाईल.

भारताने ऑपरेशन सिंदूर राबवल्यानंतर पाकिस्तानने भारतावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. मात्र तो असफल ठरला. मात्र ऑपरेशन सिंदूर संपले नसल्याचे भारताने स्पष्ट केले आहे. पुन्हा असा हल्ला करणा-या कोणालाही सोडले जाणार नाही असा इशारच भारताने दिलेला आहे. पाकिस्तान दहशतवादाच्या मदतीने भारताविरुद्ध प्रॉक्सी वॉर खेळत आहे.

पाकिस्तानचे लष्कर प्रमुख असीम मुनिर यांनी चिथावणीखोर भाषण दिल्यानंतर भारताच्या पहलगाम येथे दहशतवाद्यांनी भीषण हल्ला केला होता. त्यात २६ पर्यटकांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. त्यानंतर भारताने अनेक आक्रमक भूमिका घेत पाकिस्तानची कोंडी केली आहे. तर ऑपरेशन सिंदूर राबवत पाकिस्तानमध्ये असणारे ९ पेक्षा जास्त दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी पुढे म्हणाले, देशाच्या विकासासाठी सामाजिक, आर्थिक, लष्करी ताकद या सर्वांमध्ये आपल्याला सशक्त व्हायचे आहे. आज देश याच मार्गावर पुढे जात आहे. भारताची ताकद काय आहे हे जगाने नुकतेच पाहिले आहे. दहशतवादाविरुद्ध भारताची असलेली आपली कठोर भूमिका भारताने जगासमोर स्पष्ट केली आहे.

## अजित डोवाल यांनी घेतली चिनी परराष्ट्र मंत्र्यांची भेट



बीजिंग, २४ जून - भारत आणि चीन यांच्यातील संघर्ष कमी करण्याच्या दिशेने दोन्ही देशांनी एक पाऊल पुढे टाकले आहे. भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनी चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी यांच्याशी बीजिंगमध्ये सोमवारी (दि.२३) भेट घेत चर्चा केली. या बैठकीत सीमावर्ती भागात शांतता, स्थिरता त्याशिवाय दहशतवादाच्या मुद्द्यावरही चर्चा झाली. तसेच दोन्ही देशाच्या हिताचे आणि विकासाला चालना देण्याच्या मुद्द्यावर या चर्चेत भर दिला गेला.

परराष्ट्र मंत्रालयाकडून दिलेल्या निवेदनात म्हटलंय की, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनी शांतता राखण्यासाठी दहशतवाद्यांचा ठोस सामना करण्याबाबत चर्चा केली. भारताने दहशतवादाचा मुद्दा अशावेळी उचलला आहे जेव्हा मागील काही महिन्यापासून भारत-पाकिस्तान संघर्षात चीनकडून पाकिस्तानला समर्थन मिळत आहे. २२ एप्रिल रोजी पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर ऑपरेशन सिंदूर हाती घेत भारताने पाकिस्तानातील ९ दहशतवादी ठिकाणांना टार्गेट केले. भारताच्या या कारवाईनंतर ४ दिवस पाकिस्तानसोबत संघर्ष सुरू होता. या संघर्षात १० मे रोजी दोन्ही देशांमध्ये युद्धविराम करण्यावर सहमती झाली. परंतु भारत-पाकिस्तान संघर्षात चीनकडून प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे पाकिस्तानला पाठिंबा मिळत असल्याचे दिसून आले होते.

## राहुल गांधींचे आरोप निराधार : फडणवीस

### 'झुठ बोले कौवा काटे' म्हणत दिले प्रत्युत्तर



मुंबई, २४ जून : काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या मतदारसंघात अवघ्या ५ महिन्यात ८ टक्के मतदार वाढल्याचा आरोप केला होता. त्याला मुख्यमंत्र्यांनी ट्विट करत सडेतोड प्रत्युत्तर दिले. झूठ बोले कौवा काटे, काले कौवे से डरियो, या म्हणीचा वापर करत मुख्यमंत्र्यांनी राहुल गांधींचे आरोप निराधार असल्याचे म्हंटले आहे.

राहुल गांधी यानी ट्विटरवरून (एक्स) केलेल्या आरोपांना फडणवीस यांनी ट्विटरवर उत्तर देताना फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्राच्या निवडणुकीतील पराभवाची सल राहुल गांधींना अजूनही बोचत असून, त्यातूनच ते मतदारवाढीबाबत निराधार आरोप करत आहेत. महाराष्ट्रात असे २५ पेक्षा जास्त मतदारसंघ आहेत, जिथे लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या दरम्यान ८ टक्क्यांपेक्षा जास्त मतदार वाढले आणि त्यातील अनेक ठिकाणी काँग्रेसला विजय मिळाल्याचे फडणवीस यांनी सांगितले. राज्यातील पश्चिम नागपूर मतदारसंघात ७ टक्के ( २७ हाजर ६५) मतदार वाढले असून तिथे काँग्रेसचे उमेदवार विकास ठाकरे विजयी झालेत. उत्तर नागपुर मतदारसंघातही ७ टक्के (२९ हजार ३४८) मतदार वाढले तिथे काँग्रेसचे नितीन राऊत जिंकलेत.

वडगाव शेरी (पुणे) : येथे तब्बल १० टक्के (५० हजार ९११) मतदार वाढले आणि शरद पवार गटाचे बापूसाहेब पठारे विजयी झाले. तसेच मुंबईतील मालाड पश्चिम मतदारसंघात ११ टक्के (३८ हजार ६२५) मतदार वाढले आणि काँग्रेसचे अस्लम शेख विजयी झाले. त्यासोबतच ठाणे जिल्ह्यातील मुंब्रा येथे ९ टक्के ( ४६ हजार ४१) मतदार वाढले तिथे शरद पवार गटाचे जितेंद्र आव्हाड विजयी झालेत ही उदाहरणे फडणवीस यांनी अधोरेखित केली.

महाराष्ट्रात वाट्याला दारुण पराभवामुळे तुमचे दुःख दिवसेंदिवस वाढत आहे हे मी मान्य करतो. पण तुम्ही किती काळ हवेत बाण सोडत राहणार ? असा टोला फडणवीस यांनी लगावला. तसेच राहुल गांधी यांनी बेताल आरोप करण्यापूर्वी अस्लम शेख, नितीन राऊत आणि विकास ठाकरेंसारख्या जुन्या सहकाऱ्यांशी एकदा बोलून घ्यायला हवे होते. परंतु, काँग्रेसमध्ये संवादाचा अभाव असून त्यामुळे असे वाईट प्रदर्शन झाल्याचा टोला फडणवीस यांनी लगावला.

## आषाढी वारी कालावधीत पंढरपूर शहर व विविध ठिकाणी दारु बंदीचे आदेश

सोलापूर, २४ जून - आषाढी एकादशी पंढरपूर यात्रा२०२५निमित्त पंढरपुर शहर व परिसरात सार्वजनिक शांतता राखणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमातील कलम१४२अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी खालील प्रमाणे मद्य विक्री व ताडी दुकाने बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. दिनांक०४जुलै२०२५ते दिनांक०७जुलै२०२५रोजी पंढरपूर शहरातील व पंढरपूर शहरापासून५कि.मी. त्रिज्या परिसरातील सर्व देशी विदेशी मद्य विक्री व ताडी दुकाने पूर्ण दिवस बंद राहतील.

दिनांक०९जुलै२०२५ व दिनांक१०जुलै२०२५ रोजी पंढरपूर शहरातील व पंढरपूर शहरापासून५कि.मी. त्रिज्या परिसरातील सर्व देशी व विदेशी मद्य विक्री व ताडी दुकाने सायंकाळी०५.००वाजेपासून बंद. तसेच आषाढी एकादशी पंढरपूर यात्रा२०२५निमित्त संत श्री तुकाराम महाराज व संत श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी मुक्कामाच्या ठिकाणी (गावात/शहरात) सार्वजनिक शांतता राखणेसाठी,खालील प्रमाणे मद्य विक्री व ताडी दुकाने बंद ठेवण्याचे आदेश देत आहे. सोमवार दि.३०जुन२०२५-नातेपुते पूर्ण दिवस बंद राहिल,मंगळवार दि.१जुलै२०२५माळशिरस,अकलुज पूर्ण दिवस बंद राहिल,बुधवार दि.२जुलै२०२५रोजी वेळापूर,बोरगांव,श्रीपूर,माळीनगर पूर्ण दिवस बंद राहिल. गुरुवार दि.३जुलै२०२५रोजी भंडीशेगाव,पिराची कुरोली पूर्ण दिवस बंद राहिल. शुक्रवार दि.४जुलै२०२५रोजी वाखरी पूर्ण दिवस बंद राहिल.

## इस्त्रायलहून मायदेशी परतले ५९४ भारतीय

नवी दिल्ली, २४ जून : इस्त्रायल आणि इराणमधील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर ऑपरेशन सिंधू अंतर्गत आज, मंगळवारी ५९४ भारतीयांना परत आणण्यात आले. हवाई दलाच्या ३ विमानाद्वारे या भारतीयांना परत आणले असून पहिल्या विमानात १६१, दुऱ्यामध्ये १६५ आणि तिसऱ्या विमानातून २६८ भारतीय नागरिक परतलेत.

केंद्रीय परराष्ट्र राज्यमंत्री (एमओएस) पवित्रा मार्गेरिटा आणि केंद्रीय राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन यांनी विमानतळावर भारतीय नागरिकांचे स्वागत केले. परदेशातील भारतीय नागरिकांची सुरक्षा ही सरकारची प्राथमिकता आहे, असे परराष्ट्र मंत्रालयाने म्हंटले आहे. याबाबत परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी ट्विट केले की ऑपरेशन सिंधूचा इस्रायल टप्पा २३ जून २०२५ रोजी सुरू झाला.



यामध्ये १६१ भारतीय नागरिकांची पहिली तुकडी जॉर्डनमधून मायदेशी परत आणण्यात आली. त्यानंतर, हवाई दलाच्या सी-१७ विमानाने इस्रायलमधून १६५ प्रवाशांना परत आणले. तसे आज, मंगळवारी दुपारी २६८ नागरिकांना घेऊन तिसरे विमान भारतात पोहोचले. मशहादहून नवी दिल्ली येथे पोहोचलेल्या एका विशेष विमानाने २९२ भारतीय नागरिकांना इराणमधून बाहेर काढण्यात आले. आतापर्यंत इराणमधून २२९५ भारतीय नागरिकांना परत आणण्यात आले आहे. पश्चिम आशियातील संघर्षग्रस्त भागात वाढलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, भारतीय हवाई दलाच्या सी-१७ विमानांनी जॉर्डन आणि इजिप्तमधून भारतीय नागरिक आणि मित्र देशांच्या नागरिकांना बाहेर काढण्यासाठी मोहिमा सुरू केल्या. आपल्या गरजूंना मदत करण्यासाठी भारतीय हवाई दल प्रथम प्रतिसाद देणारे म्हणून वचनबद्ध असल्याचे हवाई दलाने ट्विटर (एक्स) संदेशात म्हंटले आहे.

## राज्य महिला आयोगाच्या निर्देशाने संरक्षण अधिकाऱ्यांकडून तत्काळ कार्यवाही

पुणे, २४ जून - राज्य महिला आयोगाने शिफारस केलेल्या एका महत्वपूर्ण प्रकरणात वडगाव मावळ येथील संरक्षण अधिकारी प्रवीण नेहरकर यांनी तत्काळ कार्यवाही केल्यामुळे एका निराधार विधवा महिलेला आणि तिच्या अल्पवयीन मुलीला बेघर होण्यापासून दिलासा मिळाला.राज्य महिला आयोगाने वडगाव मावळच्या संरक्षण अधिकाऱ्यांकडेअतिशय संवेदनशील प्रकरण सोपविले. जिल्हा महिला बालविकास अधिकारी पुणे यांच्या कार्यालयातून या प्रकरणाच्या अनुषंगाने कागदपत्रे मिळाली. या प्रकरणातील पीडित महिलेच्या पतीचे सन २०२३ मध्ये निधन झाल्यामुळे ती आणि तिची अल्पवयीन मुलगी पूर्णपणे निराधार झाली. मावळ-मुळशी येथील उपविभागीय दंडाधिकाऱ्यांच्या एका आदेशामुळे पीडित महिला व मुलीला त्यांच्या राहत्या घरातून बाहेर जावे लागणार होते.कागदपत्रे मिळताच श्री. नेहरकर यांनी पीडित महिलेचा कौटुंबिक घटनेचा अहवाल (डीआयआर) तयार करुन मंगळवार १७ जून रोजी वडगाव मावळ न्यायालयात दाखल केला. वकिलाची अनुपस्थिती असतानाही श्री. नेहरकर यांनी स्वतः महिलेची बाजू अतिशय प्रभावीपणे मांडल्यामुळे आणि प्रकरणाची संवेदनशीलता लक्षात घेऊन न्यायालयाने त्याच दिवशी सायंकाळी ६ वाजेपर्यंत निवासाचा अंतरिम आदेश पारित केला.

## महानिर्मिती राज्यात उभारणार १०७१ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प : मुख्यमंत्री

मुंबई, २४ जून - पारंपरिक ऊर्जेवरील अवलंबित्व कमी करून कार्बन उत्सर्जन घटवून शेतक-यांना सिंचनासाठी दिवसा अखंडित वीजपुरवठा देवून शेतीची उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी शासन विविध योजना राबवित आहे. राज्यात शाश्वत विकासास चालना देण्यासाठी महानिर्मिती तर्फे १,०७१ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्प २.० अंतर्गत लवकरच कार्यान्वित होणार आहेत.या प्रकल्पांमुळे राज्यातील तीन लाख शेतकऱ्यांना लाभ होणार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

महानिर्मिती (महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी लि.)

महानिर्मिती ही म.रा.वि.मं. सूत्रधारी कंपनी मर्यादित या कंपनीची संपूर्ण मालकीची उपकंपनी असून, सुमारे १३,८८० मेगावॅट क्षमतेसह भारतातील सर्वात मोठ्या राज्य-नियंत्रित विद्युत उत्पादकांपैकी एक आहे. नॅशनल थर्मल पॉवर कंपनी नंतर ही देशातील दुसऱ्या क्रमांकाची राज्य मालकीची जनरेशन कंपनी आहे. औष्णिक, वायू, जल विद्युत आणि सौर असे ऊर्जा उत्पादन क्षेत्रात वैविध्य असलेली महानिर्मिती ही कंपनी नवीकरणीय ऊर्जेचे प्रकल्प सुरू करत आहे, ज्यामुळे वीज ग्राहकांना कमी दरात वीजपुरवठा करत कार्बन उत्सर्जनात घट होण्यास मदत होणार आहे.

जीईएपीपी इंडिया (ग्लोबल एनर्जी अलायन्स फॉर पीपल अँड प्लॅनेट

द रॉकफेलर फाउंडेशन , इकीया फांउडेशन आणि बेझॉज अर्थ फंड (इर्शी एरींह त्रींपव) यांच्या सहकार्याने स्थापन झालेली जीईएपीपी इंडिया (ग्लोबल एनर्जी अलायन्स फॉर पीपल अँड प्लॅनेट) ही संस्था विकसनशील देशांमध्ये न्याय्य, समतोल व वेगवान हरित ऊर्जेसाठी मदत करते. जीईएपीपी इंडिया ही जीईएपीपी एलएलसीची भारतीय शाखा असून, भारतात विशेषतः वितरणक्षम ऊर्जेसाठी उपयुक्त उपक्रमांची अंमलबजावणी करत आहे.

# सक्तीची कर्जवसुली व कर्जमाफीसाठी पुन्हा बच्चू कडू यांचा एल्गार

### आगामी ५ जुलै पासून 'सातबारा कोरा कोरा कोरा'यात्रा

अमरावती, २४ जून : शासनाच्या धोरणांमध्ये सातत्याने दुर्लक्षित राहिलेल्या शेतकरी, शेतमजूर, विधवा, दिव्यांग, बेरोजगार तरुण, ग्रामपंचायत कर्मचारी, मेंढपाळ, मच्छिमार आणि मागासवर्गीय घटकांच्या न्यायहक्कांसाठी बच्चू कडू यांच्या नेतृत्वात 'सातबारा कोरा करा' ही १३८ किलोमीटरची पदयात्रा ५ जुलै पासून सुरू होणार आहे. शेतकऱ्यांना जोपर्यंत सरकार न्याय देणार नाही तोपर्यंत आपण स्वस्थ बसणार नसल्याचा इशारा बच्चू कडू यांनी पत्रकार परिषदेतून दिला. डॉ. पंजाबराव देशमुख यांचे जन्मगाव पापळ येथून यात्रेला प्रारंभ होणार असून, चिलगव्हाण (साहेबराव करपे - पहिली शेतकरी आत्महत्या झालेल्या शेतकऱ्यांचे ग गाव) येथे या यात्रेचा समारोप होईल. ही यात्रा उंबरडा बाजार, बोदेगाव, दारव्हा, तिवरी, तूपटाकळी, काळी दौलत, गुंज या प्रमुख ठिकाणांवरून



मार्गक्रमण करणार असून एकूण सात दिवसांत १३८ किमी अंतर पार केले जाणार आहे. ही यात्रा केवळ एका राजकीय व्यक्तीची नसून, ती शेतकरी व कष्टकरी जनतेच्या हक्कांसाठीची लोकचळवळ आहे. सक्तीची कर्जवसुली थांबवणे आणि तात्काळ कर्जमाफी लागू करणे या प्रमुख मागण्यांवर ही यात्रा केंद्रित असणार आहे. दरम्यान प्रत्येक ठिकाणी सभा, संवाद व स्थानिक अडचणी समजून घेण्यासाठी थांबे घेतले जातील. यात्रेदरम्यान शेतकरी आत्महत्यांना आळा घालणारी धोरणं लागू करणे, विधवा व अपंगांसाठी रोजगार व सुरक्षा योजनांची अंमलबजावणी करणे, मनरेगा अंतर्गत पेरणी ते कापणीपर्यंतच्या कामांचा विस्तार व मजुरीत वाढ करणे आणि तरुणांसाठी शिक्षण व स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करणे यासारख्या मागण्या मांडण्यात येणार आहेत. यासंदर्भात बच्चू कडू म्हणाले की, बेमुदत अन्नत्याग आंदोलनात लाखो शेतकरी मला पाठिंबा देण्यासाठी आले होते. आता मी शेतकऱ्यांच्या भेटीसाठी त्यांच्या गावीच चालत जाणार आहे. ही यात्रा तुमच्यासाठी, तुमच्या पोटासाठी, मुलांच्या शिक्षणासाठी आणि कुटुंबाच्या अस्तित्वासाठी आहे. पक्ष, जात, धर्म बाजूला ठेवून एकत्र या. मतदान कोणालाही करा, पण कष्टकरी माणसासाठी एकत्र या असे आवाहन त्यांनी केले.

# महाराष्ट्र विधिमंडळाचा इतिहास प्रेरणादायी - राज्यपाल

मुंबई, २४ जून (हिं.स.)। देशाच्या विकासात अंदाज समिती, वित्तीय समित्यांची महत्वपूर्ण भूमिका असून सुशासनात पारदर्शकतेच आणि उत्तरदायित्वाचा कणा आहेत. महाराष्ट्र विधिमंडळाचा इतिहास गौरवशाली आणि प्रेरणादायी राहिला आहे. महाराष्ट्राने देशाला अनेक कल्पक योजना दिल्या आहेत.असे गौरवोद्गार राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी काढले.

संसदेतील व सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांतील अंदाज समित्यांच्या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचा समारोप राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या उपस्थितीत झाला.याप्रसंगी राज्यसभा उपसभापती श्री. हरिवंश,अंदाज समितीचे अध्यक्ष डॉ. संजय जैसवाल, विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, महाराष्ट्र विधानमंडळाच्या समितीचे अध्यक्ष अर्जुन खोतकर, विधानपरिषद विरोधीपक्षनेते अंबादास दानवे संसद आणि सर्व राज्ये/संघ राज्य क्षेत्रांच्या प्राक्कलन समित्यांचे अध्यक्ष व सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळाचे सदस्य आणि इतर मान्यवर उपस्थित होते. राज्यपाल श्री.राधाकृष्णन



म्हणाले की, महाराष्ट्र ही भक्ती, शक्ती आणि प्रगतीची भूमी आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची पायाभरणी केली. सन१९७० मध्ये महाराष्ट्राने रोजगार हमी योजना सुरू केली ती देशाने स्वीकारली. सरकारी खर्चाचे नियोजन, कार्यक्षमतेचे मूल्यमापन आणि धोरणात्मक सुधारणा यामध्ये अंदाज समित्यांची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली आहे. भारताची जागतिक नेतृत्वाकडे वाटचाल सुरू असून हा अमृतकाळ महत्वपूर्ण ठरेल. असेही राज्यपाल राधाकृष्णन यांनी यावेळी सांगितले.

श्री.ओम बिर्ला म्हणाले, संसदीय समित्या वैधानिक यंत्रणा नाही तर छोटी संसद' म्हणून काम करतात. जनतेच्या पैशाचा नीट वापर होतो की नाही, यावर लक्ष ठेवतात. आर्थिक शिस्त, पारदर्शकता यासाठी समित्यांचे महत्त्व अधिक आहे. त्यासाठी जनतेचा सहभाग आणि भागीदारी महत्वाची आहे.. दोन दिवसीय परिषदेत देशभरातील सदस्यांनी विधानमंडळातील अनुभव सांगून विचारमंथनातून सामाजिक, आर्थिक योजनांच्या परिणामकारकतेचा आढावा घेतला बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात संसदीय समित्यांनी डेटा ॲनालिटिक्स, डीबीटी व आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर करून सार्वजनिक निधीच्या वापरावर देखरेख करावा आणि समित्यांचे कार्य अधिक प्रभावी करण्यासाठी प्रशिक्षणाचे आयोजन करावे.असेही त्यांनी यावेळी सांगितले.

उपसभापती हरिवंश सिंह म्हणाले, गेल्या दोन दिवसांत अंदाज समित्यांचे संमेलनामध्ये देशभरातून आलेले प्रतिनिधींनी अंदाज समित्यांच्या कार्यपद्धती, भविष्यातील जबाबदाऱ्या यावर सविस्तर चर्चा झाली. गेल्या ७५ वर्षांत या समित्यांनी पारदर्शकपणे कार्यकेले आहे. भारत एक प्रगतीशील राष्ट्र म्हणून प्रत्येक क्षेत्रात पुढे जात आहे. सन २०४७ पर्यंत विकसित भारताचे स्वप्न साकार करताना समित्यांचे योगदान महत्वपूर्ण आणि मार्गदर्शक ठरेल.

विरोधीपक्षनेते अंबादास दानवे म्हणाले, कार्यपालिका जर संसदीय समित्यांच्या शिफारशींवर योग्य वेळी कार्यवाही करत असेल, तरच या समित्या प्रभावी ठरतात. अन्यथा समित्यांच्या वेळेचा वाया जातो. विधानसभेच्या मंजुरीशिवाय कार्यपालिका पैसा खर्च करू शकत नाही. त्यामुळे अर्थसंकल्पाचा उपयोग योग्यठिकाणी होतोयका याचीखात्री करण्याचे काम प्राक्कलन समित्यांचे आहे. पूर्वी या समित्यांचे अधिकार मर्यादित होते, पण जनतेच्या उत्तरदायित्वामुळे त्यांचे क्षेत्र वाढले. महाराष्ट्रातील आरे कॉलनी, रेशन वितरण यांसारख्या विषयांवर समित्यांनी मोलाची शिफारस केली आहे. समितीची शिफारस जर ठराविक कालावधीत अंमलात आली तर समिती व्यवस्था अधिक प्रभावी ठरेल असेही त्यांनी यावेळी मत मांडले.

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# 'शारदा'मध्ये मॅरेथॉन स्पर्धेला प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ जून -** आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त शारदा इंटरनॅशनल स्कूलतर्फे 'रन ऑफ योगा मॅरेथॉन' स्पर्धा घेण्यात आली. योगाच्या माध्यमातून संपूर्ण शारीरिक आरोग्याला चालना देण्यासाठी रॉयल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. एम. आर. पाटील यांच्या मार्गदर्शनात घेण्यात आलेल्या स्पर्धेचे उद्घाटन गृह विभागाचे पोलीस उपाधीक्षक गजानन भातलवंडे यांच्या हस्ते करण्यात आले.



विद्यार्थ्यांसाठी तीन व पालकांसाठी दोन गटांमध्ये ही स्पर्धा झाली. विद्यार्थी गटात अर्णव मुंडे, श्रीयोग लोहिया, देवांश घारगे, माही मोटे, अनन्या शेख, श्रेया मोहिते, हर्षवर्धन देवकते, विहान कोल्हे, आर्यन पांडे, इशिता मोठे, पंकजा कोरे, प्रिया कुमार, प्रथमेश जाधवर, दशरथ इंगळे, जनार्दन घुले, मुंजाजी झाडे, उषा केशवे, सरिता काळे, भाग्यश्री खडके यांनी स्पर्धेत विजय मिळविला. योग शिक्षिका आशा झुंजे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी योगाभ्यास केला.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी विजेत्यांना संस्थेचे उपाध्यक्ष एल. एम. पाटील आणि प्राचार्य दत्ता घारगे यांच्या हस्ते बक्षिसे प्रदान करण्यात आली. यावेळी उपप्राचार्या शीला शेळके, वैशाली गिरवलकर, मंजुश्री सासवडे, क्रीडा शिक्षक विजय आधव आदींची उपस्थिती होती.

## संक्षिप्त वृत्त...

### केंब्रिज महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ जून -** शहरातील औसा रोडवरील केंब्रिज कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी 'एनटीए'ने जाहीर केलेल्या इंजिनिअरिंग सीईटी परीक्षेच्या निकालात घवघवीत यश संपादन केले आहे. अनेक विद्यार्थ्यांना राज्यातील नामांकित अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश मिळणार आहे.

सीईटी परीक्षेमध्ये कार्तिक ईश्वर चौधरी ९९.३९ पर्सेंटाईल घेत प्रथम, मानसी सुलगुटले ९६.८० द्वितीय व विपुल देशपांडे ९६.६६ पर्सेंटाईल घेऊन महाविद्यालयात तृतीय आला. ओमकार पाटील ९६.५२, प्रणव चिऊलवार ९६, आयान बाबासाहेब शेख ९५.६७, श्रीनिवास रायचूरकर ९४.८७, चैतन्य चौधरी ९४.२४, अनुप सोनटक्के याने ९१.३९ पर्सेंटाईल घेतले आहेत.

३८ पैकी ११ विद्यार्थ्यांनी ९० पर्सेंटाईलपेक्षा अधिक गुण घेतले आहेत. या यशाबद्दल महाविद्यालयाचे संस्थापक सचिव प्रा. सतीश मारकोळे, उपाध्यक्ष भारत बुक्तर, प्राचार्या मीना मुंडे, फिनिक्स प्रायमरी इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या अंजना गुजराती, वीर बाजीप्रभू प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक मारुती बिरादार, प्रा. सी. जी. पाटील, प्रा. भागवत धुळगंडे, प्रा. शैलेजा निटुरे, अर्चना गायकवाड, अनिता स्वामी यांनी कौतुक केले.

### पर्यावरण संतुलनासाठी पंढरीत पाच हजार सायकलिस्टचा रिंगण सोहळा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ जून -** हजारो वर्षांची परंपरा असलेल्या आषाढी वारीत लाखो पांडुरंग भक्त आळंदी ते पंढरपूर पायी सहभागी होतात. आता या वारीचाच भाग म्हणून आषाढीनिमित्त पांडुरंगाला वंदन करत, पर्यावरणाचा जागर करत रविवारी (दि.२२) पांडुरंगाच्या दरबारी राज्याच्या विविध शहरांतील ९७ क्लबचे तब्बल ५ हजार सायकलिस्टचा रिंगण सोहळा पार पडला. यावेळी विठुनामाचा गजर आणि पर्यावरणपूरक घोषणांनी पंढरपूरनगरी दुमदुमून गेली होती.

आषाढी वारीनिमित्त पांडुरंगाच्या चरणी राज्याच्या कानाकोपऱ्यातून लाखो भाविक नतमस्तक होतात. संत ज्ञानेश्वर माउलीच्या आळंदी येथून निघालेली पालखी मजल दर मजल करत तब्बल महिनाभराचा प्रवास करत आषाढी एकदशीला पंढरीत दाखल होतात. हजारो वर्षांची परंपरा असलेल्या या परंपरेचा एक भाग म्हणून पर्यावरणप्रेमी नागरिक मागील पाच वर्षांपासून राज्याच्या कानकोपऱ्यातून सायकल वारी काढून पर्यावरण संतुलन अबाधित राहण्याचा संदेश देत आहेत. लातूर सायकलिस्ट क्लबच्या प्रयत्नातून यावर्षी भक्तांबरोबरच राज्याच्या कानाकोपऱ्यातील विविध शहरातील ९७ क्लबच्या जवळपास ५ हजार सायकलिस्टनी हजारो सायकलिस्ट सदस्यांनी सायकल वारी काढून पर्यावरण संतुलनाचा संदेश देत रविवारी भागवत एकादशीदिनी वारीपूर्वीच पंढरपुरात सायकल रिंगण सोहळा साजरा केला.

यजमानपद असलेल्या लातूर सायकलिस्ट क्लबने विठ्ठल नामाचा गजर करतानाच पर्यावरणाचा जागर करत शुक्रवारी १५० हून अधिक सायकलस्वारांनी लातूर ते पंढरपूर असा प्रवास करत रविवारच्या विशाल सायकल रिंगणात सहभागी झाल्याची माहिती लातूर सायकलिस्ट क्लबचे श्रवण उगले, अभिजीत देशपांडे सरसंबेकर यांनी दिली.

### गुरुजी आयटीआयमध्ये योग दिवस साजरा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ जून -** येथील श्री गुरुजी आयटीआय येथे जागतिक योगदिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी योगाभ्यास केला.

२१ जून देशभरात जागतिक योग दिन म्हणून उत्साहात साजरा केला जातो. याचाच एक भाग म्हणून लातुरातील श्री गुरुजी आयटीआय येथे संस्था अध्यक्ष अतुल ठोंबरे, योग शिक्षक डॉ. पंकज तेरकर यांच्या मार्गदर्शनाखाली योग दिनाचे महत्त्व सांगून, योगाचे प्रात्यक्षिके करण्यात आली.

यावेळी प्राचार्य अभियंते अविनाश पाटील, बाबा डोंगरे, जी. टी. होळकर, पी. व्ही. देशमुख, अभिजीत दुडिले, रणजित कदम, प्रवीण फत्तेपूरकर, विकास घोडके यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

# फुटपाथवरील अतिक्रमणांवर हातोडा

## महापालिकेने बड्या अतिक्रमणांवर बुलडोझर फिरवावा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ जून -** शहरातील जवळपास सर्वच फुटपाथवर अतिक्रमण झाले आहे. याबाबत नागरिकांतून ओरड सुरू असताना महापालिका व पोलीस प्रशासनाने सोमवारी (दि.२३) फुटपाथवरील अतिक्रमण हटावची मोहीम महात्मा गांधी चौकापासून गंजगोलाईच्या दिशेने मेन रोडवर केली असून, अनेक टपऱ्या, दुकानांचे रोडवर आलेले शेड आदी हटविण्यात आले आहेत. महापालिकेने बड्या अतिक्रमणांवरही बुलडोझर फिरवावेत, अशी मागणी होत आहे.

शहरातील सर्वच फुटपाथवर अतिक्रमण करण्यात आले आहे. विशेष म्हणजे मध्यवर्ती बसस्थानकाकडे येणाऱ्या रोडवर मोठ्या प्रमाणात टपऱ्या, दुकानांचे साहित्य, शेड, बोर्ड, हॉटेल असल्याने नागरिकांची अडचण होत होती. त्यामुळे नागरिकांतून ओरड सुरू होती. महापालिका व पोलीस प्रशासनाच्यावतीने सोमवारी महात्मा गांधी चौकापासून गंजगोलाईच्या दिशेने मेन रोडवर अतिक्रमण मोहीम राबविण्यात आली. दरम्यान, अनेक छोट्या व्यावसायिकांनी हा आमच्यावर अन्याय आहे. आम्ही ३० ते ३५ वर्षांपासून या ठिकाणी व्यवसाय करून आमचा चरितार्थ भागवितो, अशी प्रतिक्रिया दिली आहे.

महापालिकेच्या अतिक्रमण हटाव विभागाचे प्रमुख रवी कांबळे यांनी आयुक्त मानसी मीना यांच्या आदेशाने ही अतिक्रमण हटाव मोहीम राबविण्यात येत असून, ती १० दिवस शहरभर राबविण्यात येणार असल्याचे म्हटले आहे. अतिक्रमण हटावच्या या मोहिमेत या विभागाचे प्रमुख रवी कांबळे, दत्ता पवार, बंटी उबाळे, आतिश गायकवाड, सुनील कांबळे, महेंद्र घोडके तसेच गांधी चौक ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक बी. जी. चित्ते, जमादार दत्ता शिंदे यांच्यासह महापालिकेचे कर्मचारी यांचा समावेश आहे. दरम्यान, अतिक्रमण हटविण्यासाठी पालिकेने सुरू केलेली मोहिम कायम राहण्याची आपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत.

### जीव मुठीत धरून चालण्याची वेळ

शहरातील फुटपाथवर ठिकठिकाणी अडथळे निर्माण झाल्याने पादचाऱ्यांना रस्त्यांवरून चालण्याशिवाय पर्याय राहिलेला नाही. दरवर्षी रस्ते अपघातांमध्ये मृत्युमुखी पडणाऱ्या नागरिकांमध्ये पादचाऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे. त्यातच फुटपाथसमोर दुचाकी, चारचाकी वाहनांची पार्किंग करण्यात आल्याने नागरिकांना रस्त्याच्या मध्यापर्यंत यावे लागत आहे. परिणामी, काही ठिकाणी वाहतूक कोंडी होत असून, यामुळे छोटे-मोठे अपघात होत आहेत. जीव मुठीत धरून चालावे लागत असल्याच्या भावना नागरिकांनी व्यक्त केल्या.



### सर्वच फुटपाथची नाकाबंदी

शहरातील काही मोजके रस्ते सोडल्यास बहुतेक रस्ते फुटपाथविनाच असल्याचे दिसून येत आहे. शहरातील सर्वच ठिकाणी फुटपाथवर अतिक्रमण करण्यात आले आहे. अनेक ठिकाणच्या फुटपाथची दुरवस्था झाली आहे. काही ठिकाणी फुटपाथ उखडले आहेत. तसेच दुकानदारांच्या पाट्या, विविध माहिती फलक, बांधकामाचे साहित्य, दुकानातील वस्तू, पार्किंग केलेली वाहने, फेरीवाले यामुळे फुटपाथची जणू नाकाबंदी करण्यात आली आहे.

# मठ हे ज्ञान देणारे संस्कार केंद्र

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ जून -** देशात हजारो मठ असून, मठ म्हणजे धन, दौलत गोळा करणे नव्हे तर लोकांमध्ये जनजागृती व नीतीमूल्यांची रुजवण करण्यासाठी अन्नदानासोबत ज्ञान देणारे संस्कार केंद्र असल्याचे प्रतिपादन लिंगायत आंदोलनाचे मार्गदर्शक तथा उस्तुरी व आळंद मठाचे मठाधीपती कोरणेश्वर महास्वामीजी यांनी केले.



निलंगा येथील संगन बसव विरक्त मठ येथे चालविण्यात येणाऱ्या महात्मा बसवेश्वर शिव सांप्रदायिक गुरुकुलाच्या प्रथम वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमप्रसंगी ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी संगन बसव मठाचे मठाधीपती संगन बसव महास्वामीजी होते. मंचावर संगन बसव विरक्त मठाचे नूतन अध्यक्ष अमोल आर्य, माजी उपनगराध्यक्ष मनोज कोळ्ळे, शिवाजी रेशमे, विनोद आर्य, काशिनाथप्पा आग्रे, शिवहार वाडकर, उध्दव महाराज हैबतपुरे, शिवराज पाटील, उदगीर, धनराज गोंड, जळकोट यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी कोरणेश्वर महास्वामीजी म्हणाले, गुरु, लिंग, जंगम, हे जात, धर्म नव्हे तर एक तत्त्व आणि विचार प्रणाली आहे. देशाच्या प्रगतीच्या वाटचालीत लिंगायत मठाचे योगदान मोठे आहे.

लिंगायत मठातर्फे देशभरात चालविण्यात येणाऱ्या विविध गुरुकुलांमधून हजारो विद्यार्थ्यांवर धार्मिक नीतीमूल्यांची व सामाजिक समतेच्या मूल्यांची रुजवण केली जाते. आजपर्यंतच्या इतिहासात राम, कृष्ण यांनीही गुरुच्या सानिध्यात आश्रमात राहून शिक्षण घेतले आहे.

आजच्या मोबाइल तंत्रज्ञानाच्या युगात तरुण पिढीवर चांगले संस्कार करण्यासाठी गुरुकुल शिक्षण पध्दतीची नितांत गरज आहे, असे ते म्हणाले. यावेळी समाजबांधव व पालक उपस्थित होते. इंजिनिअर एम. के. कस्तुरे यांनी सूत्रसंचालन करून शेवटी आभार मानले. यावेळी अनेकांची उपस्थिती होती.

# डेंग्यू प्रतिबंधासाठी महापालिका ॲक्शन मोडवर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ जून -** डेंग्यू प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा महत्त्वाचा भाग म्हणून महापालिका आयुक्त मानसी मीना यांच्या आदेशानुसार आणि उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे यांच्या मार्गदर्शनानुसार शहरात ॲबेटिंग मोहीम राबवण्यात येत आहे. या मोहिमेत महापालिकेच्या आरोग्य विभागातील २०३ आशा स्वयंसेविका, ४६ आरोग्य सेविका आणि १६ आरोग्य कर्मचारी यांचा सहभाग असणार आहे.



या मोहिमेमध्ये घरोघरी जाऊन डास उत्पत्तीच्या ठिकाणांचे सर्वेक्षण करण्यात येणार असून, आढळलेली डास उत्पत्तीची ठिकाणे शक्यतो नष्ट करणे किंवा तसे शक्य नसल्यास त्या पाण्यामध्ये औषध टाकणे, वारंवार डास उत्पत्तीचे ठिकाणे आढळून येणाऱ्या ठिकाणी संबंधितांना सूचनापत्र दिली जाणार आहेत. यासोबतच डासांवर नियंत्रण आणण्यासाठी धूरफवारणी केली जाणार आहे.

२०२४ या वर्षात महापालिका आरोग्य विभागामार्फत संशयित डेंग्यू रुग्ण यांचे एकूण १ हजार ६९३ रक्त नमुने संकलित करून त्यांची सेन्टेनल लॅब येथे डेंग्यू तपासणी करण्यात आली होती. त्यापैकी शहरातील ९३५ रुग्णांपैकी ३१९ रुग्णांचे रक्त नमुने डेंग्यू पॉझिटिव्ह आले होते. परंतु, यावर्षी शहरात डेंग्यूचा प्रादुर्भाव आणखी कमी करण्याच्या दृष्टीने विविध उपाययोजना राबवण्यात येणार आहेत. डेंग्यूची लागण झालेल्या बहुतेक जणांना उच्च ताप, डोकेदुखी, अंगदुखी, मळमळ आणि पुरळ येतात. अनेकजण एक-दोन आठवड्यात बरे होतात. काहीजणांना गंभीर आजार होतो आणि त्यांना रुग्णालयात उपचारांची आवश्यकता असते. गंभीर प्रकरणांमध्ये डेंग्यू प्राणघातक ठरू शकतो. डास चावणे टाळून डेंग्यूचा धोका कमी करता येतो. डेंग्यूची लागण झालेल्या बहुतेक जणांना सौम्य किंवा कोणतीही लक्षणे नसतात. प्रामुख्याने ताप, डोकेदुखी, डोळ्याच्या मागील बाजूस तीव्र वेदना, थकवा, अंगदुखी, लालसर रंगाची लघवी होणे, आदी लक्षणे असू शकतात. दुसऱ्यांदा संसर्ग झालेल्या व्यक्तींना गंभीर डेंग्यूचा धोका जास्त असतो. नागरिकांनी जागरूक राहून आपल्या स्तरावरील प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा योग्य वापर करावा, असे आवाहन आरोग्य अधिकारी डॉ. शंकर भारती यांनी केले आहे.

# जिल्ह्यात १७३ मेगावॅट क्षमतेचे ३६ सौरऊर्जा प्रकल्प कार्यान्वीत

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ जून -** मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० च्या माध्यमातून शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा अखंडित व भरवशाचा वीजपुरवठा करण्यासाठी महावितरण प्राधान्याने सौरऊर्जा प्रकल्पाची कामे पूर्णत्वाकडे नेत आहे. डिसेंबर २०२४ ते आजतागायत लातूर जिल्ह्यात १७३ मेगावॅट निर्मिती क्षमतेचे एकूण ३६ प्रकल्प कार्यान्वीत झाले आहेत. या प्रकल्पांद्वारे तब्बल ५० हजार शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा केला जात आहे. तर गेल्या तीन महिन्यात ८१ मेगावॅट क्षमतेचे १४ सौरऊर्जा प्रकल्प कार्यान्वीत करण्यात आले असून, याप्रकल्पांद्वारे २१ हजार ६० शेतकऱ्यांचे दिवसा सिंचनाचे स्वप्न पूर्णत्वास आले आहे.



मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने महाराष्ट्रात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना राबविण्यात येत आहे. याद्वारे राज्यात एकूण १६ हजार मेगावॅट क्षमतेचे सर्व प्रकल्प मार्च २०२६ पर्यंत पूर्ण करून राज्यात शेतीसाठी पूर्णपणे सौर ऊर्जेवर निर्माण झालेल्या विजेचा पुरवठा करण्यात येणार आहे. या योजनेत महावितरणच्या वीज उपकेंद्राच्या ५ कि.मी. परिघातील जमिनीवर सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात येत आहेत. यातून निर्माण होणारी वीज महावितरणच्या उपकेंद्रांतील फिडरद्वारे परिसरातील कृषिपंपांना दिवसा पुरवण्यात येत आहे. या योजनेंतर्गत लातूर परिमंडळात जलदगतीने सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यात येत आहेत.

एप्रिल, मे व जून या तीन महिन्यांत लातूर जिल्ह्यातील वलांडी ८ मेगावॅट, अहमदपूर ४ मेगावॅट, नागराळ ४ मेगावॅट, बेलकुंड १० मेगावॅट, पळशी ८ मेगावॅट, नणंद ६ मेगावॅट, तोगरी ५ मेगावॅट, शिरूर ताजबंद ८ मेगावॅट, बुधोडा ५ मेगावॅट, आष्टा ५ मेगावॅट, कोळनूर ५ मेगावॅट, देवर्जन ६ मेगावॅट, लासोना २ मेगावॅट आणि नळगीर ५ मेगावॅट या ३३/११ के.व्ही. उपकेंद्रांर्गत एकूण ८१ मेगावॅट क्षमतेचे सौरऊर्जा प्रकल्प कार्यान्वीत करण्यात आले आहेत. यामुळे या २४ उपकेंद्रांतून निघणाऱ्या कृषी वीज वाहिन्यांवरील २१ हजार ६० शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा होत आहे. यामुळे शाश्वत शेती करण्याचे शेतकऱ्यांचे स्वप्न मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० मुळे पूर्णत्वास आले आहे.

# विनाविलंब व विनाअट पीककर्ज द्या; अन्यथा अद्दल घडवू

## ठाकरे सेनेचा लीड बँकेला निवेदनाद्वारे इशारा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ जून -** हमीदार, सिबिल स्कोअर, मागील थकबाकी व अन्य तांत्रिक कारणे पुढे करत लातूर जिल्ह्यात बँकांकडून शेतकऱ्यांना पीककर्ज देण्यास टाळाटाळ केली जात आहे. शेतकऱ्यांना विनाअट, विना विलंब पीककर्ज वाटप करावे, अन्यथा अद्दल घडवू, असा इशारा ठाकरे सेनेच्यावतीने सोमवारी (दि.२३) लीड बँकेला निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.



लातूर जिल्ह्यातील शेतकरी सध्या अत्यंत बिकट आर्थिक परिस्थितीतून जात आहेत. नैसर्गिक आपत्ती, हमीभावाचा अभाव, वाढता उत्पादन खर्च आणि पीकविम्यातील धरसोडीच्या धोरणांमुळे शेतकरी अडचणीत आला आहे. अशा कठीण काळात त्याला आधार देणारे एकमेव साधन म्हणजे पीककर्ज जे वेळेवर, सुलभ आणि विनाअट मिळणे अत्यंत आवश्यक आहे. राज्य शासनाकडून बँकांना त्वरित पीककर्ज मंजुरीचे निर्देश असतानाही लातूरच्या अग्रणी शाखेमध्ये शेकडो शेतकऱ्यांचे अर्ज प्रलंबित आहेत. हमीदार, सिबिल स्कोअर, मागील थकबाकी व अन्य तांत्रिक कारणांचे दाखले देत बँकांकडून कर्ज वितरण टाळले जात आहे. मुख्य व विभागीय शाखांकडे अर्ज फॉरवर्ड करून वेळकाढूपणा केला जात आहे. यामुळे शेतकऱ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे, असे अग्रणी बँकेच्या निदर्शनास आणून देण्यात आले.

जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी व बालाजी रेड्डी यांच्या नेतृत्वातील शिष्टमंडळाने लातूरच्या अग्रणी बँकेचे व्यवस्थापक यांची सोमवारी भेट घेतली. जिल्ह्यातील शेतकऱ्यांना तत्काळ बँकांमार्फत पीक कर्जे द्यावीत. याबाबत सर्व बँकांना तत्काळ सूचना देत पीककर्ज वाटप करावे अन्यथा ठाकरे सेना जिल्ह्यातील बँकांना अद्दल घडवेल, असा इशारा शिष्टमंडळाने दिला आहे.

शिष्टमंडळात जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी आणि बालाजी रेड्डी यांच्यासह सहसंपर्कप्रमुख नामदेव चाळक, महानगरप्रमुख सुनील बसपुरे, उपजिल्हाप्रमुख बालाजी जाधव, शहरप्रमुख विष्णूपंत साठे, तालुकाप्रमुख परमेश्वर सूर्यवंशी, किसन समुद्रे, सूरज बाहेती, श्रीराम कुलकर्णी, मुनीर पठाण, मारोती सूर्यवंशी आदींचा समावेश होता.



# मध्यवर्ती स्थानकातून बससेवा पूर्ववत

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ जून -** गेल्या काही महिन्यांपासून सोलापूर, कोल्हापूर, उमरगा, मुरूड, धाराशिव जाणाऱ्या बसेस बसस्थानक क्रमांक २ वरून सुटत होत्या. मात्र, नागरी हक्क संघर्ष समितीच्या आंदोलनानंतर त्या पूर्ववत सोमवारी (दि.२३) सकाळपासून मध्यवर्ती बसस्थानकातून सुरू करण्यात आल्या. यामुळे अनेक महिन्यानंतर हे बसस्थानक प्रवाशांनी अक्षरशा फुलून गेले आहे.

सोलापूर, कोल्हापूर, उमरगा, मुरूड, धाराशिव जाणाऱ्या बसेस मध्यवर्ती बसस्थानकातून सुरू करण्यात आल्यामुळे नागरी हक्क संघर्ष समिती आणि प्रवाशांच्यावतीने एस. टी. प्रशासनाचे अधिकारी, कर्मचारी यांचा बसस्थानकात आयोजित कार्यक्रमात सत्कार करण्यात आला.

यावेळी विभाग नियंत्रक अश्वजीत जानराव, आगार व्यवस्थापक राठोड, तसेच नागरी हक्क संघर्ष समितीचे भाई ॲड. उदय गवारे, अशोक गोविंदपूरकर, बसवंतप्पा भरडे, सूर्यप्रकाश धूत, विश्वंभर भोसले, रामकुमार रायवाडीकर, विनोद खटके, लाला सुरवसे, आबासाहेब शिंदे, दीपक गंगणे, आकाश कांबळे, नंदू पाटील, बसवराज दुर्गे आदी उपस्थित होते. यावेळी लातूर-विटा या बसला विभाग नियंत्रक जानराव यांनी श्रीफळ फोडून रवाना केले.

## नगर अर्बन बँकेच्या ठेवीदारांना जुलै महिन्यात ५०% रकमा मिळण्याचा मार्ग मोकळा - अवसायक गणेश गायकवाड

नगर : अवसायानात निघालेल्या नगर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या ठेवीदारांसाठी मोठा दिलासा देणारी अपडेट समोर आली आहे. पाच लाखांपेक्षा जास्त रकमेची ठेव पावती असलेल्या ठेवीदारांना ठेव पावतीच्या ५०% इतकी रक्कम जुलै महिन्यात मिळणार असल्याची माहिती बँकेचे अवसायक गणेश गायकवाड यांनी दिली. याबाबत डी आय सी जी सी यांचेकडे ना हरकत प्रमाणपत्रासाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यानुसार डी आय सी जी सी कार्यालयाकडून सदरचे ना हरकत प्रमाणपत्र नुकतेच बँक प्रशासनास प्राप्त झाले आहे. त्यामुळे पाच लाखांपेक्षा जास्त ठेव रक्कम असलेल्या व विहित नमुन्यातील क्लेम फॉर्म व केवायसी अपडेट केलेल्या १९२६ ठेवीदारांना ठेव पावतीच्या ५०% इतकी रक्कम जुलै महिन्यात मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. सदर ठेवी परत करण्याचा पहिला टप्पा पूर्ण झाला असून दुसऱ्या टप्प्याचे आरबीआय शी निगडित कामकाज जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पूर्ण झाल्यानंतर या रकमा ठेवीदारांच्या खात्यात वर्ग करण्यात येणार आहेत अशी माहिती बँकेचे अवसायक गणेश गायकवाड यांनी दिली.

## बिडकीन येथे नेत्र सेवा आपल्या दारी मार्फत शिबिर संपन्न



बिडकीन दि २४ जून पैठण तालुक्यातील बिडकीन येथील वर्धमान नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित छत्रपती संभाजीनगर शाखा-बिडकिन शाखेचा ११ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.या वेळी लायन्स आय हॉस्पिटल यांच्या अंतर्गत नेत्र सेवा आपल्या दारी मोफत शिबिर आयोजित करण्यात आले होते यामध्ये मोतीबिंदू, काचबिंदू यावर अत्याधुनिक मशीन द्वारे मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या मध्ये ११० सभासदांनी लाभ घेतला, प्रज्वल मिठावाला व त्यांच्या टीमचे सहकार्य लाभले,प्रसंगी संचालक अविनाश कोटांबे , विभागीय व्यवस्थापक किशोर चक्कर , बिडकीन शाखेचे सल्लागार नंदकिशोर गुजर , नंदकुमार वैद्य, विठ्ठल मोगल,योगेश डांबाले, राजू चव्हाण ,त्रिंबक पाडळकर, विलास बेंद्रे ,वल्लभ तोतला यांनी वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या . तसेच विभागीय व्यवस्थापक किशोर चक्कर यांनी संस्थेविषयी माहिती दिली. शाखा व्यवस्थापक किरण क्षिरसागर यांनी बिडकीन शाखेची माहिती दिली. तसेच विभागीय व्यवस्थापक किशोर चक्कर यांनी आलेल्या पाहुण्याचे आभार मानले. यावेळी शाखेतील खातेदार, सभासद, हितचिंतक सल्लागार, सर्व कर्मचारी, पिग्मी प्रतिनिधी उपस्थित होते .



## इंजी. नागसेन ढगे यांची निवड

छत्रपती संभाजीनगर - मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी येथील कार्यरत इंजी. नागसेन मुकुंदराव ढगे यांचे भारतीय दलित पँथर महाराष्ट्र राज्य या संघटनेच्या मराठवाडा विभाग कार्याध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. ही निवड संघटनेच्या महाराष्ट्रराज्य कार्यकारिणी सभेत ३ फेब्रुवारी रोजी करण्यात आली. इंजी. नागसेन ढगे यांनी यापूर्वी बौद्ध महासभा शाखा परभणी संघटक उपाध्यक्ष, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॅशनल इंजिनिअर असोसिएशन परभणी शाखा यांचे सदस्य म्हणून काम पाहिले आहे तर कास्ट्राईब कर्मचारी संघटना परभणी शाखा आणि भीमशक्ती कर्मचारी संघ येथे त्यांनी ३५ वर्षापासून हिरीरीने काम केले आहे.

## मदर गंगा इंग्लिश स्कूल येथे आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा

कन्नड :- दि.२४ जून - शहरातील मदर गंगा इंग्लिश स्कूल मध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना योगासनाचे विविध प्रकार तसेच त्यांचे प्रात्यक्षिक करून दाखवण्यात आले आणि जीवनात योग व व्यायाम करण्याचे महत्त्व पटवून देत त्याबद्दल सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष डॉ.आण्णासाहेब शिंदे,योग शिक्षक विठ्ठलसिंग राजपूत,पतंजली चिकित्सालय संचालिका गिता राजपूत,मुख्याध्यापक प्रा.श्रीकांत झिंजुर्डे, संचालक संदीप शिंदे, व्यवस्थापक उदय सोनवणे,शिक्षक शुभांगी पठाडे,दुर्गा काळे,योगिता मोरे,रुपाली शेजवळ,प्रियंका छत्रे, वर्षा निकम,जयश्री वाडिले,छाया हिंगे,प्रतिक्षा सुमराव,इशिता शर्मा,पूजा वाळुंजे,धीरज राठोड,अनिकेत गोंडे, तसेच सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## वृक्ष लागवड संवर्धन ही काळाची गरज न्यायाधीश व्ही डी पाटील



कन्नड :- दि.२२ जून - आताच्या काळात निसर्ग सौंदर्य प्रत्येकाला आवडते पण त्याच जतन,संवर्धन करणे गरजेचे आहे असे प्रतिपादन लंगडा तांडा येथे वृक्षारोपण व पर्यावरण जनजागृती कार्यक्रमा प्रसंगी दिवाणी न्यायाधीश वि.डी.पाटील,यांनी केले यावेळी तहसीलदार विद्याचरण कडवकर, गटविकास अधिकारी सी.एम.ढोकणे, कृषिभूषण डॉ सिताराम जाधव, वनपरिक्षेत्र अधिकारी शिवाजी टोम्पे, सहाय्यक गटविकास अधिकारी पंडित, सामाजिक वनीकरण वनपरिक्षेत्र अधिकारी अरविंद काटकर,वनपाल कैलास जाधव , एस पी नलावडे मंडळ अधिकारी चव्हाण,मंडळ अधिकारी कल्याणकर ,सहाय्यक विस्तार अधिकारी दारकुंडे, उत्तमराव राठोड, डॉ विलास सदाफळे, डॉ सदाशिव पाटील,तलाठी कुशोद , ग्रामपंचायत अधिकारी मनीषा बावस्कर ग्रामपंचायत अधिकारी पडोळे,मराठवाडा ग्रामीण विकास संस्थेचे गाव स्वयंसेवक आदित्य पवार,सरपंच,उपसरपंच व इतर पदाधिकारी तसेच ग्रामस्थ उपस्थित होते. या उपक्रमाचा मुख्य उद्देश पर्यावरण संवर्धन आणि वृक्षारोपणाची जागरूकता वाढवणे हा होता, ज्यामुळे परिसरात हरित वायु वाढण्यास मदत होईल.आणि पर्यावरणाच्या ह्रास होण्यापासून सुटका मिळेल.या दरम्यान २५० झाडाचे वृक्षारोपण करण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अशोक भोसले रामकृष्ण दराडे अशोक आव्हाड वन सेवक, देवी भाऊ राठोड, प्रकाश काचोळे, एकनाथ चव्हाण यांनी परिश्रम घेतले.

## एमजीएममध्ये नाट्य गीतांची मैफल रंगली

छत्रपती संभाजीनगर, दि.२४ : एमजीएम विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या वतीने संगीत दिनानिमित्त 'मर्मबंधातली ठेव' ही नाट्यगीतांची मैफल सुश्राव्य गायनाने रंगली. यावेळी संगीत विभागाच्या विद्यार्थ्यांनी जुन्या नाटकातील नाट्यपदांचे सादरीकरण करून रसिकांची मने जिंकून घेतली. याप्रसंगी कुलपती अंकुशराव कदम यांनी आताची पिढी जुनी अभिजात नाट्यगीते श्रवण करतात, त्याचा अभ्यास करतात व गांभीर्याने गातात ही सकारात्मक बाब असल्याचे प्रतिपादन केले. मैफिलीत नमन नटवरा या नाट्यगीताने प्रारंभ झाला. त्यानंतर 'संन्यस्त खडग' या नाटकातील पटदीप रागाचा वापर केलेले ' मर्मबंधातली ठेव ही...' हे नाट्यगीत ज्ञानेश्वरी इधाटे हिने सादर केले.

## श्री.स्वामी समर्थ ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्यादित, आमखेडा यांची २२ वी वार्षिक सर्व साधारण सभेचे आयोजन

सोयगाव,दि.२४ जून : श्री स्वामी समर्थ ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्यादित,आमखेडा तालुका सोयगाव यांची २२ वी वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन दि.२८ शनिवार रोजी सकाळी १०:३० वाजता हॉटेल अमृत इन (गार्डन) सोयगाव - जरंडी रोडवर येथे संस्थेचे अध्यक्ष ॲड.राजेश(भैय्या)अमृत गिरी यांच्या अध्यक्षतेखालील ठेवण्यात आली आहे.

# जिल्हाधिकारी यांची कृष्णपूरवाडी शिवारात भेट; अडचणी घेतल्या जाणून

छत्रपती संभाजीनगर, दि.२४ (जिमाका)- शेतकऱ्यांच्या अडीअडचणी जाणून घेण्यासाठी 'अधिकारी शेताच्या बांधावरी' या उपक्रमाअंतर्गत जिल्हाधिकारी दिलीप स्वामी आज सकाळी कृष्णपूरवाडी या गावात गेले. तेथे शेतकऱ्यांशी चर्चा करुन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.



जिल्हाधिकारी स्वामी आज सकाळीच साडेनऊ वाजेच्या सुमारास कृष्णपूरवाडी, कोलठाण येथील शेतकऱ्यांकडे गेले. जनार्दन किसन दौंड, कोलठाण गट नं.३३, धरमसिंग कारभारी गोलवाल, कृष्णपुरवाडी गट नं.४१, काळुसिंग मानसिंग बहुरे, कोलठाण, गट नं.२३, मोतीलाल हिरालाल बहुरे कृष्णपुरवाडी गट नं.३७, हरिदास पंडीत मोठे कोलठाण गट नं.३५/१, त्र्यंबक नवलाची कवंदे कृष्णपूर वाडी गट नं.८५ तसेच परिसरातील इतर शेतकऱ्यांशी त्यांनी संवाद साधला. शेतकऱ्यांनी यावेळी जिल्हाधिकाऱ्यांसमोर शेत रस्ता, खत ,बी - बियाणांची उपलब्धता याविषयी आपल्या समस्या मांडल्या. पीक कर्ज उपलब्धतेबाबतही शेतकऱ्यांनी आपल्या समस्या मांडल्या. शेतकऱ्यांना वेळेत व रास्त दरात बियाणे, खते उपलब्ध करुन देण्याबाबत उपाययोजना करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी आश्वस्त केले. पीक कर्ज उपलब्धतेबाबत बँकांना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्याबाबत निर्देशित करण्यात येईल असे त्यांनी सांगितले. तसेच या परिसरातील शेतरस्त्यांच्या समस्येबाबतही तात्काळ उपाययोजना करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

## कै. बाळासाहेब विखे पाटलांचे स्वप्न आज साकार होत आहे : डॉ. सुजय विखे

अ.नगर : पारनेर तालुक्याच्या जिरायत भागासाठी कै. बाळासाहेब विखे पाटील यांनी जे स्वप्न पाहिले होते, ते आज जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील साहेब यांच्या माध्यमातून पूर्णत्वास येत आहे आणि ते सत्यात उतरत असल्याचा आनंद होत असल्याची भावना डॉ. सुजय विखे यांनी व्यक्त केली. तालुक्यासाठी पाण्याचा जो शब्द बाळासाहेब विखे पाटील यांनी दिला होता, तो शब्द जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील साहेब हे पूर्ण करत आहेत. सत्ता आणि पद यांचा उपयोग चांगल्या कामासाठी करून जनतेची सेवा करण्याचे बहुमूल्य काम नामदार साहेबांच्या हातून घडत असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.



पारनेर तालुक्यातील नारायणगव्हाण येथे महाराष्ट्र सुधारणा कार्यक्रमांतर्गत कुकडी कालव्याचे विशेष अस्तरीकरण करण्याच्या कामाचा शुभारंभ माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील व पारनेरचे आमदार काशिनाथ दाते यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी डॉ. सुजय विखे बोलत होते. कुकडी कालवा अस्तरीकरणामुळे पाण्याची मोठ्या प्रमाणावर बचत होणार असून जास्तीत जास्त क्षेत्र हे सिंचनाखाली येईल असे मत त्यांनी व्यक्त केले.

यावेळी विश्वनाथ कोरडे, सुजित झावरे, प्रशांत गायकवाड, भाजपा महिला जिल्हाध्यक्ष अश्विनी थोरात, भाजपा तालुका अध्यक्ष राहुल शिंदे, विक्रम सिंह कळमकर, गणेश शेळके आदी मान्यवर, ग्रामस्थ व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान आमदार काशिनाथ दाते, सुजित झावरे, विश्वनाथ कोरडे व गणेश शेळके यांची समायोजित भाषणे देखील यावेळी झाली.

डॉ. सुजय विखे म्हणाले, लोकसभा निवडणुकीत जे काही अपवाद घडले, त्यातून आपल्याला शिकायला हवं. शेवटी लोकांनी दिलेला निर्णय मान्य करून आम्ही पुढे चालत आहोत. अनेक गावांतील मागण्या नव्याने समोर आल्या आहेत. यामध्ये जातेगाव व पळवे गावाचा समावेश उपसा सिंचन योजनेच्या सभेमध्ये केला जाईल. उपसा सिंचन सर्व्हेचे सर्वेक्षणाचे काम आता काही दिवसातच सुरू होईल असा विश्वास देखील डॉ. सुजय विखे यांनी उपस्थितानं दिला.

तसेच पाण्याचे नियोजन न करता जर वाटेकरी वाढले तर कोणताही घास शिल्लक राहणार नाही. त्यामुळे जलसिंचनाच्या योजनांमध्ये आपल्याला काळजीपूर्वक पावले उचलावी लागतील असे देखील ते म्हणाले. मी पराभूत झालो तरी नागरिकांना दिलेला शब्द मी पूर्ण केला व जे काम राहिलेले आहेत, ते देखील मी पूर्ण करत आहे. ९०० कोटींच्या साखळी योजनेसाठी प्रशासकीय मान्यता मिळण्याचे काम पुढच्या पंधरा दिवसात पूर्ण करणार असल्याची ग्वाही डॉ. सुजय विखे पाटील यांनी दिली आणि ही कामे फक्त आम्हीच करू शकतो असं देखील ठणकावून डॉ. सुजय विखे पाटील यांनी सांगितले.

## कन्नड शहरात चोरट्यांचा धुमाकूळ ! शहरात रात्रीची गस्त वाढवण्याची मागणी

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.२४ जून - शहरात चोरट्यांचा वावर वाढला असुन शहरातील मोमीनपुरा, नरसिंगपूर परिसरात चोरट्यांनी सोने,नगद रक्कमेवर डल्ला मारल्याची घटना घडली आहे शहरातील मोमीनपुरा येथील रहिवासी अफरोज सय्यद शकील वय ३५ वर्ष हे लग्नासाठी बाहेरगावी गेले असता दि.२० ते २३ जून दरम्यान घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी घरातील सामान अस्ताव्यस्त केले,घरात कपाटात ठेवलेली रक्कम २१,००० हजार रुपये लंपास केले आहे, तर रामेश्वर पवार रा.नरसिंगपूर यांच्या घरातून ५ तोळे सोने चोरट्यांनी लंपास केले आहे,

सीसीटीव्ही कॅमेऱ्यात हे चोरटे गुरुदत्त नगर येथील कुचे यांच्या घराच्या गेटचे कुलूप तोडताना दिसून येत असून घरात असलेल्या त्यांचा पत्नीने तत्काळ समयसूचकता दाखवत शेजाऱ्यांना बोलवून घेतल्याने चोरट्यांचा डाव फसला,तब्बल दहा ते अकरा चोरटे असून ते बिंदासपणे शहरात फिरताना दिसून आले आहे,त्यामुळे शहरात पोलिसांची गस्त वाढवण्याची मागणी नागरिक करत आहे



घटनेची माहिती मिळताच फौजदार केशरसिंग जारवाल,सहाय्यक फौजदार नासेर पठाण,पोलिस हेडकॉन्स्टेबल सुभाष पवार दाखल झाले

शहरात श्वान पथकाला पाचारण करण्यात आले असून मोमीनपुराच्या पाठीमागे नरसिंगपूर परिसरात हे चोरटे दाखल झाले त्यांचा मागोवा घेत श्वान पथक नरसिंगपूर परिसरात घुटमळत थांबले श्वान पथकातील कर्मचारी :- पोलिस हेडकॉन्स्टेबल ज्ञानेश्वर लोंढे,पोलिस नाईक.डी. एस.झिंझुरडे,अंमलदार एन.ए. करलकर,आदींचा समावेश होता. ठसे तज्ञ घटनास्थळी दाखल झाले पण त्यांच्या हाती काही लागले नाही या पथका सहाय्यक पोलिस निरीक्षक एम.एम.पठाण,महिला पोलिस कर्मचारी पी.आर. गायकवाड

## आगामी निवडणुकीत राष्ट्रवादी पक्षाचा झेंडा फडकवा : सतीश चव्हाण

### सन्मानजनक वागणूक मिळाली नाही तर स्वबळावर आगामी निवडणुकांना सामोरे जाणार

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.२३ जून - आगामी जिल्हा परिषद, नगरपालिका, पंचायत समिती निवडणुकांत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा झेंडा फडकवा असे आवाहन नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष आमदार सतीश चव्हाण यांनी कन्नड येथे दि.२३ रोजी केले.

शहरातील वाणी मंगल कार्यालयात जिल्हाध्यक्ष आमदार सतीश चव्हाण यांचा नागरिक सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता यावेळी माजी आमदार नितीन पाटील,जिल्हाध्यक्षा महिला स्वाती कोल्हे, गटनेते संतोष कोल्हे यांची भाषणे झाली,या सत्कार समारंभाला संबोधित करताना आमदार सतिष चव्हाण म्हणाले की,राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष आपले नीतिमूल्यांसोबत तडजोड न करता महायुतीमध्ये सामील झाला आहे,आजही शिव फुले शाहू आंबेडकर यांच्या विचारधारेवर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष वाटचाल करत आहे,

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत जर सन्मानजनक वागणूक मिळाली नाही तर स्वबळावर निवडणुकांना सामोरे जाण्याची तयारी ठेवा आणि तालुक्यात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा झेंडा फडकवा असे आवाहन त्यांनी केले

यावेळी व्यासपीठावर महिला राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या जिल्हाध्यक्ष स्वाती संतोष कोल्हे, माजी नगराध्यक्ष संतोष कोल्हे, माजी आमदार नितीन पाटील, युवक राष्ट्रवादी कॉंग्रेस जिल्हाध्यक्ष अनुराग शिंदे, बाजार समितीचे संचालक कैलास अकोलकर, अहेमद अली, चंद्रकांत देशमुख, सुरेश डोळस, तातेराव कदम, युवराज बनकर, संतोष निकम, उध्दव पवार, डॉक्टरर्स असोसिएशनचे तालुका अध्यक्ष डॉ. महेश काचोळे, ॲड. कृष्णा जाधव, तालुकाध्यक्ष प्रकाश गाडेकर, निकाता पवार, आरती बनकर, रंजना राठोड, तिलोत्ता शेजवळ, शशिकला बहिरव, शितल केडीया, भारती बनकर,विद्या काशिनंद, संजय रिंढे, डॉ. आनंद मोतींगे, ज्ञानेश्वर वाघ आदींची उपस्थिती होती.

## दुर्बिणीद्वारे एकाच छिद्रातून बायपास आणि झडप बदलण्याची हृदयशस्त्रक्रिया यशस्वी

छत्रपती संभाजीनगर : फुलंब्री येथील ६० वर्षीय रुग्णावरत एका छोट्या छिद्रातून, हृदयातील रक्तवाहिन्यांचा अडथळा काढण्यासाठी बायपास आणि झडप बदलण्याची जटिल गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वीपणे करण्यात आली आहे. ही शस्त्रक्रिया छत्रपती संभाजीनगर येथील मेडीकव्हर रुग्णालयातील हृदयशस्त्रचिकित्सक डॉ. मनीष पुराणीक यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. या प्रकारची शस्त्रक्रिया मिक्स पद्धतीने राज्यात प्रथमच करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे.



फुलंब्रीतील रुग्णास सौम्य हृदयविकाराचा झटका आल्यामुळे दम लागणे सुरू झाले. तपासणीनंतर हृदयातील रक्तवाहिन्यांमध्ये अडथळा असून, त्याबरोबरच एक झडप निकामी झाल्याचे स्पष्ट झाले. झडपाचे स्वरूप बायकस्पिड एओर्टिक स्टेनोसिस असे निदान झाले होते. त्यामुळे रुग्णावर झडप बदलणे आणि रक्तवाहिन्यांचे पुनःजोडणी (बायपास) अशा दोन शस्त्रक्रिया करणे अत्यावश्यक होते. मात्र, हृदय कमजोर असल्याने ही शस्त्रक्रिया जोखमीची होती.

संभाजीनगर मेडीकव्हर रुग्णालयात महाराष्ट्रात सर्वाधिक दुर्बिणीद्वारे (कमी छेदातून) छाती न उघडता हृदयशस्त्रक्रिया केल्या जात असल्याचे रुग्णास समजले. त्यामुळे त्यांनी डॉ. मनीष पुराणीक यांची भेट घेतली. मागील १३ वर्षांत डॉ. पुराणीक यांनी ७०० पेक्षा जास्त ज्ञशूहेश्रश हृदयशस्त्रक्रिया केल्या आहेत. त्यामध्ये झडप बदलणे, हृदयाला छिद्र असलेल्यांवर उपचार, एकापेक्षा अधिक झडपा बदलणे, तसेच रक्तवाहिन्यांचे पुनःजोडणी यांचा समावेश आहे.

डॉ. पुराणीक यांनी रुग्णाचे अहवाल आणि तपासणी पाहून दोन्ही शस्त्रक्रिया कमी छेदातून (दुर्बिणीद्वारे) करण्याचा निर्णय घेतला. की होल सर्जरी ने झडप बदलताना छाती उघडण्याची आवश्यकता नसते. छातीच्या उजव्या बाजूला फक्त ४-५ सेंटीमीटरची चीर करून ही प्रक्रिया पूर्ण करता येते. तर रक्तवाहिन्यांच्या अडथळ्यावर उपचार करण्यासाठी डाव्या बाजूने दोन फासळ्यांमधून प्रवेश करावा लागतो. दोन्ही प्रक्रियांसाठी एकाच छिद्राचा वापर करत ही जटिल शस्त्रक्रिया करण्यात आली. या पद्धतीमुळे छातीचे हाड मोडण्याची (फ्रैक्चर करण्याची ) गरज भासली नाही. स्थानिक भूल दिल्यामुळे रुग्णास वेदनाही जाणवल्या नाहीत. रक्तस्राव आणि संसर्ग यांची शक्यता कमी झाली. रुग्ण दुसऱ्या दिवशी चालू फिरू लागला आणि पाचव्या दिवशी त्याला रुग्णालयातून घरी सोडण्यात आले. पारंपरिक पद्धतीप्रमाणे छातीवर मोठा व्रणही निर्माण झाला नाही.

सध्या रुग्ण पूर्णपणे बरा झाला असून, वेदनामुक्त जीवन जगत आहे. अशा प्रकारची क्लिष्ट, गुंतागुंतीची आणि आव्हानात्मक मिनिमल इनवेसिव शस्त्रक्रिया राज्यात प्रथमच यशस्वी झाल्याने, डॉ. मनीष पुराणीक यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. या शस्त्रक्रियेमध्ये डॉ पुराणिक, डॉ लाहिरे , डॉ अभिजित कबाडे , डॉ जहीर , गजानन, विल्सन ,सावित्रा व संपूर्ण कार्डियक आयसीयू टीम चे कौशल्य दिसून आले.

## निराधार व्यक्तीच्या अंत्यविधी साठी सोयगाव शहरातील सामाजिक कार्यकर्त्यांचा पुढाकार

सोयगाव,दि.२४ जून - शहरात निराधार अवस्थेत असलेले व भिक्षा माघून आपला उदार निर्वाह करणारे रामदास संपत सन्नासे (वय.८०) राहणार रवळा- जवळा हल्ली मुक्काम सोयगाव बसस्थानक परिसर यांचे दि.२२ रविवार रोजी निधन झाले. त्यांची पत्नी पार्वताबाई (वय.६५ ) यापण भिक्षा मागून उदरनिर्वाह करतात त्यांच्या निधनाची माहिती कळताच सोयगाव शहरातील सामाजीक कार्यकर्ते व बसस्थानक वरील व्यापारी वर्ग सह विष्णू मापारी त्यांचे सहकारी सतीश मंडवे,दशरथ पंचाळ,भगवान परेराव,शांताराम मिस्तरी यांनी अंत्यविधीची तयारी पूर्ण करून त्यांना हिंदू धर्म रितिरिवाजा प्रमाणे राम नाम च्या गजरात अंत्ययात्रा काढून अंत्यविधी केला.विष्णू मापारी,सतीश मंडवे यांनी बाबांच्या पार्थिवाला खांदा दिला.त्यांना मुलबाळ किव्हा जवळचे नातेवाईक नव्हते अंत्यविधीच्या वेळेस संतोष परेराव,नाना मिस्तरी, मुकेश परेराव,कैलास परेराव,प्रवीण परेराव,कृष्णा मोरे, आरोग्यदूत दिगंबर वाघ,समाजसेवक दत्तू रोकडे,अमोल निकम,अनिल लोखंडे,सह ग्रामस्थ उपस्थीत होते. अंत्यविधीच्या लागण्याऱ्या सामानसाठी किशोर झंवर, एलीस बाबा,दिलीप कुंभार यांनी सहकार्य केले. विष्णू मापारी यांनी बाबाना श्रद्धांजली वाहिली व उपस्थितांचे आभार मानले. त्यांनी केलेल्या या समाज कार्याचे सोयगाव शहरासह तालुक्यात व परिसरात कौतुक होत आहे.



श्री रेणुकामाता मल्टि स्टेट को. ऑप अर्बन क्रेडिट सोसायटी लि.अहिल्यानगर
पाहिजेत
बिडकीन शाखे करीता खालील जागा भरणे आहे.
१) मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह- 5 जागा- बारावी पास
२) पिग्मी एजन्ट- 5 जागा- बारावी पास
पत्ता- बँक ऑफ महाराष्ट्राच्या समोर मारवाडी गल्ली, बिडकीन मो. नं.9225323223

## जाहिर प्रकटन

मा.दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १९७/२०२५.

१. बापु दगडु पाटील, वय ५० वर्षे, धंदा शेती, रा. दयाळ नगर सोयगांव, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर.

विरुद्ध

निल

प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. स्वप्निल सुरळकर सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत दगडु सदाशिव पाटील (पोटदुखे) यांचा दिनांक ३१/१०/२००२ रोजी सोयगांव येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ हे मयत दगडु सदाशिव पाटील (पोटदुखे) यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक २४/०६/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता. ३०/०७/२०२५

आदेशावरून

विभीगीय लिपीक — सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.)

मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद

## जाहिर प्रकटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. / १९५/२०२५

१/- विमल नथ्थू बोडखे, वय ७० वर्ष, धंदा शेती, रा. आमखेडा, ता. सोयगाव, जिल्हा औरंगाबाद. २/- आशा भगवान मिसाळ, वय ४२ वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ३/- सरला रुपचंद नाईक, वय ३५ वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे.

विरुद्ध

निल

प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळवण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी अड. सचिन सु. गिरी, रा.. सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत नथ्थू किसन बोडखे यांचा दिनांक १७.०४.२०२५ रोजी मौजे आमखेडा, ता. सोयगाव, जि. छ संभाजीनगर येथे मृत्यु झालेला असुन त्याच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ ते ३ या वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं.१ ते ३ या मयत नथ्थू किसन बोडखे यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

: तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक २३/६/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु. ता ३१/७/२०२५

आदेशावरुन

क. लिपीक — सहा. अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.)

मा. दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.

## जाहिर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १९४/२०२५.

अर्जदार :- १. वसंतराव सांडुजी काळे, वय, ७४ वर्षे, धंदा, शेती, रा. बोदवड, ता. बोदवड, जि. जळगांव. २. बाबुलाल सांडू काळे, वय, ७२ वर्षे, धंदा. शेती, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर, ३. अशोक सांडू काळे, वय. ७० वर्षे, धंदा. शेती, रा. विवेकानंद नगर, जिल्हा पेठ, जळगांव, ता. जि. जळगांव.

-विरुध्द-

गैरअर्जदार - कोणीही नाही.

प्रकरण : वारस प्रमाण-पत्र मिळणें बाबत.

सर्व संबंधितांस या जाहीर प्रगटणांद्वारे कळविण्यांत येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेंसाठी ॲड. वाय. आर. जावळे, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयांत अर्ज केलेला आहे. मयत सांडू शंकर काळे हे दि. २९/०५/२००० रोजी मोजे. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर येथे त्यांचा मुत्यु झालेला असुन, त्यांच्या पश्चात वरोल अर्जदार हे वारस आहे असा अर्ज न्यायालयांत वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क्रं. १ ते ३ हे मयत दामोधर पांडुरंग काळे यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकिय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्यांकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहिर प्रगटनांद्वारे प्रसिध्द झाल्यांपासुन ३० दिवसांच्या आंत या न्यायालयांत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यांसह ऊजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशिररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यांत येईल.

पुढील तारीख :- ३०/०७/२०२५.

आज दि. २४/०६/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यांसह दिले.

विभागीय लिपीक, — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय, क. स्तर, सोयगांव.

अग्रलेख...

# मुद्दा देशाच्या प्रतिमेचा आणि प्रतिष्ठेचा...

शेजारधर्म आणि आतिथ्यशीलता ही भारताची केवळ राजकीय धोरणे नव्हेत. ती तर देशाची संस्कृती आहे. अतिथि देवो भव हा केवळ विचार नाही, तर तो या देशाच्या जनजीवनाचा संस्कार आणि आचार आहे. या संस्कारामुळेच, वसुधैव कुटुम्बकम् ही या देशाची सामाजिक भावना आहे आणि ती जोपासून जगाला देशाच्या आतिथ्यशीलतेची, संस्कृतीची आणि अतिथींना देव मानण्याच्या संस्काराची ओळख करून देणारी धोरणे केंद्र सरकारनेही आखली आहेत. म्हणूनच, शेजारधर्म आणि आतिथ्य ही राजकीय धोरणे नसून, सांस्कृतिक परंपरेच्या पालनाची जबाबदारी समजून ती पार पाडण्यासाठी जेव्हा केंद्र सरकार जाणीवपूर्वक प्रयत्न करत असते, तेव्हा त्या प्रयत्नांस समाजाच्या सहकार्याची आणि अंमलबजावणीच्या भावनांचीही अपेक्षा असते. वसुधैव कुटुम्बकम् हा आपल्या आंतरराष्ट्रीय धोरणाचा भाग आहे. सर्वे सुखिनः भवन्तु, म्हणजे केवळ देशाची जनता नव्हे, तर मानवजात सुखी, समाधानी असावी, असा सांस्कृतिक विचार हा सरकारच्या धोरणाचा भाग असावा ही सरकारची धारणा आहे. कारण, वसुधैव कुटुम्बकम् आणि सर्वे सुखिनः भवन्तु या सूत्रांना प्रमाण मानणाऱ्या आध्यात्मिक व सांस्कृतिक मूल्यांवर सरकारची आणि बहुसंख्य समाजाचीही निष्ठा आहे. या धारणेतूनच जगाचा विश्वास संपादन करता येईल, जगाला भारताच्या संस्कृतीची ओळख करून दिल्यावर आणि येथील परंपराची समृद्धी जगास दाखवून दिल्यानंतरच देशाला जागतिक स्तरावरील प्रतिष्ठा मिळवून देणे सोपे होईल, यावर सरकारचा ठाम विश्वासही आहे. त्यामुळेच, जेव्हा उभे जग भारताकडे या संस्कृती आणि परंपरांच्या परिचयातून मिळालेल्या नव्या दृष्टीकडून पाहात असते, तेव्हा जगाच्या भारताविषयीच्या विश्वासास कोठेही तडा जाणार नाही असा अनुभव आला पाहिजे, याकरिता प्रयत्न होणे गरजेचे असते. एका बाजूला देशाला भेट देणाऱ्या परदेशी पाहुण्यांना आपल्या समृद्ध परंपरा, प्राचीन संस्कृतीची मानचिन्हे आणि समाजव्यवस्थेची वैशिष्ट्ये उलगडून दाखविण्याकरिता धोरणात्मक बाबी म्हणून काही गोष्टी राजशिष्टाचारातही सामील करून घेतल्या जात असताना, त्याला गालबोट लागावे असे काही घडू नये ही अपेक्षा गैरलागू नाही. कोणे एके काळी, भारतात काठीस सोन्याचे गाठोडे बांधून कोठेही निर्धास्तपणे पदभ्रमण करता येईल एवढी आश्वस्त सुरक्षितता होती, असे सांगितले जाते. त्या आश्वस्ततेमागेही, वसुधैव कुटुम्बकम् आणि अतिथि देवो भव या सामाजिक संस्काराचाच प्रभाव होता, यात शंका नाही. कारण याच भावनेमुळे अतिथीच्या रूपाने आलेला यात्रेकरू, पर्यटक किंवा पाहुण्याचे आदरातिथ्य केले जात असे. ही संस्कृती कालांतराने धूसर होत गेली आणि अतिथींची सुरक्षितता हा एक चिंतेचा विषय होऊन गेला. हा बदल झपाट्याने घडलेला नाही, पण काळाच्या वेगाहूनही या बदलाचा वेग अधिक होता, हे अमान्यदेखील करता येणार नाही. आता पर्यटकांची सुरक्षितता जपण्याचे एक मोठे आव्हान सर्वत्र समोर उभे ठाकले असून, समाजाची बदलती मानसिकता हेदेखील त्यामागच्या अनेक कारणांपैकी एक कारण ठरले आहे.

गेल्या काही दशकांत अशा विकृती बळावत चालल्यामुळेच, भारतात येणाऱ्या परदेशी पर्यटकांच्या मनातही असुरक्षिततेच्या भावनांनी घर केले आहे. ही देशाच्या सांस्कृतिक प्रतिष्ठेस धक्का लावणारी आणि जगाच्या नजरेसमोरील भारताच्या प्रतिमेस लांछन ठरणारी बाब आहे. विकृतीने वखवखलेल्या मानसिकतेमुळे परदेशी महिला पर्यटकांना अनेक प्रेक्षणीय पर्यटनस्थळांना भेटी देण्याची भीती वाटू लागली आहे आणि गुन्हेगारी, दहशतवादासारख्या नव्या संकटांचे सावट सर्वत्र पसरल्यामुळे पर्यटकांनी अनेक प्रेक्षणीय स्थळांकडे पाठ फिरविण्यास सुरुवात केली आहे. गेल्या ८ मार्च रोजी, आंतरराष्ट्रीय महिला दिन जगभर साजरा होत असताना आणि महिला सक्षमीकरणाच्या आणाभाका घेतल्या जात असताना कर्नाटकच्या हम्पी या जगप्रसिद्ध पर्यटनस्थळी काही विकृतांनी एका इस्रायली महिलेसह दोन महिलांवर पाशवी बलात्कार केला आणि त्यांच्यासोबतच्या तिघांना मारहाण करून तुंगभद्रा कालव्यात फेकून दिले. या घटनेत एकाचा मृत्यू ओढवला. गेल्या वर्षीच्या मार्चमध्ये झारखंडमधील पर्यटनस्थळी पतीसोबत फिरावयास गेलेल्या एका परदेशी महिलेवर सामूहिक बलात्कार झाला. गोव्यामध्ये परदेशी पर्यटकांना सुरक्षिततेची चिंता सतावत असते. उत्तर भारतातील अनेक पर्यटनस्थळांत अशा घटना वारंवार घडल्याने, वसुधैव कुटुम्बकम् या संस्कृतीची ओळख जगाला पटविण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या भारताची प्रतिष्ठा पणाला लावणाऱ्या या घटना लाजिरवाण्या ठरल्या आहेत. केवळ मानसिक विकृती हेच या सांस्कृतिक वारशासमोरील आव्हान नाही. दहशतवादासोबतच देशाच्या काही राज्यांत उफाळलेल्या नक्षलवादी कारवाया आणि हिंसाचारामुळेदेखील परदेशी पर्यटकांच्या सुरक्षिततेचा मुद्दा गंभीर बनला आहे.

कदाचित यामुळेच, गेल्या सुमारे तीन महिन्यांत भारतभेटीवर आलेल्या अमेरिकन पर्यटकांना सावध राहण्याच्या आणि भारतातील काही महत्त्वाच्या पर्यटनस्थळांकडे चक्क पाठ फिरविण्याचा सल्ला अमेरिकेने जारी केला आहे. बलात्कार ही भारतामध्ये वेगाने फैलावणारी गुन्हेगारी विकृती असून, हिंसाचार, लैंगिक अत्याचारासारख्या घटना भारताच्या पर्यटनस्थळांवर घडत असतातच, पण आता त्यामध्ये दहशतवादी हल्ल्यांचीही भर पडल्याने अमेरिकेतून भारत भेटीवर गेलेल्या पर्यटकांनी सावध राहावे व अशा स्थळांना भेटी देणे टाळावे अशा स्पष्ट सूचना अमेरिकेच्या भारतातील वाणिज्य दूतावासाकडून जारी करण्यात आल्या आहेत. ग्रामीण भारतात फिरावयास जाणाऱ्या अमेरिकी नागरिकांच्या सुरक्षिततेची काळजी वाहण्याकरिता अमेरिकेकडे उपलब्ध असलेली साधने मर्यादित असल्याने पर्यटकांनी स्वतःच आपली काळजी घ्यावी, एकट्यादुकट्याने फिरू नये, विशेषतः महिला पर्यटकांनी सुरक्षित प्रवासाची खात्री करून मगच प्रवासाचा बेत आखावा, अशा सूचना अमेरिकेने गेल्या आठवड्यात जारी केल्या होत्या. पहलगाम येथे गेल्या २२ एप्रिलला दहशतवाद्यांनी पर्यटकांना लक्ष्य करून नियोजित हल्ला केल्यामुळे, दहशतवादी हल्ल्याचे संकट कोठूनही कोसळू शकते, याची जाणीवही करून देण्यात आली आहे. आता तर, इस्रायल-इराण यांच्यातील संघर्ष तीव्र होत असताना आणि अनेक ठिकाणी अमेरिकेच्या विरोधात आंदोलने, निदर्शने वगैरे होण्याची शक्यता असताना अमेरिकेतील पर्यटकांना सार्वत्रिक सावधगिरीच्या सूचना जारी करण्यात आल्या आहेत.

आदरातिथ्य, पाहुणचार, शेजारधर्म या आदर्श समाजव्यवस्थेच्या संकल्पना आहेत. भारतात या व्यवस्थेचा वारसा कित्येक पिढ्यांनी जपला आहे, जोपासला आहे आणि मोठ्या विश्वासाने पुढील पिढीच्या हवाली केला आहे. कारण या वारशामुळेच, संस्कृतिसंपन्न देश ही भारताची ओळख टिकून राहिली आहे. जगातील अनेक संस्कृती काळाच्या प्रवाहासोबत नष्ट झाल्या, काही संस्कृतींच्या ऱ्हासाची सुरुवात झाली आहे. भारत हा आपल्या संस्कृतीचा आणि परंपरांचा हजारो वर्षांचा वारसा अभिमानाने सांगू शकणारा जगाच्या पाठीवरील एकमेव देश असून ही संस्कृती व परंपरा हेच देशाच्या प्रतिष्ठा उंचावण्याचे साधन भारताकडे असताना, काही विकृतींच्या विकाराने पछाडलेल्यांमुळे त्यास गालबोट लागता कामा नये. अमेरिकेतील पर्यटकांना भारतास भेट देण्याआधी अमेरिकेने दिलेल्या सावधगिरीच्या सूचना पाहता, या देशाच्या संस्कृती आणि प्रतिष्ठेच्या अभिमानावरच प्रश्नचिन्हे उमटविली आहेत. अमेरिकेने प्रवासी पर्यटकांकरिता जारी केलेला हा फतवा त्याचेच संकेत देणारा आहे. गेल्या काही वर्षांत, भारताकडे साशंकतेने पाहणारा संपूर्ण जगाचा चष्मा पुसून लखलखीत करण्याकरिता केंद्र शासन हरतऱ्हेचे प्रयत्न करत आहे. त्यामध्ये यशदेखील येत आहे. मने जिंकून आणि हृदये काबीज करून जग जिंकता येते, जगाला आपलेसे करता येते या भारतीय संस्कारांची जाणीव आता कुठे जागी होऊ लागली आहे. परस्परांशी नवी नाती जोडण्याची नेहमीची वहिवाट मोडून नव्या वाटा, नवे प्रघात प्रस्थापित केले जात आहेत. अशा परिवर्तनाच्या काळास, संस्कृतीचे भान विसरलेल्या विकृतीचे गालबोट लागणे परवडणारेदेखील नाही.

आंतरराष्ट्रीय

# मुस्लिम देश एकत्र का येत नाहीत?

प्रा. जयसिंग यादव

मुस्लिम देशांनी परस्परांना सांभाळून घ्यावे, एखाद्या मुस्लिम देशावर अन्याय होत असेल, तो संकटात असेल, तर त्याला मदत करावी, याची चर्चा गेल्या पन्नास वर्षांपासून सुरू आहे. पाकिस्तानमध्ये झालेल्या मुस्लिम देशांच्या परिषदेत १९७४ मध्ये झुल्फिकार अली भुट्टो यांनी या मुद्याला सर्वांत अगोदर वाचा फोडली; परंतु प्रत्यक्षात मुस्लिम राष्ट्रे कधीच एकत्र आली नाहीत. उलट, अमेरिकेने त्यांना परस्परांविरोधात झुंजत ठेवले. अमेरिकेला स्वतःचे तेलसाठे सापडले नव्हते, तेव्हा आखाती देशांची मदत लागायची. आताही इस्रायलने इराणवर हल्ला केल्यानंतर इराणचे सर्वोच्च नेता अयातुल्ला खामेनी यांनी मुस्लिम राष्ट्रांना इस्रायलविरोधात एकत्र येण्याचे आवाहन केले. मात्र सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिरातीसारखी राष्ट्रे अजूनही इस्रायलविरोधात इराणच्या बाजूने एकत्र येण्याची शक्यता नाही. इस्रायलविरुद्ध एकत्र येणे इस्लामिक देशांना इतके कठीण का आहे? पुन्हा एकदा इस्लामिक देशांनी इस्रायलविरुद्ध एकत्र यावे, अशी पाकिस्तानची इच्छा आहे. पाश्चिमात्य देशांनी स्वतःच्या इच्छेनुसार अनेक इस्लामिक देशांमध्ये एक एक करून सत्ता बदलली. इराक, लिबिया आणि सीरियामध्ये पाश्चिमात्य विरोधी सरकारे नाहीत आणि आता इराणमध्येही तेच घडताना दिसते. अफगाणिस्तानातील अमेरिकेच्या लष्करी कारवाईत पाकिस्तानही मदत करत होता. इस्रायलला मान्यता देणारा तुर्कस्तान हा पहिला मुस्लिमबहुल देश होता. इस्रायलने १२ जून रोजी इराणवर हल्ले सुरू केले. प्रत्युत्तरादाखल इराणनेही इस्रायलवर हल्ला केला. दोन्ही देशांमधील संघर्षाचा परिणाम पश्चिम आशियात जाणवत आहे. अनेक लोक हा इस्लामविरुद्धचा संघर्ष मानत आहेत.

गेल्या आठवड्यात पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी राष्ट्रीय सभेत सर्व मुस्लिम देशांना इस्रायलविरुद्ध एकत्र येण्याचे आवाहन केले. अशा परिस्थितीत प्रश्न उद्भवतो की इस्लामिक देश एकत्र येऊ शकतील का? दुसरा प्रश्न असा की पाकिस्तान वारंवार इस्लामिक देशांच्या एकतेबद्दल का बोलत आहे? या मुद्यावर जगभरातील इस्लामिक देशांनी इस्रायलविरुद्ध एकत्रितपणे प्रतिक्रिया दिली पाहिजे, असे पाकिस्तानला वाटते; परंतु सध्याची परिस्थिती अशी आहे की इस्लामिक देश परस्परसंघर्ष आणि मतभेदांमध्ये अडकले आहेत. पाकिस्तान, सौदी अरेबिया आणि इराणमधील स्पर्धा अजूनही संपलेली नाही. ही स्पर्धा सुन्नी विरुद्ध शियापासून सौदी अरेबियाच्या राजेशाही विरुद्ध इराणच्या इस्लामिक क्रांतीपर्यंत आहे. अझरबैजान हा शियाबहुल मुस्लिम देश आहे; पण तो इस्रायलच्या जवळ आहे, तर शियाबहुल इराणशी त्याचे तणावपूर्ण संबंध आहेत. अमेरिकेने इराकवर हल्ला केला आणि सद्दाम हुसेनला फाशी दिली, तेव्हा इराण अमेरिकेच्या विरोधात नव्हता. इराणमध्ये इस्लामिक क्रांती झाली, त्याच वर्षी, इजिप्तने इस्रायलला एक राष्ट्र म्हणून मान्यता दिली आणि त्याच्याशी राजनैतिक संबंध



प्रस्थापित करण्याचा निर्णय घेतला. १९९४ मध्ये जॉर्डननेही इस्रायलला मान्यता दिली. २०२० मध्ये संयुक्त अरब अमिराती, बहरिन, मोरोक्को आणि सुदान यांनीही इस्रायलशी राजनैतिक संबंध प्रस्थापित केले. तुर्कस्तानने इस्रायलसोबत राजनैतिक संबंध प्रस्थापित केल्याबद्दल संयुक्त अरब अमिराती आणि बहरिन टीका करत होते.

तुर्कस्तान आणि इस्रायलमध्ये १९४९ पासून राजनैतिक संबंध आहेत. इस्रायलला मान्यता देणारा तुर्कस्तान हा पहिला मुस्लिमबहुल देश होता. आताही इराणचा अणुकार्यक्रम केवळ इस्रायलसाठीच नाही, तर संपूर्ण जगासाठी धोका असल्याचे अनेक मुस्लिम देशांचे मत आहे. अशा परिस्थितीत, इस्लामिक देश इस्रायलविरुद्धचे सर्व मतभेद आणि विरोधाभास विसरतील का, असा प्रश्न उद्भवतो. सध्या पाकिस्तानवर खूप दबाव आहे. भारताबरोबर झालेल्या लष्करी संघर्षात त्याचे बरेच नुकसान झाले आहे. पाकिस्तान आपले महत्त्व टिकवून ठेवण्यासाठी मुस्लिम देशांच्या एकीकरणाची विधाने करत राहतो. त्याने तुर्कस्तानशी जवळीक वाढवली आहे आणि इराणशीही संबंध वाढवू इच्छितो. पूर्वी पाकिस्तान अफगाणिस्तानला महत्त्व देत असे. त्यातून त्याला सामरिक फायदा मिळतो, असा युक्तिवाद होता. अनेक देश मानतात की इराण आणि इस्रायलमधील मुद्दा इस्लामिक नाही. हा दोन देशांमधील मुद्दा आहे. ही एक धोरणात्मक स्पर्धा आहे. ती खूप जुनी स्पर्धा आहे. ती प्रादेशिक नेतृत्वालाही महत्त्व देते. त्याला इस्लामिक आवरण देण्यात काही अर्थ नाही. दुसरीकडे, तुर्कस्तानचे पाकिस्तानशी असलेले संबंध इस्लाममुळे नाहीत. पाकिस्तानचे इराणशी असलेले संबंधही इस्लाममुळे नाहीत. प्रत्येक अरब देशात अमेरिकन सैन्य आहे. संपूर्ण आखातात ७० हजार अमेरिकन सैनिक आहेत. त्यांना अतिरिक्त प्रादेशिक अधिकार आहेत. याचा अर्थ त्या ठिकाणचे नियम आणि कायदे त्यांना लागू होत नाहीत. या देशांमध्ये अमेरिकेचे लष्करी तळ आहेत आणि हे कसे हाताळायचे हे ठरवण्याचा पूर्ण अधिकार त्यांना आहे.

आजघडीला कोणताही अरब देश अमेरिकेला रोखू शकत नाही. इस्रायली ड्रोन जॉर्डनमार्गे येत आहे. हे ड्रोन थांबवण्याची जबाबदारी जॉर्डनची होती. अनेक ड्रोन जॉर्डनमध्येच पडतात; परंतु तो त्याला विरोध करत नाही. तेल अवीव आणि तेहरान परस्परांपासून दोन हजार किलोमीटर अंतरावर आहेत; पण लढाई ड्रोनने होत आहे. इराणची तुलना इराकशी होऊ शकत नाही. कारण इराकबरोबरचे युद्ध हे पूर्णपणे अमेरिकेचे युद्ध होते. १९६७ पूर्वी पॅलेस्टाईन आणि इस्रायलची समस्या ही एक अरब समस्या होती; परंतु १९६७ मध्ये अरब-इस्रायल युद्धात इस्रायलच्या विजयानंतर ती फक्त इस्रायल आणि पॅलेस्टाईनची समस्या राहिली आहे. इस्रायल आणि इराणमधील युद्धामुळे पाकिस्तानचे महत्त्व वाढल्याचे बोलले जात आहे. या प्रकरणात पाकिस्तानने इराणला कोणत्याही प्रकारे मदत करू नये असे पश्चिमेकडील देशांना वाटते आणि इराणला पाकिस्तानने त्यांच्यासोबत उभे राहावे असे वाटते. शीतयुद्धकाळात पाकिस्तान अमेरिकेच्या गटात होता आणि इराणसोबत जाणे त्याच्यासाठी इतके सोपे नव्हते. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आधीच इराणचा अणुकार्यक्रम नष्ट करण्याचा निर्णय घेतला आहे आणि त्यांना पाकिस्तानची मदत हवी आहे. इराणचे सध्याचे सरकार सत्तेत राहिल्यास येत्या काळात पाकिस्तानची इराणशी जवळीक आणखी वाढेल, अशी भीती त्याला वाटते. सौदी अरेबिया आणि इराणमधील संबंध सुधारण्यासाठी सकारात्मक वातावरण निर्माण होईल.

इराण आणि सौदी अरेबियामधील शत्रुत्वाचे मुख्य कारण शिया विरुद्ध सुन्नी असे नव्हते. भू-राजकीय कारणे अधिक महत्त्वाची होती. कतारमध्ये अमेरिकेचा हवाई तळ आहे. इस्रायलने या हवाई तळाचा वापर केला, तर कोणीही थांबवू शकणार नाही. कतार तसे करण्याच्या स्थितीतही नाही. चीनच्या पुढाकाराने इराण आणि सौदी अरेबियामधील अंतर कमी झाले आहे; परंतु या प्रदेशातील इराणची भीती अद्याप कमी झालेली नाही. अरबेशियातील इस्लामिक देशांना इस्रायल आणि इराण दोघांचीही भीती आहे. मार्च २००३ मध्ये अमेरिकेने इराकवर हल्ला केला. त्या वेळी इराणने या हल्ल्याला विरोध केला नाही. त्याचे कारण इराण सद्दाम हुसेनशी जुळवून घेत नव्हता आणि अमेरिकेने हुसेनला फाशी दिली, तेव्हाही इराणने निषेध केला नाही. इराण नेहमीच सद्दाम हुसेनला धोका मानत असे. अमेरिकेची स्वतःची काही कारणे होती. इराणने नेहमीच इराकमधील शिया लोकसंख्येला पाठिंबा दिला आहे. सध्या इराण पूर्णपणे एकाकी पडला आहे. आता इराणला थेट अमेरिकेशी सामना करावा लागू शकतो. असे झाल्यास हा संघर्ष खूप निर्णायक ठरू शकतो. इस्लामिक देशांमधील मतभेद इतके खोल आहेत की ते त्यातून बाहेर पडू शकलेले नाहीत. 'ओआयसी' आणि 'अरब लीग'सारख्या संघटना फक्त नावापुरत्याच राहिल्या आहेत.

(लेखक राज्यशास्त्राचे प्राध्यापक आहेत.)

वेध

# पिनकोडचा नवा अवतार डिजिपिन

चंद्रकांत लोहाणा

भारतीय टपाल विभागही हायटेक होण्याच्या मार्गावर आहे. नव्हे ते झाले आहे. यापुढे आता पिनकोडची जागा नव्या स्वरूपाचे डिजिपिन घेणार आहे. भारतामध्ये सर्वप्रथम १५ ऑगस्ट १९७२ रोजी पिनकोड प्रणाली सुरू झाली. शहराची आणि गावाची अचूक ओळख व्हावी व पत्र किंवा पार्सलचे अचूक वितरण व्हावे, हा यामागील प्रमुख उद्देश होता. त्यावेळी दुसरी कोणतीच संसाधने उपलब्ध नसल्याने सहा अंकी पिनकोड अतिशय महत्त्वाचा समजला जायचा. वितरण प्रणालीमध्ये पिनकोड हा एकमेव पर्याय आणि आधार होता. पिनकोडची निर्मिती हा भारतीय टपाल विभागाच्या प्रवासामधील त्यावेळचा एक मैलाचा दगड आहे. परंतु, मागील काही वर्षामध्ये विज्ञानाने एवढी प्रगती केली की, संपूर्ण जग एका क्लिकने तळहातावर आले. पूर्वी भारतामधील शहरे लहान होती. लोकसं'याही आटोक्यामध्ये होती. परंतु, आधुनिक युगामध्ये झपाट्याने होणारी शहराची वाढ आणि अफाट लोकसं'या बघता वितरण प्रणालीमध्ये अचूकता आणण्यासाठी टपाल विभागाने हायटेक होत अक्षर आणि अंकाचा नवीन डिजिपिन प्रणाली सुरू केली आहे. डिजिपिन ही आता देशामधील नवी पत्ता प्रणाली ठरणार आहे.




पारंपरिक सहा अंकी पिनकोडमध्ये संपूर्ण शहराच्या क्षेत्राचा समावेश व्हायचा. त्यामुळे त्याची व्याप्ती फार मोठी होती. नेमका पत्ता शोधायला वेळ जायचा. नवीन १० अंकी डिजिपिन घराचे किंवा व्यवसायचे अचूक स्थान दर्शविते. भारतीय टपाल विभागाने वितरणामध्ये अचूकता आणण्यासाठी व नेमके स्थान समजण्यासाठी डिजिपिन प्रणाली सादर केली आहे. अनेकदा बरोबर पत्ता सांगून किंवा लिहून ऑनलाईन वितरण करणाऱ्यांना कधी कधी घराचा अथवा व्यावसायिक ठिकाणाचा पत्ता मिळत नाही.

ऑनलाईन वितरणाची सेवा अचूक आणि वेगाने व्हावी यासाठी टपाल विभागाचा नवीन डिजिपिन अतिशय उपयुक्त ठरणार आहे. या डिजिपिनमुळे एखाद्या परिसराची किंवा ठिकाणाची अचूक ओळख होण्यास मोलाची मदत होणार आहे. भारतीय टपाल विभाग गाव, जंगल किंवा समुद्र किनाऱ्यापर्यंतही या डिजिपिनमुळे सहज पोहचू शकते, एवढा हा डिजिपिन अचूक आणि सक्षम आहे. या नवीन प्रणालीमुळे रुग्णवाहिका, अग्निशमन दल व अन्य आपत्कालीन सेवांना फायदा होणार आहे. तसेच लॉजिस्टिक्स, कुरिअर सेवा, वितरण व कॅब बुकसाठीही या डिजिपिनचा वापर करता येणार आहे. त्यामुळे दुर्गम भागामधील वितरण सेवा अधिक सुलभ आणि जलद होणार आहे. डिजिपिनमुळे चुका अतिशय कमी होऊन कार्यक्षमता आणि वितरण सेवेचा वेग वाढण्यास मोलाची मदत होणार आहे.


सहा अंकी पारंपरिक पिनकोड एका मोठ्या शहरासाठी वापरला जात असे. परंतु, काळ बदलत गेला आणि पिनकोडची क्षमता कमी पडू लागली. त्यामुळे भारतीय टपाल विभागाने आयआयटी हैदराबाद आणि इस्रोसोबत मिळून ही नवीन डिजिपिन प्रणाली विकसित केली आहे. ती अतिशय अचूक आहे. या डिजिपिन प्रणाली अंतर्गत संपुर्ण देशाला ४ मीटर बाय ४ मीटर आकाराच्या लहान लहान भागामध्ये विभाजित केले आहे. प्रत्येक भागाला एक युनिक आयडी देण्यात आला आहे. हा आयडी १० अक्षरांचा एक कोड असून, हा कोड लॅटीट्युड आणि लॉगीट्युडवर आधारित राहणार आहे. या प्रणालीमुळे एखाद्या गल्लीबोळातील ठिकाण अचूकपणे शोधता येऊ शकते, एवढी ही प्रणाली कार्यक्षम आहे. आपला डिजिपिन तयार करण्यासाठी शासनाने एक अधिकृत वेबसाईट सुरू केली असून, या वेबसाईटवर प्रत्येक जण आपल्या लोकेशननुसार हा नवीन डिजिपिन तयार करू शकतो. हा डिजिपिन कोणासही ऑफलाईनही वापरता येणार आहे. आपल्या घराचा पत्ता अचूक शोधण्याची ही नवीन प्रणाली भविष्यामध्ये अतियश उपयुक्त ठरणार आहे. जगामध्ये अद्याप कोणत्याच देशाने ही डिजिपिन प्रणाली सुरू केली नाही. भारतीय संशोधकांनी जगात आघाडी घेत ही प्रणाली विकसित केली आहे. त्यामुळे भारताची जगाला ही एक अमूल्य देण असणार आहे. जगातील विकसित देशांनी भविष्यामध्ये या डिजिपिनची कॉपी केल्यास नवल वाटू नये, एवढी ही डिजिपिन प्रणाली अचूक आहे.

९८८१७१७८५६

प्रासंगिक

# अनंत प्रश्न, अफाट प्रयत्न पण अवास्तव अपेक्षा नकोत

विश्वास पाठक



विश्वास पाठक

मुंबईची जीवनवाहिनी असलेल्या लोकल ट्रेनचा नुकताच एक दुर्दैवी अपघात घडला. मुंब्रा स्टेशनजवळ लोकलमधून पडून चार प्रवाशांचा मृत्यू झाला आणि नऊ प्रवासी जखमी झाले. मृतांना मी श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबियांवर किती मोठे संकट ओढावले याची आपण कल्पना करू शकतो. बातम्यांनुसार दोन लोकल गाड्या विरुद्ध दिशेने एकमेकाच्या जवळून जात असताना एका गाडीतील प्रवाशाची बॅग दुसऱ्या लोकलमधील प्रवाशांना लागल्यामुळे तेराजण खाली पडले व त्यापैकी चारजणांचा मृत्यू झाला. लोकल गाड्यांमधून प्रवासी दारात लटकून प्रवास करतात, त्यामुळे असे घडू शकते. चौकशीअंती सत्य समजेल.

मुंबईत रेल्वेच्या लोकल सेवेची सुरुवात ३ फेब्रुवारी १९२५ रोजी झाली. स्थापनेपासूनच लोकल रेल्वेसेवा मुंबईकरांची जीवनवाहिनी बनली. स्वस्त आणि गतीमान प्रवास हे लोकलचे वैशिष्ट्य आहे. मुंबईकराला वेळेचे महत्त्व सर्वाधिक असते. वेळ वाचविणाऱ्या लोकलमध्ये गर्दी असली तरी ती सहन करून लाखो मुंबईकर लोकलने प्रवास करतात. सामान्यतः बाराशे प्रवाशांची क्षमता असलेल्या लोकलगाडीतून पीक अवरमध्ये सुमारे साडेतीन हजार प्रवासी प्रवास करतात. तीनपट प्रवासी प्रवास करतील तर अवस्था होईल हे स्पष्ट आहे. मुंबई महानगर क्षेत्रातील २ कोटी ६० लाख लोकांच्या सेवेसाठी दररोज लोकलच्या ३२१६ फेऱ्या होतात. मुंबई महानगर क्षेत्राची लोकसंख्या ही ऑस्ट्रेलिया देशाच्या लोकसंख्येएवढी आहे. लोकलमधून दररोज ६८ लाख प्रवासी प्रवास करतात म्हणजे डेन्मार्क किंवा बल्गेरिया किंवा सर्बिया किंवा काँगो अशा संपूर्ण देशाने प्रवास करण्यासारखे आहे. मुंबईच्या लोकल रेल्वेचा अचाट कारभार आहे.

मुंब्र्याजवळच्या लोकल रेल्वेच्या अपघातामुळे मुंबई हादरली. मुंबईत प्रत्येक कुटुंबातील कोणी तरी दररोज लोकलने प्रवास करतो. आपल्याही बाबतीत असा अपघात घडू शकतो, या कल्पनेने मुंबईकर हादरले. रोज लोकलच्या गर्दीतून कसा प्रवास करतो हे जाणवले. अस्वस्थ वाटणे स्वाभाविक आहे. पण वर्षानुवर्षे असंख्य अडथळ्यांवर मात करत मुंबईकरांची सेवा करणाऱ्या रेल्वेवर एखाद्या अपघाताच्या निमित्ताने टीकेचा भडीमार करणे धक्कादायक होते.

वळणदार मार्गावर लोकल गाड्या एकमेकांच्या जवळून गेल्याने अपघात घडला. हे वळण आधीच दुरुस्त करायला हवे होते, आता तरी दुरुस्त करा अशी मागणी करण्यात आली. कोणत्याही रस्ते किंवा रेल्वे मार्गावर वळणे, चढ उतार आणि पूल असतातच. येथेही वर्षांनुवर्षे वळणावरून लोकल धावत होत्याच. रेल्वेमार्गातील एखादे वळण हटवून सरळ मार्ग करण्यासाठी जागा उपलब्ध आहे का, तांत्रिक समस्या काय येतील अशा बाबींचा तरी विचार करायचा होता. पण अपघात झाला की रेल्वेवर तुटून पडावे, असा प्रकार झाला.

**रेल्वेचा अफाट पसारा**

एक अपघात घडला आणि अनेकांनी रेल्वेवर राग काढण्यास सुरुवात केली. सामान्य प्रवाशांपासून एखाद्या पक्षाच्या प्रमुखापर्यंत अनेकांनी चिडचिड केली. जणू काही रेल्वेला प्रवाशांसाठी अनेक गोष्टी सहज करणे शक्य आहे पण रेल्वे तसे करत नाही म्हणून प्रवाशांचे हाल होतात, असे गृहित धरून टीका केली. हे गृहितकच चुकीचे आहे. लोकल रेल्वेचा अफाट पसारा आहे. मुंबईचे भौगोलिक क्षेत्र चिंचोळे आहे. नवे रेल्वेमार्ग उभारणे किंवा विस्तार करण्यासाठी जमीन उपलब्ध होणे ही मोठी समस्या आहे. उपलब्ध मर्यादित जागेत आणि प्रवाशांचा लोंढा चालू असताना रेल्वेला आपले विकास प्रकल्प राबवावे लागतात, ही मर्यादा तरी ध्यानात घ्यावी.

जागेच्या मर्यादेसोबतच रेल्वेला महानगरपालिका, मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण (एमएमआरडीए), राज्य सरकार यांच्या सोबत समन्वयाने काम करावे लागते. पावसाच्या पाण्यात रेल्वे रूळ बुडाले की लोकल ठप्प होते, पण पावसाच्या पाण्याचा निचरा करण्याची व्यवस्था निर्माण करण्याचा अधिकार आणि जबाबदारी महानगरपालिकेची आहे. अशा असंख्य मर्यादा असूनही मुंबईत रेल्वे रोज लोकलच्या ३२१६ फेऱ्या चालविते. या गाड्यांमधील अंतर केवळ तीन ते पाच मिनिटांचे असते. त्यासोबतच मुंबईत रोजच्या ४३५ मेल अथवा एक्स्प्रेस गाड्या धावतात आणि सुमारे ११० मालवाहतूक रेल्वेगाड्यांचीही येजा चालू असते.

एक अपघात घडला आणि रेल्वेने काय केले पाहिजे, याबद्दल सूचनांचा भडिमार सुरू झाला. मुंब्र्यासाठी स्वतंत्र गाडी सोडा, अशीही मागणी झाली. सध्या मुंबईत रेल्वेची लोकलची ३६ टर्मिनल आहेत. केवळ ठाणे, कल्याण, कर्जत किंवा बोरिवली, विरार एवढीच टर्मिनल्स लोकलसाठी नाहीत याची नोंद घ्यावी. एका पाठोपाठ तीन ते पाच मिनिटांच्या अंतराने सुरक्षितपणे लोकल गाड्या चालवायच्या असताना एखादे टर्मिनल वाढविण्याचा निर्णय सोपा नाही. अनेक तांत्रिक अडचणी निर्माण होतात.

मुंब्र्याच्या घटनेनंतर रागाच्या भरात अनेकांनी भलतेच मुद्दे उपस्थित केले. कोणी म्हणे की, एसी लोकल सुरू केल्यामुळे साध्या गाड्यांवर ताण आला आणि गर्दी वाढली. मुंबईत लोकलच्या एकूण ३२१६ फेऱ्यांपैकी केवळ १८९ वातानूकुलित अर्थात एसी आहेत. केवळ पाच टक्के फेऱ्या एसी करण्याने साध्या गाड्यांमधील गर्दी अनेकपटींनी कशी वाढू शकते ?

**प्रवाशांसाठी अनेक प्रकल्प सुरू**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात २०१४ साली केंद्रात भारतीय जनता पार्टी आघाडीचे सरकार सत्तेवर आल्यापासून गेल्या अकरा वर्षात रेल्वे प्रवाशांसाठी अनेक सुविधा सुरू करण्यात आल्या. मुंबईच्या लोकल प्रवासात प्लॅटफॉर्म बदण्यासाठी जिने चढावे लागतात. प्रवाशांना विशेषतः ज्येष्ठ नागरिक, लहान मुले व महिलांना जिने चढणे त्रासदायक होते. मुंबईत २०१४ पर्यंत रेल्वे स्थानकांवर प्रवाशांसाठी केवळ ३ लिफ्ट होत्या आणि गेल्या अकरा वर्षांत त्यांची संख्या १६१ झाली. त्याचप्रमाणे एस्कलेटर म्हणजे सरकते जिने ११ वरून वाढून २८५ झाले. प्रवाशांच्या सोईसाठी फूट ओव्हरब्रिजची संख्या ९४ वरून वाढवून २८९ करण्यात आली. जवळ जवळ प्रत्येक स्थानकावर उभारलेल्या लिफ्ट आणि एस्कलेटरमुळे प्रवाशांसाठी उत्तम सुविधा निर्माण झाली. तरीही लोकलचे प्रश्न सोडविण्याच्या ऐवजी प्रशासन लिफ्ट आणि एस्कलेटर उभारत आहे, अशी टीका या काळात झाली. सर्वसामान्य मुंबईकराचे जगणे लोकलवर अवलंबून आहे. लोकलसेवा उत्तम असावी, अशी अपेक्षा रास्त आहे. पण मुळात ही लोकल रेल्वेसेवा अनंत आव्हानांना तोंड देत खूपच प्रभावीपणे चालविली जात आहे, याची नोंद घेतली पाहिजे. इतकी आव्हाने असली तरी लोकल सेवा अधिकाधिक सुधारण्यासाठी रेल्वेचे अफाट प्रयत्न चालू आहेत.

नेरूळ ते खारकोपर हा १० किलोमीटरचा नवा उपनगरीय रेल्वेमार्ग गेल्या दहा वर्षात चालू झाला. तसाच खारकोपर उरण हा २९ किलोमीटरचा मार्ग. लोकमान्य टिळक टर्मिनस, परेल टर्मिनस, पनवेल कळंबोली टर्मिनस, कल्याण टर्मिनस यांच्या विस्ताराचे काम सुरू आहे. सीएसएमटी कुर्ला पाचवी आणि सहावी लाईन, मुंबई सेंट्रल ते बोरिवली सहावी लाईन, गोरेगाव ते बोरिवली हार्बर लाईनचा विस्तार, बोरिवली विरार पाचवी सहावी लाईन, विरार डहाणू तिसरी आणि चौथी लाईन, पनवेल कर्जत कॉरिडॉर, ऐरोली कळवा इलेव्हेटेड कॉरिडॉर, कल्याण आसनगाव चौथी लाईन, कल्याण बदलापूर तिसरी आणि चौथी लाईन, कल्याण कसारा तिसरी लाईन, नायगाव जुचंद्र दुहेरीकरण आणि निळजे कोपर दुहेरीकरण असे ३०१ किलोमीटर लांबीच्या विस्तारीकरणाच्या रेल्वेमार्गांचे काम सुरू आहे. लोकल ही मुंबईची जीवनवाहिनी आहे याची जाणीव ठेऊन रेल्वे प्रवाशांना अधिकाधिक सुविधा देण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करत आहे. अनंत आव्हाने आणि अफाट प्रयत्न अशी रेल्वेची स्थिती आहे. या सेवांचा लाभ घेणारे भागधारक म्हणून प्रवाशांनीही वास्तवाचे भान ठेऊन अवास्तव अपेक्षा करू नये. तीन पिढ्या रेल्वेची सेवा करणाऱ्या कुटुंबातील व्यक्ती म्हणून मी रेल्वेचे कर्मचारी किती ताणाखाली आणि जबाबदारी काम करतात हे पाहिले आहे. मी स्वतः पंधरा वर्षे मुंबईत पीक अवरमध्ये लोकल रेल्वेने प्रवास केला आहे. अनुभवाने सांगतो, रेल्वेवर भरवसा ठेवा, प्राप्त परिस्थितीत जास्तीत जास्त चांगली सेवा देण्याचा प्रयत्न रेल्वे करत आहे.

**लेखक भारतीय जनता पार्टीचे प्रदेश सहमुख्य प्रवक्ते आहेत.**

वाचक पत्रे

## व्हीआयपी रोडकडे लक्ष द्या

सोलापूर शहरातील महत्त्वाच्या गनल्या जाणाऱ्या रस्त्यांपैकी एक रस्ता म्हणजे विमानतळ ते सात रस्ता पर्यंतचा रस्ता. हा रस्ता व्हीआयपी रस्ता देखील म्हणून ओळखला जातो. या रस्त्यावर असलेला पुल गेल्या कित्येक वर्षापासून नादुरुस्त अवस्थेत आहे. या पुलावरील बाजूला असलेल्या लोखंडी बार व कंपाउंड वॉलही पडलेले आहे व रस्त्याच्या बाजूला असलेली झाडे देखील वाळुन गेलेली आहेत. या रस्त्यावरून ये जा करणारे नागरिक, मोठे नेते त्याचबरोबर माननीय मुख्यमंत्री, मा.पंतप्रधान हे देखील याच रस्त्याने शहरात येतात .मंत्र्यांना रस्त्याच्या बाजूला असलेले नादुरुस्त कंपाउंड वॉल व लोखंडी ग्रील तुटलेली दिसू नये म्हणून कापडी पडदा मारून झाकण्यात येते. नेहमी तात्पुरत्या स्वरूपात थोड्याफार प्रमाणात डागडुजी करण्यात येते. काही दिवसापूर्वी झालेले ड्रेनेजचे काम मनपाने वेळेच्या आत केले. परंतु काम पूर्ण झाल्यानंतर रस्ता डांबरीकरण करण्यात आलेला नाही. या सर्व गोष्टीचा विचार करून स्मार्ट सोलापूर सुंदर सोलापूर असताना व्हिआयपी रस्त्याकडे दुर्लक्ष करू नये, असे वाटते.

**फैय्याज शेख** / अध्यक्ष. सोलापर जिल्हा वत्तपत्र लेखक मंच. सोलापर..

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८

RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# जिल्हा व सत्र न्यायालयात आरोग्य शिबीराला उत्स्फूर्त प्रतिसाद

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा रूग्णालयाचा पुढाकार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ जून**
येथील जिल्हा व सत्र न्यायालयात आज न्यायिक अधिकारी, विधीज्ञ, न्यायालयीन कर्मचारी, पोलीस कर्मचारी व पक्षकार यांच्याकरीता सर्व रोग निदान व तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या आरोग्य शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.
या शिबिराचे उद्घाटन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश टी. एस. अकाली यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा न्यायाधीश-१ सौ. एस. एन. माने (गाडेकर), तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१ पी.जी.देशमुख, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठस्तर वि. म. मानखैर, दुसरे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठस्तर पी.बी. महाळंकर, मुख्य न्यायदंडाधिकारी सौ. ए. बी. कुरणे, सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्रीमती पी. आर. पमनानी, दुसरे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर सौ.डी. व्ही. भंडारी, तिसरे सह दिवाणी कनिष्ठ स्तर सी. एस. एस. पळसुले तसेच जेष्ठ विधीज्ञ अ‍ॅड. सतीष देशमुख, सदस्य बार कॉन्सिल ऑफ महाराष्ट्र अ‍ॅन्ड गोवा, अ‍ॅड. एस. आर. भुक्तार, अध्यक्ष, जिल्हा वकील संघ हिंगोली यांच्या प्रमुख उपस्थित करण्यात आले.
या आरोग्य शिबिरामध्ये हृदयविकार, किडनी विकार, कान, नाक, घसा विकार, त्वचा विकार, दंत विकार, स्त्री रोग, अस्थिरोग, नेत्र तपासणी तसेच रक्त तपासणी इत्यादी आरोग्यविषयक तपासण्या, प्राथमिक उपचार व सल्ला तज्ञ डॉक्टरांकडून निशुल्क देण्यात आल्या. या आरोग्य शिबिरास शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय हिंगोली येथील डॉ. फैसल सलीम खान, डॉ. विनय बगाटे, डॉ. वर्षा पवार, डॉ. अश्विनी राठोड, डॉ. खोकले व रुग्णालयातील कर्मचारी यांनी न्यायिक अधिकारी, विधीज्ञ, न्यायालयीन कर्मचारी, पोलीस कर्मचारी व पक्षकार यांची तपासणी करून त्यांना प्राथमिक उपचार व सल्ला देण्यात आला. आरोग्य शिबिरास ३१० जणांची आरोग्य तर १५० जणांची रक्त तपासणी करण्यात आली.

# शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी करण्याची राष्ट्रवादीची मागणी

## पाऊस नसल्यामुळे शेतकऱ्यांवर दुबार पेरणीची वेळ



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ जून**
राज्य शासनाने दिलेल्या आश्वासनाप्रमाणे शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी द्यावी तसेच जिल्हयत पाऊस नसल्यामुळे शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट आले आहे. दुबार पेरणीसाठी खत, बी बियाणे मोफत द्यावीत आदी मागण्यांचे निवेदन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्यावतीने तहसीलदारांना देण्यात आले.
कळमनुरी येथे जिल्हाध्यक्ष दिलीप चव्हाण यांच्या नेतृत्वात तहसीलदारांना निवेदन सादर करण्यात आले. यावेळी शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी देण्यात यावी, मृग नक्षत्र कोरडे गेल्यामुळे शेतकऱ्यांवर जिल्ह्यात दुबार पेरणीची वेळ आली आहे. त्यामुळे शेतकरी आणखीनच आर्थिक संकटात सापडला आहे. दुबार पेरणीसाठी शासनाने शेतकऱ्यांना मोफत खते, बी बियाणे पुरवावीत, नानाजी देशमुख कृषी संजीवनी पोक्रा अंतर्गत दुसरा टप्पा तत्काळ चालू करण्यात यावा, मागील काळात झालेल्या अतिवृष्टी तसेच वादळी वाऱ्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे तसेच फळबागांचे आतोनात नुकसान झाले. त्याची नुकसान भरपाई तत्काळ देण्यात यावी आदी मागण्या यावेळी करण्यात आल्या. मागण्या मान्य न केल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष दिलीप चव्हाण, डॉ.संतोष बोंढारे, जिल्हा उपाध्यक्ष अ‍ॅड. रवि शिंदे, विधानसभा अध्यक्ष गणेशराव गडदे, तालुकाध्यक्ष अवधूत निळकंठे, शहराध्यक्ष शेख बाबा, सचिन चव्हाण,अभिजीत देशमुख, प्रा.गुलाब भोयर, ख्वाजा बागवान, मोईन रिजवी, सुशील बोंढारे, सचिन चव्हाण, अंबादास बोरकर, राजू बाभळे, नदीम भाई, किशनराव वाघमारे, तुकाराम बाभळे, संतोष मगर, योगेश पाटील, लक्ष्मण पोटे, सुदर्शन वायकुळे, बाबा सिद्दीकी आदींची उपस्थिती होती.

# एका महिन्यात किमान १ हजार घरकुले पुर्ण करा- अंजली रमेश

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ जून**
हिंगोली जिल्ह्यातील पाचही तालुक्यांमधून प्रत्येक २०० याप्रमाणे एका महिन्यात १ हजार घरकुले पुर्ण करण्याचे नियोजन करण्याच्या सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांनी यांनी बैठकीत यंत्रणांना दिल्या आहेत.
येथील जिल्हा परिषदेच्या सभागृहात दि २३ जून रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये बैठक घेण्यात आली. यावेळी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अनंतकुमार कुंभार, केशव गड्डापोड, बोराटे, संजय कुलकर्णी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी दिगंबर माडे, जिल्हा जलसंधारण अधिकारी प्रियंका राजपूत यांच्यासह अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती होती.
यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांनी सर्व विभागाचा आढावा धेतला. जिल्ह्यात घरकुल योजनेची कामे तातडीने पूर्ण होण्यासाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेने दर महिन्याला पाचही तालुक्यातून किमान २०० याप्रमाणे एक हजार घरकुल पूर्ण करण्याचे नियोजन करावे तसेच घरकुलांचे बांधकाम सुरू असतांना नियमानुसार लाभार्थ्यांच्या बँक खात्यात हप्ते जमा करावेत अशा सूचना त्यांनी दिल्या.
स्वच्छ भारत मिशन कार्यालयाने जिल्ह्यातील ग्रामीण भागातून स्वच्छता व्यवस्थापन, सांडपाणी व्यवस्थापन, घनकचनरा व्यवस्थापन याकडे लक्ष द्यावे. सर्व ग्रामपंचायतीमधून स्वच्छतागृह तसेच सार्वजनिक स्वच्छतागृहे कामे पूर्ण करण्याकडे लक्ष देण्याच्या सूचना दिल्या. ग्रामपंचायत रंगरंगोटीची कामे तातडीने पूर्ण करावीत तसेच आवश्यक त्याठिकाणी दुरूस्तीची कामे पूर्ण करावीत. जिल्ह्यात लेखा विभागाकडे मोठ्या संख्येने लेखा आक्षेप प्रलंबीत असल्याच्या कारणावरून त्यांनी ाराजी व्यक्त केली. लेखा विभागाने सर्व कर्मचाऱ्यांची बैठक घेवून लेखा आक्षेप निकाली काढण्याच्या सुचनाही यावेळी अंजली रमेश यांनी दिल्या.



**हिंगोली- लाखो रूपये खर्च करून महसुल विभागाने येथील रामलीला मैदानाला संरक्षण भिंत तसेच लोखंडी गेट बसविले आहे. सदरील मैदान खेळाडूंसाठी तसेच मॉर्निंग वॉकसाठी उपलब्ध करून देण्यात आले मात्र मागील काही दिवसांपासून या मैदानात पुन्हा खाजगी वाहने पार्कींग केली जात असल्यामुळे खेळाडूंना तसेच नागरिकांना अडथळा निर्माण होत आहे. छाया- सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### पंढरपूरसाठी विशेष रेल्वेगाडी सोडा

हिंगोली- मध्य रेल्वे तर्फे आषाढी एकादशीनिमित्त एक जुलै ११ जुलैपर्यंत अकोला-पूर्णा रेल्वेमार्ग वगळून इतर मार्गाने जवळपास ऐंशी विशेष रेल्वेगाड्या पंढरपूरला जाणार आहेत. या रेल्वेगाड्या पुणे, कोल्हापूर, मिरज, लातूर, नागपूर, अमरावती, खामगाव, भुसावळ आदी ठिकाणाहून निघणार आहेत. दक्षिण मध्य रेल्वेतर्फे मागील दोन वर्ष अकोला येथून हिंगोली मार्गे पंढरपूरसाठी आषाढी एकादशी स्पेशल रेल्वे चालविण्यात आली. यामुळे अकोला, वाशिम, हिंगोली, पूर्णा आदी परिसरातील ग्रामीण भागातील वारकरी व भाविकांची मोठी सोय झाली होती. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते गणेश साहू, प्रवीण पडघन यांनी दक्षिण मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक अरूणकुमार जैन व मुख्यमंत्री देंवेंद्र फडणवीस यांना निवेदन सादर केले आहे.

### शेतकऱ्यांना बिना शर्त पीककर्ज द्या- उबाठा



हिंगोली- शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्यावतीने शेतकऱ्यांचे विना विलंब व बिना शर्त पीक कर्ज मंजूर करण्यासाठी औंढा शहरातील सर्व बँक व्यवस्थापकांना सोमवारी (दि.२३) तालुकाप्रमुख गणेश देशमुख व तालुकाप्रमुख ज्ञानेश्वर झटे यांच्या नेतृत्वात देण्यात आली आहे. सद्यस्थितीत शेतमालाला हमीभाव मिळत नाही. नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांची अवस्था दयनीय झाली. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना पुरेसे प्रमाणात पीक कर्ज मिळण्याची आवश्यकता आहे.परंतु पिक कर्जासाठी शेतकऱ्यांचे अर्ज आल्यानंतर ही राज्य शासनाचे त्वरित कर्ज मंजूर करण्याचे निर्देश असतानाही शेकडो अर्ज बँकेत प्रलंबित आहे. सदर अर्ज त्वरित निकाली काढण्याचे आवश्यक असताना हे अर्ज मुख्य शाखा व विभागीय शाखा यांच्याकडे पाठवून शेतकऱ्यांना नाहक त्रास दिला जात आहे. सिबिल व थकबाकी दाखवून अन्य काही तांत्रिक बाबी दाखवून पिक कर्ज नाकारले जात आहे. शेतकऱ्यांचे पिक कर्ज त्वरित मंजूर करावे. कोणतेही तांत्रिक कारण दाखवून पिक कर्ज नाकारू नये, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. तालुका संघटक अनिल शिंदे, बालाजी करडीले, बबनराव इघारे, बाळासाहेब कु-हे, राम गोरख, गजानन सोळंके, नवनाथ कु-हे, चंद्रमुनी पाईकराव, शिवाजी क-हाळे, संजय भामीरगे, सुनील खंडागळे, लक्ष्मण भोने, आकाश सुतारे, मुरलीधर गिरी, सचिन इंगोले, बापूराव गारकर, लक्ष्मण गारकर, अण्णासाहेब कु-हे, परमेश्वर कु-हे, फकीरा मुरकुटे, अंकुश टारफे, संभाजी बेले, मारोती काळे, बाळू गारकर, सुदामराव वैद्य, संतोष गारकर, संतोष रेणके, दिलीप गारकर, तुकाराम गायकवाड यावेळी शिवसेनेचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# हिंगोलीत आयडॉल सीजन सेवनच्यावतीने नृत्य स्पर्धेला प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ जून**
डी इफेक्ट डान्स अक्॑डमी यांच्या वतीने हिंगोली आयडॉल सीजन सेवनचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या नृत्य स्पर्धेमध्ये मोठ्या संख्येने स्पधृकांनी सहभाग नोंदविला.
येथील शिवाजीराव देशमुख सभागृहात या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. नृत्य शिक्षक सागर चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली आयडॉल या देशव्यापी नृत्य स्पर्धेमध्ये दरवर्षी देशभरातून विविध स्पर्धक आपल्या नृत्याचा अविष्कार सादर केला. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून एबीसीडी टू हा चित्रपट ज्यांच्या जीवनावर आधारित आहे असे वर्णन यांची उपस्थिती लाभली होती. या स्पर्धेमध्ये योगी आणि हेमू(दिल्ली)यांना प्रथम क्रमांकाचे २१ हजार रुपये व ट्रॉफी, द्वितीय क्रमांक रिअल ब्रदर(म.प्र.)यांना मिळाला असून ११ हजार रुपये व ट्रॉफी आणि तृतीय क्रमांक राहुल गौड (मुंबई)यांनी पटकावत ७ हजार रुपये व ट्रॉफी अशी बक्षीस देण्यास आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजकुमार मोरगे, सागर दास यांनी केले. या कार्यक्रमाला शहरातील प्रतिनिधी, तथा प्रेक्षक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# जिल्ह्यात वादळी वाऱ्यामुळे १५७७ हेक्टरचे नुकसान

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ जून**
जिल्ह्यातील वसमत व कळमनुरी तालुक्यात झालेल्या वादळी वाऱ्यामुळे तब्बल १५७७ हेक्टर क्षेत्राच्या केळी व पपई पिकांचे नुकसान झाल्याचे स्पष्ट झाले असून या शेतकऱ्यांच्या मदतीसाठी ५.७७ कोटी रूपयांचा निधी लागणार आहे. याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत शासनाकडे सादर करण्यात आला आहे.
जिल्ह्यातील वसमत व कळमनुरी तालुक्यात केळीचे पीक धेतले जाते. यावर्षी जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून केळीचे पीक काढणीसाठी आले असतानाच दि ९ जून रोजी सायंकाळी झालेल्या वादळी वाऱ्यामुळे केळीच्या बागाच उध्वस्त झाल्या. यामध्ये प्रामुख्याने कळमनुरी तालुक्यातील डोंगरकडा, सुकळीवीर, डिग्रस बुद्रुक, रेडगाव, सालापूर, वउगाव, जवळापांचाळ, भाटेगाव यासह परिसरातील गावांचा समावेश आहे. तर वसमत तालुक्यातील कुरूंदा, गिरगाव, यासह परिसरातील गावांचा समावेश आहे. दरम्यान वादळी वाऱ्यामुळे झालेल्या नुकसानीचे पंचमाने करून तातडीने अहवाला सादर करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिल्या होत्या.
त्यानुसार उपविभागीय अधिकारी प्रतिक्षा भूते, वसमतचे उपविभागीय अधिकारी विकास माने, तहसीलदार जीवककुमार कांबळे, तहसीलदार शारदा दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभागाच्या पथकाने पंचनामे केले. यामध्ये कळमनुरी तालुक्यात १०४९ हेक्टर वरील फळबागांचे तर वसमत तालुक्यातील ५२८ हेक्टरवरील फळबागांचे नुकसान झाल्याचे स्पष्ट झाले आहे.
यासंदर्भातील अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करण्यात आला आहे. या शेतकऱ्यांच्या मदतीसाठी ५.७७ कोटी रूपयांचा निधी लागणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाने विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत नुकसानीची माहीती शासनाकडे सादर केली आहे. आता शेतकरी मदतीच्या प्रतिक्षेत आहेत.

# अधिकाऱ्यांकडून घरकुल लाभार्थ्यांची अडवणूक

**तभा वृत्त सेवा**
**हिंगोली, २४ जून**
औंढा नागनाथ तालुक्यातील केळी येथे लाभार्थी घरकुल बांधकाम करत आहेत. मात्र पालक तांत्रिक अधिकारी यांच्याकडून घरकुलाचा हप्ता टाकण्यासाठी अडथळा होत आहे अशी तक्रार केळी गावातील घरकुल लाभार्थ्यांनी पंचायत समिती कार्यालयात केली आहे. सदरील निवेदनात सविस्तर वृत्त असे आहे की, सन २०२४-२५ मध्ये प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरकुल मंजुर झाले आहे. त्यानुसार खात्यात शासनाकडून प्रत्येकी १५ हजार रुपये जमा झाले आहेत. आजरोजी घरकुल पूर्णपणे बांधकाम झालेले आहे. परंतु संबंधित पालक तांत्रिक अधिकारी यांचेकडून उर्वरित घरकुलांचे पैसे मिळण्यास अडथळा होत आहे. संबंधित पालक तांत्रिक अधिकारी हे गावातील इतर घरकुल लाभार्थ्यांकडून पैसे घेवून त्यांचे बांधकाम पूर्णही झालेले नाही त्यांचे खात्यात उर्वरित राहिलेले पैसे वर्ग करतात. त्यांना वारंवार तोंडी बोलून पाहीले असता प्रत्येक वेळेस उडवाउडवीची उत्तरे देत आहेत. तरी वरील प्रकरणी तात्काळ योग्य ती कार्यवाही करून घरकुलाचे उर्वरित रक्कम द्यावी अशी मागणी घरकुल लाभार्थ्यांनी निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनावर अनिल गोविंद राठोड, कृष्णा वामन जाधव यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# कळमनुरी येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची बैठक, पदाधिकाऱ्यांच्या निवडी



**तभा वृत्त सेवा**
**हिंगोली, २४ जून**
राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे जिल्हाध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली दि २३ जून २०२५ रोजी शासकीय विश्रामगृह कळमनुरी येथे तालुक्यातील पदाधिकाऱ्यांची बैठक संपन्न झाली. या बैठकीमध्ये आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका निवडणुकी संदर्भात चर्चा करून सर्व इच्छुक उमेदवारांना कामाला लागण्याच्या सूचना देण्यात आल्या.
या बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कळमनुरी तालुका उपाध्यक्षपदी शिवराम पोटे, कोषाध्यक्षपदी रविशंकर पतंगे, सहकोषाध्यक्षपदी विनायक माखणे यांची पत्र देऊन नियुक्ती करण्यात आली. यावेळी डॉक्टर सेलचे प्रदेश सचिव डॉ.संतोष बोंढारे, जिल्हा उपाध्यक्ष अ‍ॅड. रवि शिंदे, विधानसभा अध्यक्ष गणेशराव गडदे, तालुकाध्यक्ष अवधूत निळकंठे, शहराध्यक्ष शेख बाबा, सचिन चव्हाण,अभिजीत देशमुख, प्रा.गुलाब भोयर, ख्वाजा बागवान, मोईन रिजवी, सुशील बोंढारे, सचिन चव्हाण, अंबादास बोरकर, राजू बाभळे, नदीम भाई, किशनराव वाघमारे, तुकाराम बाभळे, संतोष मगर, योगेश पाटील, लक्ष्मण पोटे, सुदर्शन वायकुळे, बाबा सिद्दीकी यांच्यासह पदाधिकारी उपस्थित कळमनुरी येथे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या अनेक पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यात आल्या.

# उत्कृष्ट कामगिरबद्दल परतूर पोलिसांचा गौरव

## पोलिस महानिरीक्षक वीरेंद्रमिश्र यांच्या हस्ते विशेष प्रशस्तीपत्र देऊन आले गौरविण्यात

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**



पोलिस स्टेशन परतूर येथील अधिकारी आणि अमलदार, यांनी परतूर शहरात तसेच हद्दीत घडलेले चोरी, जबरी चोरी, मोटार सायकल चोरी, जनावर चोरी, शेतकरी यांचे इलेक्ट्रिक मोटार चोरी, सोलर वायर चोरी इत्यादी चोरांची टोळी जेरबंद करून त्यांना हद्दपार केले, आणि होणाऱ्या गुन्ह्यावर प्रतिबंध केले, तसेच १६ बदमाश गावगुंड यांना हद्दपार केले, हद्दीत उत्कृष्ट कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी कामकाज केले त्यानी केलेल्या या चांगल्या कामगिरी मुले मा. श्री. वीरेंद्र मिश्र, वि. पो. महानिरीक्षक साहेब, छ. संभाजी नगर, मा. श्री. अजय कुमार बन्सल, पोलिस अधीक्षक साहेब जालना, मा. श्री. आयूष नोपानी, अप्पर पोलिस अधीक्षक साहेब, पोलिस अधीक्षक जालना यांचे कार्यालयात आज रोजी त्यांनी केलेल्या चांगल्या कामगिरी मुले एम. टी. सुरवसे, पोलिस निरीक्षक, पोलिस स्टेशन परतूर, विठ्ठल केंद्रे, पो.उप. निरीक्षक, अमोल राऊते पो. उप. निरीक्षक, पोका/ सतीश जाधव, पोका/ नरेंद्र चव्हाण, पोका/ ज्ञानेशोर वाघ, पोका/ गजानन राठोड, पोका/ राम हाडे, पोका/ वंदन पवार, पोका/ नितीन बोंडारे यांना साहेब यांचे हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरवण्यात आले आहे.

# मंठा बस स्थानकातील चोरवाटामुळे सुरक्षा वाऱ्यावर

## परिवहन मंडळाकडून चोरांना चोर वाटा करून दिल्याची शहरात चर्चा

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**



मंठा शहरातील बसस्थानक मध्यवर्ती ठिकाणी असून या बस स्थानकावर शेकडो बस गाड्यांची ये-जा असते. त्यामुळे प्रवाशांची मोठी गर्दी होते या गर्दीचा फायदा घेत महिलांचे दागिने , पाकीट मार यासह महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर येत आहे. या बस स्थानकामध्ये चोर वाटा असल्याने येथील सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आल्याचे दिसून येते.

मंठा बस स्थानकामध्ये दिवसाआड लाखो रुपयांची चोरी होत आहे. दागिने चोरल्यानंतर व पाकीट मारल्यानंतर मंठा बस स्थानकातील चोरवाटातून चोरटे पसार होतात. यासह महिला व मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न देखील या चोरवाटामुळे ऐरणीवर आला आहे.सदर चोर वाटा बंद करण्यात याव्या अशी प्रवाशांची मागणी होती. परंतु परिवहन मंडळातील आगार प्रमुख हे दुर्लक्ष करत आहेत. त्यामुळे या ठिकाणी वारंवार चोरीच्या घटना घडत आहेत. बस स्थानकातील चोर वाटा बंद करण्यासंदर्भामध्ये मागील काही महिन्यांमध्ये परिवहन मंडळाकडून नोटीस काढण्यात आली परंतु आगार प्रमुख यांनी या नोटीसकडे दुर्लक्ष केले असल्याचे दिसून येते. सदर चोरवाटामुळे अप्रिय घटना घडत असतांनाही परिवहन मंडळातून कुठलीच कार्यवाही करण्यात येत नाही. त्यामुळे परिवहन मंडळाकडून एक प्रकारची चोरांना चोर वाटा मोकळ्या करून दिल्याची नागरिकांतून चर्चा ऐकू येत आहे

# संक्षिप्त

## शेतकऱ्यांचे तात्काळ विना शर्त पिक कर्ज मंजूर करा – तालुकाप्रमुख प्रदीप बोराडे

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**



सध्याला शेतकऱ्याची अवस्था म्हणजे आई खाऊ देना आणि बाप भीक मागू दे ना या उक्प्रमाणे झाली आहे.शेतकऱ्याच्या कोणत्या शेतमालाला हमीभाव मिळ नाही.महिन्याच्या सुरुवातीस पाऊस पडल्याने बहुतांशी शेतकऱ्यांनी जवळील किडुक मिडुक खर्च करून पेरणी केली आहे.मात्र मागील जवळपास पंधरा दिवसापासून पावसाने उघडीत दिल्याने बळीराजा चिंता तूर आहे.त्या मुळे राष्ट्रीयकृत बँकांनी शेतकऱ्यांना विना विलंब तात्काळ पीक कर्ज मंजूर करावे अशी मागणी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे तालुकाप्रमुख प्रदीप बोराडे यांनी निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात पुढे म्हटले आहे की, मागील वर्षातील नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांची अवस्था दयनीय झाली असून राज्य शासनाच्य वतीने पीक विम्याचे धरसोडीचे धोरण सुरू आहे.पिक कर्जासाठी शेतकऱ्यांचे अर्ज आल्यानंतर ही राज्य शासनाचे त्वरित कर मंजूर करण्याचे निर्देश असतानाही शेकडो अर्ज स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र, महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा मंठा हे प्रलंबित ठेवत असल्याने आहे. शेतकऱ्यांच्या अडचणी वाढ होत आहे.त्या मुळे पीक कर्जा बाबत आलेले शेतकऱ्यांचे अर्ज तात्काळ निकाली काढावेत. तसेच वरिष्ठ शाखांकडे मंजुरी करिता फाईल पाठवावी लागते असे सबत देऊन टाळाटाळ केली जात आहे. तर काही ठिकाणी तांत्रिक बाबी दाखवून पीक कर्ज नाकारले जात आहे.

अशा परिस्थितीत शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने बँकांना जाब विचारण्यासाठी बँकांची शाळा या आंदोलनात्मक कार्यक्रम राबविला जात असून शेतकऱ्यांचे पिक कर्ज त्वरीत मंजुर करावे, कोणतेही तांत्रिक कारण दाखवून पिक कर नाकारु नये, अशी मागणी करत तालुकाप्रमुख प्रदीप बोराडे यांचे नेतृत्वात मंठा शहरातील बँकांना करण्यात आली असून शेतकऱ्यांना नाहक त्रास दिला तर उबाठा पक्षाच्यावतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा निवेदनात शेवटी दिला आहे. या निवेदनावर आसाराम बोराडे, देविदास खरात, प्रल्हाद कदम, संजय बोराडे राहुल बोराडे सचिन चव्हाळ गणेशराव खराबे, रवी काळे, विलास खराबे, अमोल खराबे, प्रसाद सिंह सखाराम बोराडे ,जुनेद पठाण ,ठाकुर, रितिक जाधव, गजानन झोल, ऋषिकेश वाघ, दत्ता गोरे, सचिन घेणे,इलियास शेख, तानाजी मोरे, तन्वीर शेख, विष्णुपंत वरकड, शेख ऐसान,शंकर कचरे, गणेश घोडके, प्रदीप घोडके, भागवत खराबे, विकास खराबे, सोफियान पठाण, यांनी सह्या केलेले आहेत.

## वादळी वाऱ्याने सोलार पॅनलचे नुकसान



**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

भोकरदन तालुक्यातील विरेगाव येथे काही दिवसांपूर्वी आलेल्या वादळी वाऱ्याने शेतातील सोलार पॅनलचे मोठे नुकसान झाले आहे. येथील शेतकरी भगवान कडूबा पिसे यांच्या शेतातील सोलार पॅनलला वादळी वाऱ्याने मोठा फटका बसला आहे. या अस्मानी संकटामुळे शेतकऱ्यांच्या नशीबी पुन्हा निराशा आली आहे. दरम्यान या घटनेने शेतकऱ्याला आर्थिक भुर्दंड सोसावा लागणार आहे. तरी संबंधित सोलार इन्शुरन्स कंपनीने शेतकऱ्याला तात्काळ मदत करून नुकसानभरपाई द्यावी अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करित आहे.

# खोट्या गुन्हयात अडकविलेल्या पत्रकारांची पुराव्या अभावी निर्दोष मुक्तता!

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या जालना येथील प्रभारी उप प्रादेशिक अधिकारी डॉ. योगिनी अविनाश बाळंके यांनी जुलै २०२० मध्ये चंदनझिरा पोलिसात दाखल केलेल्या गुन्हयातील पत्रकारांची अतिरिक्त सत्र न्यायाधिश किशोर जैस्वाल यांनी नुकतीच निर्दोष मुक्तता केली. निकालपत्रात श्रीमती योगिनी बाळंके यांच्या कार्यपध्दतीसह एकंदरीतच तक्रार आणि गुन्हा दाखल होण्यास झालेला विलंब याविषयी शंका उपस्थित करण्यात आल्याने तक्रारी विषयीच संभ्रमावस्था आहे अशी माहिती ड.लक्ष्मण उढाण, ड. महेश धन्नावत आणि ॲड. योगेश खरात यांनी दिली.

या गाजलेल्या प्रकरणाची सविस्तर माहिती अशी की, प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या जालना येथील प्राभारी उप प्रादेशिक अधिकारी श्रीमती योगिनी बाळंके यांनी ता. ३१ जुलै २०२० रोजी चंदनझिरा पोलीस ठाण्यात जालन्यातील तीन पत्रकार अनुक्रमे अर्पण गोयल, भरत मानकर, विष्णू कदम आणि निळकंठ कुलकर्णी अशा चौघांविरूध्द गुन्हा दाखल केला. त्यांच्या तक्रारीनुसार सरकारी कामात अडथळा निर्माण करणे, सार्वजनिक शांततेचा भंग करणे, बदनामी करणे शिवाय हे सर्व काही संगनमताने केले असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले होते. चंदनझिरा पोलिसांनी गुन्हा दाखल करून श्री. गोयल आणि श्री. मानकर यांना अटक केली, तर श्री.कदम यांचा अटकपूर्व जामीन मंजूर झाला. दरम्यानच्या काळात तपास पुर्ण होऊन न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. सुनावणी दरम्यान तक्रारदार श्रीमती योगिनी बाळंके याच्यासह साक्षीदार अनिल एखंडे, कल्याणी झाडपिडे, आणि रावसाहेब सिरसाठ यांच्या साक्षी नोंदविण्यात आल्या. त्या बरोबरच साक्षीदारांचे जवाब, प्रसिध्द झालेल्या बातम्या आणि मजकुरासह दोषारोपपत्र दाखल झाल्याने सर्वच आरोपिंनी आरोप फेटाळल्याने सविस्तर सुनावणी घेण्यात आली. सुनावणी दरम्यान सरकार पक्षातर्फे उपस्थित करण्यात आलेले मुद्दे आणि फिर्यादी श्रीमती योगिनी बाळंके यांनी तक्रारीतून केलेले आरोप अशा सहाही मुद्यावर न्यायालयाने नकारात्मक शेरे मारत फिर्यादीच्या कामकाजावरही ताशेरे ओढले. फिर्यादीच्या कार्यालयापासून पोलीस ठाणे अवघ्या एक दोन किलोमीटर अंतरावर असतांना तक्रार दाखल करण्यास तीन–चार दिवसांचा विलंब का झाला असा गंभीर प्रश्नही उपस्थित करण्यात आला. त्याबरोबरच तक्रारकर्त्या श्रीमती योगिनी बाळंके या उच्च शिक्षित असून त्यांनी या प्रकरणी बातम्या प्रसिध्द झाल्याने त्याच्या नाराजीतून विचाराअंती म्हणजे प्रकरण अंगलट येऊ नये म्हणून जाणीवपूर्वक गुन्हा दाखल केला असल्याची शक्यताही न्यायालयाने व्यक्त केली. विशेष म्हणजे आरोपी पत्रकारांनी त्यांच्या कार्यालयात घुसुन गोंधळ घातला तसेच नोंदवहीत नोंद केली नाही. सरकारी कामात अडथळा निर्माण केला या आणि अन्य आरोपांच्या पृष्ठयार्थ सबळ पुरावे देण्यास फिर्यादी कमी पडल्याचे न्यायालयाचे स्पष्ट केले. विशेष म्हणजे जालना शहरातील प्रदुषण नियंत्रण करणे हे फिर्यादीचे आद्य कर्तव्य असतांना त्यांनी त्याकडे सोयीस्कर दुर्लक्ष केलेच शिवाय प्रदूषणाचा प्रश्न निर्माण करणाऱ्या कारखान्यांच्या आस्थापना विरोधात किंवा कारखाना मालकांच्या विरोधात ठोस कारवाई करण्या ऐवजी तो प्रश्न प्रभावी पणे मांडणाऱ्या या पत्रकारांच्या विरोधात तक्रारी गुन्हे दाखल केल्याचे निकालात नमूद करण्यात आले. जालना प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या प्र. उपप्रादेशिक अधिकारी श्रीमती योगिनी बाळंके यांनी मा.न्यायालयात कुठलेही ठोस पुरावे सादर करू न शकल्यामुळे मा. न्यायालयाने या प्रकरणातील पत्रकारांची निर्दोष मुक्तता केली आहे.



## वंचित बहुजन आघाडी आणि सुभानपुर येथील बौद्ध बांधवांचे आमरण उपोषण

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

भोकरदन सुभानपुर येथे दि.११ मार्च मध्यरात्री बौद्ध विहार परीसरात छत्रपती शिवाजी महाराज यांचा स्मारक विनापरवानगी बसविण्यात आले आहे . परंतु बौद्ध बांधवांनी वेळोवेळी प्रशासनाकडे छ. शिवाजी महाराज यांचा पुतळा तेथील असलेले छ.शिवाजी चौक येथे बसविण्यात यावा हि मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली परंतु प्रशासनाकडून कुठल्याही प्रकारची दखल या प्रकरणात न घेतल्याने वंचित बहुजन आघाडी आणि सुभानपुर येथील बौद्ध बांधवांचे संयुक्त पणे येथील तालुका उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणाण दि. २३/०६/२०२५ पासून सुरू करण्यात आले आहे. या उपोषणाला वंचित बहुजन आघाडी तालुकाध्यक्ष विशाल मिसाळ, महासचिव मंगेश पगारे राहुल खरात, गंगाधर दाभाडे, अंबादास बोर्डे, शारदाबाई खरात, लक्ष्मीबाई खरात यांच्यासह १५ जणांचा समावेश आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कुणाच्या बापाची जहागीर नाही – बाबासाहेब गाडगे

**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**



राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा सर्वसामान्य, काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. येथे कोणाचीही मक्तेदारी किंवा घराणेशाही चालणार नाही. पक्षात नवीन चेहऱ्यांना संधी दिली जात आहे, तर जुन्या निष्क्रिय कार्यकर्त्यांनी बिनकामाची बडबड थांबवावी, असा थेट इशारा राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाबासाहेब गाडगे यांनी दिला आहे. गाडगे यांनी पत्रकार परिषद घेऊन स्पष्ट शब्दांत विठ्ठल बरकूले यांच्यावर निशाणा साधला. त्यांनी म्हटले की, विठ्ठल बरकूले यांनी आजवर पक्षासाठी काय झिज दिली? कोणते आंदोलने उभी केली? किती वेळा जनतेसाठी रस्त्यावर उतरले? पक्षामध्ये नाव टिकवायचं असेल तर कामगिरी दाखवा, अन्यथा फडतूस टीका करून कोणत्याही पदाची पात्रता मिळत नाही, हे त्यांनी स्पष्टपणे सांगितले. गाडगे पुढे म्हणाले, पक्ष कुणाच्या बापाची जहागीर नाही, इथे कर्तृत्व आहे की नाही, हेच महत्वाचं. जेथलिया साहेबांनी परतूरमध्ये पक्ष कार्यात नवा जोम भरला आहे. हजारो युवक, कार्यकर्ते पक्षात दाखल होत आहेत. पक्ष वाढतो आहे, मजबुतीकडे जातो आहे आणि अशावेळी वाया गेलेल्या लोकांकडूनच अशा कुरकुर ऐकू येते. गाडगे यांच्या मते, काही लोक पक्षात संधी न मिळाल्याने खवळले असून, समाजमाध्यमांवर अपप्रचार आणि अंतर्गत गोंधळ माजवण्याचे काम करत आहेत. हे लोक स्वतः काही करत नाहीत आणि जे करत आहेत त्यांना खाली खेचण्याचा प्रयत्न करतात. पण पक्षाला दिशाहीन करण्याचा हा खोटा डाव यशस्वी होणार नाही, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला. गाडगे यांनी स्पष्ट केलं की, परतूर विधानसभा मतदारसंघात नेतृत्व कोणाचं, हे आता जनतेलाही माहिती आहे. जेथलिया साहेब जिथे म्हणतील, तीच आमची पूर्व दिशा असेल. त्यांचे मार्गदर्शन हेच पक्षासाठी, कार्यकर्त्यांसाठी आणि जनतेसाठी दिशा ठरवणार आहे. शेवटी, बाबासाहेब गाडगे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, पक्ष आता चालेल कर्तृत्वावर. खुर्चीसाठी वाचाळपणं करणाऱ्यांना गप्प बसावंच लागेल. पक्षाच्या एकतेसाठी आणि नवा इतिहास घडवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

## शेतकऱ्यांना पिककर्ज मिळवुन देण्यासाठी शिवसेना उबाठा आक्रमक

**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**



आज शिवसेनेच्या वतीने महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री शिवसेना पक्षप्रमुख आदरणीय उद्धवजी ठाकरे साहेब ,आदरणीय अंबादासजी दादा दानवे साहेब विरोधी पक्षनेते महाराष्ट्र ,भास्कर राव आंबेकर महेश नळगे जिल्हाप्रमुख जालना हनुमानजी धांडे उपजिल्हाप्रमुख जालना यांच्या सूच–नेवरून अबंड येथील महाराष्ट्र ग्रामीण बँक , कॅनरा बँक , स्टेट बँक ऑफ इंडिया , बँक ऑफ महाराष्ट्र व पचांयत समिती अबंड यांना अबंड तालुक्याच्या वतीने पिककर्ज ,व शेतकऱ्याच्या महत्त्वाच्या मुद्द्यावर प्रश्न सोडवण्याचे निवेदन दिले .

तसेच सर्व घरकुल योजना ,मनरेगा अतंर्गत विहीर व इतर योजनेचा लाभ तालुक्यातील शेतकर्यांना विनाअडचण द्यावा यासाठी अबंड पचांयत समिती येथे निवेदन दिले. या निवेदनावर हनुमान धांडे उपजिल्हाप्रमुख दिनेश काकडे तालुकाप्रमुख अबंड शिवसेना ,बाळासाहेब गावडे तालुकाप्रमुख अबंड उबाठा , राम लांडे , युवासेना उपजिल्हाप्रमुख शिवसेना जालना,कुमार रूपवते शहरप्रमुख अबंड पंडितरावजी गावडे तालुका संघटक अंबड अशोकराव गिरी रजनिश कनके उपतालुकाप्रमुख अंबड नंदकुमार पुड शहार प्रमुख विजय सोमाणी सिद्धेश्वर उबाळे बंडू पागिरे शिवसेना अबंड, उल्हास वाघ , अशोक खापे यांच्या सह्या आहे.

# ऐकावे ते नवलच...

## चौकशीसाठी नेमलेल्या समितीला गावच सापडले नाही!

**तभा वृत्तसेवा**
**परतुर/प्रतिनिधी**

परतुर तालुक्यातील वैजाडा ग्रामपंचायत अंतर्गत आलेल्या विविध विकासकामांचे कामे संगनमताने बोगस करून बिले उचलण्यात आल्याचा प्रकार घडला होता, त्यामुळे या कामांची चौकशी व्हावी यासाठी दि.११ जुन २०२५ रोजी सामाजीक कार्यकर्ते, अशोक साबळे आणि सुरेश कवडे यांनी परतुर पंचायत समिती कार्यालयासमोर उपोषणास बसले होते, त्यांच्या उप–ोषणाची दखल देऊन परतुर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांनी या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी समिती नेमुण येत्या आठ दिवसात चौकशीत दोषी आढळल्यास कारवाईचे आश्वासन दिले होते, परंतु चौकशीसाठी नेमलेल्या समितीला अद्याप तरी तालुक्यातील वैजोडा गाव सापडले नसल्यामुळे आश्चर्य व्यक्त केले जात आहे.



याबाबत सविस्तर वृत्त असे की, परतुर तालुक्यातील मौजे वैजोडा येथील धनगर समाजाची स्मशानभुमी तसेच दलित समाजातील स्मशानभुमी या दोन्ही स्मशानभुमीचे मंजुर झशलेले कामे अद्यापही झाले नाही मात्र एमआरजीएस योजनेअंतगत बिले उचलली, मातोश्री पांदन रस्ता गुत्तेदार गिरी यांनी अधिकार्यांना हाताशी धरून थातुर–मातूर काम करून अंत्यत निकृष्ट दर्जाचा रस्ता करून बोगस बिले उचचली, तसेच वैजोडा येथील होळकर नगर (धन–गरवस्ती) या ठिकाणी मंजुर झालेला सिमेंट रस्ता अन्य इतर ठिकाणी बोगस काम करू या कामाचे देखील बिले उचचली आहेत, तसेच होळकर नगर (धनगर वस्ती) या भागात मंजुर असलेली पाणी पुरवाठा पाईपलाईनचे बोगस काम करून शासनाच्या मुल्यांकनाच्या आधारे विकासकामे न करता शासनाची दिशाभुल करून बिले उचलुन सरपंच, ग्रामसेवक, इंजिनिअर, गुत्तेदार निगरगट्ट झाले आहेत, त्यामुळे त्यांनी कामांची तात्काळ चौकशी करून दोषी आढळल्यास त्यांच्यावर शासनाची फसवणुक केल्याप्रकरणी गुन्हे दाखल करून सदरील कामे ही पुन्हा पारदर्शकपणे करण्याची मागणीसाठी श्री.साबळे आणि कवडे यांनी उपोषण केले होते, यावेळी गटविकास अधिकाऱ्यांनी दिलेल्या आश्वासनामुळे उपोषणकर्त्यांनी उपोषण स्थगितही केले होते. परंतु या प्रकरणाची कुठल्याही प्रकारची संबंधीत समितीने चौकशी न केल्यामुळे उपोषणकर्त्यांनी यापुढे लवकरच याचमागणीसाठी आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे.

→ यासंदर्भात परतुर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्री तांगडे यांच्याशी आमच्या प्रतिनिधीने संपर्क साधला असता त्यांनी सांगितले समितीची नेमणुक केली आहे, लवकरच तो अहवाला सादर करण्यात येईल.

## बीडओ आणि ग्रामसेविका सोनाली धरत यांचे भ्रष्ट्राचाऱ्यांना पाठबळ!



श्री.तांगडे



श्रीमती धरत

» परतुर तालुक्यातील वैजोडा येथे झालेल्या विविध विकास कामांमध्ये संबंधीत गुत्–ेदाराने बोगस कामे करून मोठ्या प्रमाणात भ्रष्ट्राचार केल्याचे बोलले जात असुन या भ्रष्ट्राचाराला प्रशासनाचे असलेले कर्मचारी श्री.तांगडे आणि ग्रामसेविका सोनाली धरत यांचे पाठबळ मिळाल्यामुळेच ह्या विकास कामांत लाखों रूपयांचा भ्रष्ट्राचार झाल्याचे नागरीकांतुन बोलले जात आहे, त्यामुळे या प्रकरणात जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ आणि मुख्य कार्यकारी अधिकारी जगदीश मनियार यांनी लक्ष घालुन संबंधीत दोषी आढळल्यास त्यांच्यावर शासनाची फसवणुक केल्याप्रकरणी कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांतुन होत आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# सहकारी पतसंस्था निवडणुकीत तांत्रिक ग्रा.पं.अधिकारी संघटना किंगमेकर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२४ जून -**

नांदेड जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था पंचवार्षिक निवडणूक (सन २०२५-२०३०) दि. २१ जून रोजी निवडणूक प्रक्रिया पार पडली.

२२जून रोजी निवडणूक निकाल जाहीर झाला असून महारुद्र पॅनलला ९ जागा मिळून बहुमत मिळाले तर सत्ताधारी मित्र मंडळ पॅनलला ६ जागांवर समाधान मानावे लागले सभासदांनी निर्णायक मतदान करून सहकारी पतसंस्थेत परिवर्तन घडून आणले. निवडणुकीपूर्वी ग्रामपंचायत अधिकारी संवर्गाची सभासद संख्या जास्त असल्यामुळे डीएनइ १३६ ग्रामसेवक संघ व तांत्रिक ग्रामपंचायत अधिकारी संघटना मिळून समन्वय सभा पार पडली होती.सदर बैठकीत ५ जागा ग्रामपंचायत अधिकारी संवर्गास देणेबाबत ठरले होते. त्यामध्ये डीएनइ १३६ -२, संघ १ तर तांत्रिक संघटनेला १ जागा देणे बाबत सत्ताधारी मित्र मंडळ पॅनलने ठरविले होते. परंतु ऐनवेळी शब्द फिरून डीएनइ १३६ ने सर्व ४ जागा लढवल्या तर संघाला व तांत्रिकला एकही जागा दिली नाही.तांत्रिक संघटनेला पॅनल मध्ये जागा न दिल्याने नांदेड येथील संघटनेच्या नेतृत्वाने राज्याध्यक्ष नितीन धामणे राज्यसचिव हरिश्चंद्र काळे यांच्याशी संपर्क केला. राज्य नेतृत्वाने निर्णय भूमिका घेऊन महारुद्र पॅनलला बिनशर्त पाठिंबा देण्याची सूचना केली होती. राज्यकार्याध्यक्ष मधुकर मुंगल, जिल्हाध्यक्ष गुलाब वडजे ,जिल्हा सचिव संजय देशमुख, कार्याध्यक्ष संदीप कच्छवे, बालाजी पंतोजी,समन्वयक अरुण चौधरी, अनुप श्रीवास्तव, प्रभाकर सोगे,मोहन राहुलवाड, माधव ढगे,बालाजी कनोजवार, शेख एजाज, नारायण काळे,शोभा पारसेवार प्रशांत कोकाटे,भास्कर कापसे,जगन्नाथ लाकडे, संतोष सितावार,विशाल वडजे,चिकलपल्ले, मोहन अडकिने यांचेसह इतर सर्व जिल्हा पदाधिकारी व तालुका पदाधिकारी यांनी बैठक घेऊन महारुद्र पॅनलला बिनशर्त जाहीर पाठिंबा दिला प्रचार यंत्रणा व्यवस्थित राबविण्यात आली. पतसंस्थेत सध्या सुरू असलेले आर्थिक गैरव्यवहार, बोगस विमा हप्ते कपात, जादा व्याजदराने सभासदांना होणारा कर्जपुरवठा सत्ताधाऱ्यांची मनमानी आदि प्रचारातले ठळक मुद्दे सभासदांसमोर मांडण्यात आले. यावेळी तांत्रिक संघटनेने घेतलेल्या निर्णायक भूमिकेमुळे राज्य व जिल्हा नेतृत्वाच्या भूमिकेशी एकनिष्ठ राहून तांत्रीक संघटनेच्या सभासदानी एकगठ्ठा मते मिळवून दिल्याने महारुद्र पॅनलला बहुमत मिळाले आहे. या निकालामुळे नांदेड जिल्ह्यात तांत्रिक ग्रा.पं.अ. संघटनेची पाळेमुळे अधिक खोलवर रुजलेली असून संवर्ग हितासाठी संघटना बळकट होण्यास मदत होईल अशी भावना राज्याध्यक्ष नितीन धामणे व राज्य सचिव हरिश्चंद्र काळे, महेंद्र निकम, स्नेहल नरळे, नारायण पवार, यांनी व्यक्त करून यावेळी बोलताना त्यांनी सर्व विजयी उमेदवारांचे संघटनेच्या वतीने अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतलेले संकल्प आज 'संकल्प सिद्धी'च्या टप्प्यावर : ॲड. श्रीजया चव्हाण



**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि.२४ जून -**

भारताचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेली ११ वर्षे विविध लोक कल्याणकारी योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात आली असून सर्वसामान्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल झाला आहे आणि विकसित भारताच्या दिशेने दमदार यशस्वी वाटचाल सुरू असून विकसित भारताची संकल्पना प्रत्यक्षात साकारतेय असे प्रतिपादन भोकर विधानसभा मतदार संघाच्या ॲड. श्रीजयाताई चव्हाण यांनी येथील वैष्णवी गार्डन मंगल कार्यालयात भारतीय जनता पार्टीच्या वतीने आयोजित तालुकास्तरीय कार्यशाळे प्रसंगी बोलतांना केले.

प्रारंभी, भारतीय जनसंघाचे संस्थापक डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

ॲड. श्रीजया चव्हाण पुढे म्हणाल्या की,पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतलेले संकल्प आज 'संकल्प सिद्धी'च्या टप्प्यावर पोहोचले आहेत. महिला, युवक, शेतकरी, गरिबांना केंद्रस्थानी ठेवून राबविण्यात आलेल्या योजनांमुळे 'नवभारत' घडत आहे. 'उज्ज्वला योजना', 'स्वच्छ भारत मिशन', 'प्रधानमंत्री आवास योजना', 'जनधन खाते', 'डिजिटल इंडिया', 'स्टार्टअप इंडिया' यांसारख्या योजनांनी भारताचा चेहरामोहरा बदलला आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाजपा तालुका अध्यक्ष दत्तू देशमुख वाडीकर यांनी करतांना कार्यशाळेच्या उद्देशावर सविस्तर प्रकाश टाकला.

यावेळी जिल्हाध्यक्ष ॲड. किशोर देशमुख, शहराध्यक्ष रामसिंग चव्हाण, भीमराव पाटील, कल्याणे, रोहिदास जाधव, गांधी पाटील पवार ,उद्धवराव पाटील पवार ,माधव पाटील कदम, ऋषिकेश पारवेकर बालाजी पाटील खटिंग ,लक्ष्मणराव जाधव, हनुमंतराव देशमुख, संजय सोनटक्के ,संजय आऊवलवार, शत्रुघ्न पाटील गंड्रस,कुणाल चौदंते, नितीन चौदंते, प्रा. बालाजी पाटील जाधव, गुलाब पाटील सूर्यवंशी, संतोष पाटील गाढे पांगरगावकर, माजी जि.प. सदस्य गणेशराव पाटील शिंदे, शंकरराव पवार, लक्ष्मणराव देशमुख, बळी पाटील ढगे, नामदेव पाटील शिंदे, कानोबा बिस्मिले, देवा पाटील धबडगे ,नवनाथ गव्हाणे, शिवा पाटील तोटेवाड ,माजी सैनिक संजय चव्हाण , यांची उपस्थिती होती.

भाजपा युवा मोर्चाचे कार्यकर्ते अमोल आबादार यांच्या अपघाती निधनाबद्दल त्यांना सामूहिक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार संजय कोलते यांनी केले तर आभार शंकर मुतकलवाड यांनी मानले.

## संक्षिप्त वृत्त

### अर्धापुर ग्रामीण रुग्णालयास कायाकल्प कार्याक्रमांतर्गत १ लाखाचे पारितोषिक

**अर्धापूर** -शहरातील ग्रामीण रुग्णालय अर्धापुर यास कायाकल्प कार्याक्रमांतर्गत १ लाखाचे पारितोषिक हे बक्षीस जिल्हा स्तरावर जाहीर झाले आहे. हे बक्षीस सरकारी दवाखान्यातील स्वच्छता व ईतर पुरक बाबीचे कायाकल्प कार्यक्रमातंर्गत मुल्यांकण करण्यात आले होते, त्यामुळे ग्रामीण रुग्णालयास १ लाखाचे पारीतोषक मिळाले व गतवर्षी सन २०२३-२४ हया वर्षीसुध्दा पारीतोषक मिळाले होते. कायाकल्पमध्ये प्रत्येक अधिकारी व कर्मचारी यांनी सक्रीय सहभाग घेऊन प्रयत्न केले होते, व हे सामुहीक यश असुन गुणवत्ता सेवा आणखीन वाढवण्याचा प्रयत्न राहणार आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियानातंर्गत सन २०२४-२५ मध्ये कायाकल्प स्पर्धा घेण्यात आली होती, त्यात सहभागी सरकारी दवाखान्यातील अंतर्गत स्वच्छता व ईतर रुग्ण सेवा स्वच्छता प्रचार व प्रशिक्षण आदी मुदबानवर मुल्यमापन करण्यात आले होते, त्यासाठी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निळकंठ भोसीकर, अर्धापूर ग्रामीण रूग्णालय अधिक्षक डॉ.विद्या झीने व सर्व वैद्यकिय अधिकारी व कर्मचारी यांचा सक्रीय सहभागामुळे हे बक्षीस प्राप्त झाले आहे.

### ठाकरे सेनेच्या मुखेड विधानसभा प्रमुखपदी मन्मथअप्पा खंकरे यांची निवड

**मुक्रमाबाद**-मुखेड तालुक्यात अनेक वर्षापासून शिवसेना पक्षाचे निष्ठावंतपणे कार्य करुन वंचित घटकांना, शेतकऱ्यांना न्याय मिळवून देणारे शिवसैनिक म्हणून संपूर्ण तालुक्यात परिचित असणारे मागील अनेक वर्षापासून ठाकरेच्या शिवसेनेची एकनिष्ठ असलेले स्वर्गवासी हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रेरणेने प्रेरित होऊन ८० टक्के समाजकारण २० टक्के राजकारण याच तत्वावर चालणारे कडवट शिवसैनिक मन्मथअप्पा खंकरे यांची मुखेड शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) विधानसभा प्रमुख पदी निवड करण्यात आली आहे. मन्मथ खंकरे यांनी शिवसेनेच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांपासून पक्ष वाढीसाठी काम करून अनेक शिबीरे, शेतकरी आंदोलने, मोर्चे करून आपला पक्ष वाढीसाठी काम केले आहेत. त्यांच्या या निवडीबद्दल जेष्ठ शिवसैनिक माधवराव देशमुख, लक्ष्मण कोळेकर, विरेश इन्दुरे, ज्ञानेश्वर पांढरे, बालाजी कदम, राम कोळेकर, सुरेश औरादे, सोमनाथ बोधणे, सुनिल बेल्लेवार, सदानंद घाळे, यांच्यासह अदिंनी अभिनंदन केले.



### आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त तळणी येथे आर्य समाजाचे योग शिबीर संपन्न

**निवघा बा.**-येथून जवळच असलेल्या तळणी येथे आर्य समाजाचे योग शिबीर नुकतेच यशस्वीपणे पार पडले. या शिबिरात योग आणि आत्म-संरक्षणाचे प्रशिक्षण उपस्थित नागरिकांना देण्यात आले. यावेळी आर्य समाजाचे आचार्य स्वामी गोविंद देवजी,योग शिक्षक हेमंत देशमुख,भाजपा कार्यकारणी सदस्य शेखर पाटील,बाळासाहेब देशमुख,उपसरपंच कपिल पाटील,प्रभाकर देशमुख, उद्धव देशमुख,रामा तावडे, नारायण तावडे,प्रधान शेषेराव मगर,कैलास कवडे व अन्य मान्यवर उपस्थित होते

# जिल्हा न्यायालयात योगा दिन मोठया उत्साहात साजरा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२४ जून -**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार व जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा न्यायाधीश सुनिल गं. वेदपाठक यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा न्यायालयाच्या प्रांगणात २१ जून २०२५ रोजी सकाळी ७ वा. जागतिक योगा दिवस साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमामध्ये जिल्हा अभिवक्ता संघाचे जेष्ठ विधीज्ञ ॲड. एच.आर.जाधव तथा रिटेनर लॉयर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण हे योग प्रशिक्षक होते. त्यांनी योगा मधील विविध आसनाची माहिती दिली. त्यामध्ये समस्थी, उर्ध्व हस्तासन, उत्तानासन, अर्ध उत्तानासन, उत्थिता अश्व संचलासन, चतुरंग दंडासन, उर्ध्वमुख, अधोमुख, उत्थिता अश्व संचलनासन शवासन, मकरासन तसेच अनुलोम, विलोम व कपाळभाती, अशा विविध आसना विषयी माहिती व प्रशिक्षण देवुन त्यांचे उपयोग सांगितले.

# विनोद पावडे यांच्या पुढाकाराने नांदेडकरांना घडले पांडुरंगाच्या पादुकांचे दर्शन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२४ जून -**

पंढरपुर येथे जाऊन पांडुरंगाचे दर्शन घेणे प्रत्येकाला जमत नसल्याने आणि पांडुरंगाच्या पादुकांचे नांदेडमध्येच भावीकभक्तांना दर्शन व्हावे या भक्तीमय भावनेतून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष विनोद पावडे यांच्या पुढाकारातून काल नांदेडमध्ये पांडुरंगाच्या पादुकांची भव्य पालखी काढण्यात आली.

जेष्ठ ऊद्योजक निळकंठराव पावडे, सिंधुताई पावडे ,पोलीस ऊप अधिक्षक सुशिलकुमार नायक , प्रसिद्ध नाटककार संकर्षण कऱ्हाडे ,वंदनाताई गुप्ते,संध्याताई सरणाईक ,वैशाली ताई देशमुख, पुणे येथील प्रसिद्ध उद्योजक कैलास जाधव , विशाल पावडे, विमलेश्वर वारकरी संस्थेचे शिवाजी महाराज,



ज्यांनी या कार्यक्रमाचं देखन आयोजन केलं ते महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष तथा वेलिंग्टन स्कुलचे अध्यक्ष विनोद पावडे , मुख्याध्यापक चलपतीराव सर,पत्रकार श्रिनीवास भोसले, सतिश शिरसाट सर,यश पावडे ,जय पावडे, स्वराज देशमुख,पृथ्विराज देशमुख ,काशिनाथ भोंग,,संदीप भायकाटे, सोपान कदम,सोपान नवघरे,किरण डोंगरे,शिल्पाताई भोसले,पुनम बोकारे,ई उपस्थित होते.

दरवर्षी वारकरी पांडुरंगाच्या दर्शनासाठी पंढरपूर येथे जात असतात. तब्बल एक महिना पायी वारी करून आपल्या विठुरायाच्या चरणावर डोकं ठेवून विश्वाच्या सुखाची प्रार्थना केली जाते. त्यामुळे महाराष्ट्राच्या आणि देशाच्या सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरेतही पंढरपूरच्या वारीला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. ही बाब लक्षात घेता नांदेड मधील भाविक भक्तांना नांदेडमध्येच पंढरपूरच्या पांडुरंगाच्या पादुकांचे दर्शन व्हावे या उदात्त हेतूने मनसेचे जिल्हाध्यक्ष विनोद पावडे यांनी काल नांदेडमध्ये पायीवारी दिंडीचे आयोजन केले आले होते. दुपारी चार वाजता महात्मा फुले पुतळ्यासमोरून या दिंडीला सुरुवात करण्यात आली पाडुरंगाच्या पादुकांचे आणि पालखीचे पुजन ज्येष्ठ उद्योजक निळकंठराव पावडे, सिंधुताई पावडे , पोलीस उपाधीक्षक सुशील कुमार नायक, प्रसिद्ध नाटककार संकर्षण कऱ्हाडे , ज्येष्ठ अभिनेत्री वंदनाताई गुप्ते आदींच्या हस्ते पूजन करण्यात आले . कुसुम सभागृहापर्यंत काढण्यात आलेल्या पायी वारी दिंडीमध्ये वेलिंग्टन इंग्लिश स्कूल , लिटल स्कॉलर इंग्लिश स्कूल , केंब्रिज विद्यालय यासह नांदेड शहरातील विविध शाळेतील विद्यार्थी आणि वारकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सायंकाळी कुटुंब कीर्तन या कौटुंबिक नाटकाचेही विनोद पावडे यांच्या पुढाकाराने आयोजन करण्यात आले होते. नांदेड शहरातील शेकडो विद्यार्थी आणि नागरिकांनी या नाटकाचा आनंद लुटला.

# मुक्त विद्यापीठाच्या अभ्यासक्रम समितीवर धनंजय तांबेकर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२४ जून -**

गोदावरी अर्बन मल्टिस्टेटचे व्यवस्थापकीय संचालक, राज्य पतसंस्था फेडरेशनचे संचालक, तसेच सहकार क्षेत्रातील प्रख्यात तज्ज्ञ धनंजय तांबेकर यांची नाशिक येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या 'पतसंस्था व्यवस्थापन पदविका' अभ्यासक्रम समितीवर निवड झाली आहे. एक विषयतज्ज्ञ म्हणून त्यांच्या अनुभवाचा फायदा आता राज्यभरातील हजारो विद्यार्थ्यांना होणार आहे.



धनंजय तांबेकर हे सहकार क्षेत्रातील तज्ज्ञ म्हणून सुपरिचीत आहेत. त्यांनी ज्या ज्या संस्थांमध्ये कार्य केले त्या संस्था नावारूपास आल्या आहेत. सहकार क्षेत्रातील तज्ज्ञ म्हणून त्यांनी देशविदेशातील अनेक सेमीनारमध्ये मार्गदर्शन केले आहे. नाशिक येथीलमुक्त विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेतर्फे 'डिप्लोमा इन क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी मॅनेजमेंट'हा नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यात येत आहे. याच अभ्यासक्रमाचा विषयनिहाय अभ्यासक्रम (ryllabru) तयार करण्यासाठी एका तज्ज्ञ सल्लागार समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समितीमध्ये 'सहकारी पतसंस्थांचे व्यवस्थापन' या विषयासाठी धनंजय तांबेकर यांची विषयतज्ज्ञ म्हणून नियुक्ती करण्यात आली. या विषयाच्या समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ. रवींद्र भोसले काम पाहणार आहेत. सहकार क्षेत्रातील तांबेकर यांचे महत्त्वपूर्ण योगदान आणि ज्ञानाचा उपयोग विद्यार्थ्यांना व्हावा, या उद्देशाने ही निवड केल्याचे विद्यापीठाने पत्रात नमूद केले आहे. यासंदर्भातील बैठक २७ मे रोजी विद्यापीठाच्या मुख्यालयात नाशिक येथे पार पडली.

# शेतकऱ्यांना आर्थिक मदत उपलब्ध करून द्या: खा. रवींद्र चव्हाण

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२४ जून -**

जून महिना संपत आला तरी अद्याप पावसाने म्हणावी तशी दमदार हजेरी लावलेली नाही. त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील शेतकरी हवालदिल झाला असून दुबार पेरणीसाठी शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक सहाय्य मिळवून द्यावे अशी मागणी खासदार रवींद्र वसंतराव चव्हाण यांनी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

मागील पंधरा दिवसांपासून पाऊसाने दडी मारली असल्यामुळे शेतामध्ये पेरणी केलेले सर्वच बियाणे वाया जाण्याची शक्यता वाढली आहे. पावसाअभावी दुबार पेरणीचे मोठे संकट निर्माण झाले असून त्याचा आर्थीक भुर्दंड शेतकऱ्यांवर पडणार आहे. मध्यम व लहान शेतकरी कुटूंबांना दुबार पेरणीसाठी सद्यस्थितीमध्ये आर्थिक भार उचलणे परवडणारे नाही, त्यामुळे शासनाच्यावतीने शेतकऱ्यांना दुबार पेरणीसाठी बी-बियाणे व त्यासाठी लागणारे खते व औषधी खरेदी करण्यासाठी आर्थिक सहाय्य मंजूर करण्यात यावे असे निवेदनात नमुद केले आहे.

# असंख्य महिला,युवक तसेच मुस्लिम बांधवांचा भाजपात प्रवेश



**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि.२४ जून -**

देशाच्या आर्थिक क्षेत्रात घेतलेली गरुड झेप व ११ वर्षाच्या सुशासन काळच्या निमित्ताने हदगावात बुद्धजीवी यांची संवाद बैठक भाजपा उत्तर जिल्हा अध्यक्ष ऍड. किशोर देशमुख यांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला होता. यावेळी हदगाव शहरातील आबादी येथील असंख्य महिला व युवकांनी जाहीररित्या भाजपा पक्षात प्रवेश घेतला होता त्यानंतर शहरातील मुस्लिम बांधवांनी माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभा खा.अशोकराव चव्हाण व जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपा पक्षात जाहीर प्रवेश घेतला त्यामुळे येणारी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत चुरस निर्माण होणार यात मात्र शंका नसून भाजपाने सध्या तरी आघाडी घेतल्याचे चित्र दिसत आहे.

आगामी होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हदगावात भाजपाने जोरदार मुसंडी मारत प्रत्येक वार्डात पक्ष संघटन मजबूत करण्यावर जोर धरला असून त्याचाच एक भाग म्हणून हदगाव शहरातील आबादी येथील असंख्य महिला व युवकांनी भाजपात प्रवेश घेतला विशेष म्हणजे या भागात काँग्रेसचा प्रबल्य असून या ठिकाणी भाजपाने सुरुंग लावत जोरदार मुसंडी मारली आहे. दुसरीकडे मुस्लिम बांधवांना एकाच पक्षाची राखीव मतदान आहे असा आरोप नेहमीच होत असतो त्यास बगल देण्याचा काम हदगाव शहरातील मुस्लिम बांधवांनी केला असून भाजपाने कधीच कोणत्याही योजनेत कधीच जाती- पातीचा ऊहापोह न करता सरसकट समाजातील प्रत्येक घटकांपर्यंत व गरजू नागरिकांपर्यंत योजनेचा लाभ दिला यामुळेच हदगाव शहरातील मुस्लिम समाजातील बांधवांनी या बाबीकडे आकर्षित होऊन काँग्रेस पक्षास कंटाळून भाजपात मोठ्या संख्येने प्रवेश घेतला तर येणाऱ्या काही दिवसात हदगाव शहरातील प्रत्येक वार्डात भाजपा पक्षात मोठ्या प्रमाणावर पक्षप्रवेश सोहळे होतील व त्याचा फायदा येणाऱ्या निवडणुकीत भाजपा पक्षास होईल असा ठाम विश्वास भाजपा तालुकाध्यक्ष बाळा पाटील यांनी व्यक्त केला.

# शिवसेनेच्या वतीने शेतकऱ्यांच्या कर्ज मंजुरीसाठी निवेदन



**तभा वृतसेवा**
**किनवट, दि.२४ जून -**

शिवसेना (उ.बा.ठा.) च्या वतीने स्टेट बँक ऑफ इंडिया, किनवट शाखेचे व्यवस्थापक उदय सुरेश कुलकर्णी यांना निवेदन देऊन शेतकऱ्यांच्या पीक कर्जाला तात्काळ मंजुरी द्यावी आणि त्यांच्या खात्यावर होल्ड लावू नये, अशी मागणी करण्यात आली. हे निवेदन तालुकाप्रमुख मारुती दिवसे पाटील यांच्या नेतृत्वाखाली सादर करण्यात आले.

नैसर्गिक संकटांना तोंड देत असलेल्या शेतकऱ्यांना राष्ट्रीयकृत बँकांकडून पीक कर्ज मंजुरीसाठी टाळाटाळ केली जात आहे. शिवाय, शासनाकडून अनुदानाची रक्कम जमा झालेल्या शेतकऱ्यांच्या खात्यांवर होल्ड लावून त्यांचा आर्थिक छळ केला जात असल्याचे निदर्शनास आले. या पार्श्वभूमीवर, शिवसेना उपनेते व विरोधी पक्षनेते अंबादास दानवे आणि संपर्कप्रमुख बबनराव थोरात यांनी पुढाकार घेतला असून, त्यांच्या सूचनेनुसार राज्यातील राष्ट्रीयकृत बँकांना निवेदने देऊन शेतकऱ्यांच्या कर्ज मंजुरीसाठी पाठपुरावा सुरू करण्यात आला आहे.

निवेदनावर तालुका प्रमुख मारुती दिवसे पाटील, शहर प्रमुख प्रशांत कोरडे, युवा सेना तालुकाप्रमुख अतुल दर्शनवाड , प्राध्यापक जयवंत चव्हाण, प्रमोद जाधव, किशोर बोलेनवार आणि अमोल सोमवंशी यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. निवेदन सादर करणाऱ्या शिष्टमंडळाशी बोलताना व्यवस्थापक उदय कुलकर्णी यांनी सांगितले की, किनवट शाखेत शेतकऱ्यांच्या खात्यांवर होल्ड लावला जात नाही आणि कर्ज मंजुरी नियमानुसार करण्यात येते.

# झोपेत साप चावल्याने चाळीस वर्षीय इसमाचा मृत्यू

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि.२४ जून -**

नायगाव तालुक्यातील कोपरा गावात एका चाळीस वर्षीय इसमाचा विषारी साप चावल्याने झोपेतच दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. साहेबराव डोईवाड (वय ४०) असे मृत इसमाचे नाव आहे.



साहेबराव डोईवाड हे २३ जून रोजी, सोमवारी नेहमीप्रमाणे रात्री आपल्या घराच्या आवारात जमिनीवर झोपले होते. पहाटेच्या सुमारास त्यांना झोपेत असतानाच विषारी सापाने चावा घेतला. यामुळे त्यांच्या तब्येतीत झपाट्याने बिघाड झाला.कुटुंबीयांनी तत्काळ त्यांना मांजरम येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. त्यानंतर अधिक उपचारासाठी त्यांना नायगाव येथील ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. मात्र प्रकृतीत सुधारणा न झाल्यामुळे त्यांना पुढे मुखेड येथील डॉ. पुंडे यांच्या खासगी रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र सर्व उपचारांनंतरही त्यांचा मृत्यू झाला.

या घटनेची नोंद मुखेड पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. साहेबराव डोईवाड यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, आई-वडील आणि भाऊ असा परिवार आहे.

# शेतकऱ्यांना विनाविलंब व विना शर्त पिक कर्ज मंजूर करा : महेश पाटील

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि.२४ जून -**

सद्यस्थिती पाहता शेतमालाला हमीभाव मिळत नसल्याने तसेच नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांची अवस्था दयनीय झाली असून राज्य शासनाच्या वतीने पीक विम्याचे धरसोडीचे धोरण सुरू आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना पुरेसे प्रमाणात पीक कर्ज मिळण्याची आवश्यकता आहे.

परंतु पिक कर्जासाठी शेतकऱ्यांचे अर्ज आल्यानंतर ही राज्य शासनाचे त्वरित कर्ज मंजूर करण्याचे निर्देश असतानाही शेकडो अर्ज बँकेत प्रलंबित आहे. सदर अर्ज त्वरित निकाली काढण्याचे आवश्यक असताना हे अर्ज



मुख्य शाखा व विभागीय शाखा यांच्याकडे पाठवून शेतकऱ्यांना नाहक त्रास दिला जात आहे. सिबिल व थकबाकी दाखवून अन्य काही तांत्रिक बाबी दाखवून पिक कर्ज नाकारले जात आहे.

या परिस्थितीत शिवसेना - उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने बँकांना जाब विचारण्यासाठी बँकांची शाळा हा आंदोलनात्मक कार्यक्रम राबवत असून शेतकऱ्यांचे पिक कर्ज त्वरित मंजूर करावे. कोणतेही तांत्रिक कारण दाखवून पिक कर्ज नाकारू नये, . शेतकऱ्यांना नाहक त्रास दिला तर शिवसेना - उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आपल्या विरोधात तीव्र आंदोलन करण्याचा इशारा निवेदनाद्वारे देऊन देगलूर येथील इंडिया बँकेसमोर निदर्शने करण्यात आली यावेळी शिवसेना सहसंपर्कप्रमुख दयाल गिरी, उपजिल्हाप्रमुख महेश पाटील, तालुका प्रमुख बालाजी पाटील इंगळे खुतमापुरकर, मतदारसंघ संघटक राजेंद्र इंगळे खानापूरकर, मतदारसंघ प्रमुख पांडुरंग पाटील थडके देगावकर, शहर प्रमुख संजय अण्णा जोशी, शहर संघटक भगवान जाधव, उपशहरप्रमुख मण्णाजी पैलावार उपशहरप्रमुख बाबुराव मिनकीकर, युवा सेना तालुका समन्वयक तथा शिवसेना सोशल मीडिया तालुका प्रमुख भागवत पाटील सोमुरकर, अल्पसंख्याक सेना तालुका प्रमुख युसुफभाई मिस्त्री, अल्पसंख्याक सेना शहर प्रमुख सय्यद हनुमिया मिरभाई, शिवसेना शहर समन्वयक विनोद सोनकांबळे, युवा सेना उपशहरप्रमुख गणेश चप्पलवार, युवा सेना उपशहरप्रमुख संदीप शिंदे, सर्कल प्रमुख सुभाष खुनेवाड, सर्कल प्रमुख शंकर जाधव हाळीकर आदी प्रमुख पदाधिकारी सह शेकडो शिवसैनिक, शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# शहरातील समस्यांवर आ.क्षीरसागरांनी घेतली जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक

## भुयारी गटार, नगर रोडचे डिव्हायडर, नळ कनेक्शन बाबत झाली चर्चा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२४ जून**

बीड शहरातील अनेक महत्त्वाच्या समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी सोमवारी (दि.२३) रोजी आ.संदीप क्षीरसागर यांनी जिल्हाधिकार यांच्या दालनात बैठक घेतली. या बैठकीत बीड शहरातील भुयारी गटार योजना, नगर रोडवर जिल्हा न्यायालय आणि जिल्हाधिकारी कार्यालयात जाण्यासाठी दुभाजक खुला करणे, नवीन अटल अमृत योजनेचे नळ कनेक्शन तसेच शहरात सुरू असलेली स्वच्छता मोहीम या महत्वपूर्ण विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.




बीड शहरात भुयारी गटार योजना अर्धवट अवस्थेत बंद पडली आहे. ही बंद पडलेली कामे तातडीने पुनरुज्जिवीत करण्याची मागणी यावेळी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली. तसेच नगर रोडवरील जिल्हाधिकारी कार्यालय आणि न्यायालयात जाण्यासाठी नागरिकांना रस्ता दुभाजक खुला करण्याची गरज व्यक्त केली. यामुळे नागरिकांना होणारा त्रास कमी होईल, असे मत आ. क्षीरसागर यांनी मांडले.याशिवाय, अमृत अटल जल योजनेंतर्गत नव्याने सुरू करण्यात आलेल्या पाण्याच्या टाकीचे अनेक नागरिकांना अद्याप कनेक्शन मिळालेले नाहीत. ही कनेक्शन तातडीने उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने त्वरित कार्यवाही करावी, अशी सूचना बैठकीत करण्यात आली. यासोबतच, बीड शहरात सुरू असलेल्या स्वच्छता मोहिमेला प्रशासनाकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याची खंत व्यक्त करत, यंत्रणांनी अधिक सक्रियपणे काम करण्याचे आवाहन आ. क्षीरसागर यांनी केले.

दरम्यान जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सर्व मुद्द्यांची गांभीर्याने दखल घेत संबंधित विभागांना तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. या बैठकीस माजी आ.सय्यद सलीम यांच्यासह बीड नगरपरिषद, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि इतर संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# अंबाजोगाई न्यायालयात योग दिन साजरा, त्या निमित्त न्यायालय परिसरात वृक्षारोपण



**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२४ जून**

जिल्हा व सत्र न्यायालय तसेच दिवाणी न्यायालय,तालुका विधी सेवा समिती, अंबाजोगाई व वकिल संघ, अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २१.०६ २०२५ रोजी सकाळी ०७.१५ ते ०७ ५० या वेळेत जिल्हा न्यायालय, अंबाजोगाई न्यायालयावे प्रांगणात जागतिक योग दिवस साजरा करण्यात आला.सदर योग्य शिबिर मध्ये वकील संघाच्या सदस्या ऍड.प्रिया सुनील आगळे व योग शिक्षिका मीरा विश्वास असबे यांनी मार्गदर्शन करून योग करून घेतला.त्यानंतर दिवाणी न्यायालयाचे आवारात मा. न्यायाधीश, वकील संघाचे पदाधिकारी, न्यायालयीन कर्मचारी यांचे हसे १५ वृक्ष लावून वृक्षारोपण करण्यात आले.सदरील कार्यक्रमास मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री.अजित कुमार भस्मे, दिवाणी न्यायाधीश व.स्तर मा. कालिदास सूर्यवंशी, मा. भानुप्रताप चौहान, मा.महावीर सोनटक्के, मा. सतिशकुमार गणपा, दिवाणी न्यायाधीश .स्तर मा. प्रभाकर सगडे,मा. प्रियंका लिगडे, मा. अश्विनी ढवळे तसेच वकील संघाचे अध्यक्ष ऍड.अजित लोमटे, उपाध्यक्ष ऍड.दिलीप गोरे,सहसचिव ऍड.बळीराम पुरी, तसेच सर्व न्यायालयीन कर्मचारी,वकील संघाचे सदस्य तसेंच सिद्धेश्वर स्वामी हे उपस्थित होते.

# आदर्श मार्केट व्यापारी संघटनेच्यावतीने श्री संत मुक्ताई पालखी सोहळ्याचे जल्लोषात स्वागत

## स्वागताची १९ वर्षाची परंपरा; पालखी सोहळा प्रमुख हरणे महाराज व मान्यवरांचा संघटनेच्यावतीने सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२४ जून**

श्रीक्षेत्र मुक्ताई नगर येथून पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान ठेवलेल्या श्री संत मुक्ताई यांच्या पालखी सोहळ्याचे रविवार दि.२२ जून रोजी बीड शहरात आगमन झाले. यावेळी सुभाष रोड येथील आदर्श मार्केट व्यापारी संघटनेच्यावतीने या पालखी सोहळ्याचे ढोल-ताशा, फटाक्याची आतिषबाजी आणि वारकर्यांना आल्पोपहार देवून बीड शहर व्यापारी महासंघाचे अध्यक्ष तथा आदर्श मार्केट व्यापारी संघटनेच्यावतीने व अध्यक्ष प्रकाशराव कानगांवकर यांनी भव्यदिव्य स्वागत केले. श्री संत मुक्ताई यांच्या पालखीची महाआरती झाल्यानंतर पालखी सोहळा प्रमुख हरणे महाराज, सुधाकर महाराज, आचार्य अमृताश्रम महाराज व मान्यवरांचा संघटनेच्यावतीने सत्कार करण्यात आला.

श्री संत मुक्ताई यांची पालखी गत ३१६ वे वर्षापासून पंढरपूरकडे प्रस्थान ठेवते. गेल्या अनेक वर्षी पासून श्री संत मुक्ताईंची पालखी ही शहरात मुक्कामी असते. आज रविवार दि.२२ जून रोजी पालखी सोहळ्यातील वारकर्यांचे बीड शहरात आगमन झाले असता सुभाष रोडवरील आदर्श मार्केट व्यापारी संघटनेच्यावतीने भव्य दिव्य स्वागत केले. साठे चौक ते माळीवेस चौका पर्यंत मनमोहक रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या. दरवर्षी प्रमाणे आदर्श मार्केट व्यापारी संघटनेकडून वारकर्यांना आल्पोपहार दिला गेला. त्यानंतर पालखी सोहळा प्रमुख ह.भ.प.हरणे महाराज व सुधाकर महाराज, रविंद्र पाटील, आचार्य अमृताश्रम महाराज, डॉ.सारिकाताई क्षीरसागर, शहर पोलीस ठाण्याचे पी.एस.आय. कुमावत, पी.एस.आय.जाधव, पीएसआय वाळके, सानप, संपादक दिलीप खिस्ती, संपादक सुनील क्षीरसागर, व्यापारी महासंघाचे कार्याध्यक्ष अशोकराव शेटे, सचिव तुकाराम साळुंके, पत्रकार अनिल भंडारी, प्रा.लक्ष्मीकांत बाहेव्हाणकर, दिनेश लिंबेकर, सुशील देशमुख, ॲड.संदीप बेदरे, मंगेश निटुरकर, प्रमोद जोशी, आनंद डोंगरे, आत्माराम वाव्हळ, कृष्णा शिंदे, यांचा शाल, श्रीफळ, पुष्पहार घालून आदर्श मार्केट व्यापारी संघटनेच्यावतीने सत्कार करण्यात आला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते श्री संत मुक्ताईंच्या पादुकांची महाआरती करण्यात आली.

यावेळी आदर्श मार्केट व्यापारी संघटनेचे अध्यक्ष प्रकाशराव कानगांवकर, सचिव सुदाम चव्हाण, उपाध्यक्ष महेबुब शेख, गणेश मुळे, महेंद्र दुगड, हनुमान पाचंग्रे, दगडु म्हेत्रे, डॉ. रमेश कैवाडे, राजु ताठे, राजेश कानगावकर, विशाल मानकुस, आप्पा औताडे, अरुण देवधरे, मच्छिंद्र उपरे, मंगेश काळे, देविदास नेरे, ओंकार उपरे, शुभम पाखरे, अमोल पतंगे, देवीदास मसुरे, निलेश पतंगे, राम शिंदे, विनायक पतंगे, दत्ता जगताप, शिवाजी शिंदे, ज्ञानेश्वर चव्हाण, हेंद्रे मामा, बाहेकर, दिपक पतंगे, मनोज पतंगे, गणेश उपरे, राहुल शिंदे, गणेश राऊत, ज्ञानेश्वर पंधारे, विनायक दुबाले, किरण वाघमारे, नारायण मानकुस, निलेश पतंगे, दत्ता उबे, बंटी कानगावकर, गणेश सुत्रे, देविदास मसुरे, लाला कानगावकर, आप्पा नरे, देविदास नेरे, दिपक घाडगे, अक्षय कानगावकर, कैलास उपरे, हरीभाऊ, सोमेश्वर कानगावकर, बप्पा घुगे, विनोद फटाले, राम मानकुस, गणेश राठोड, रवि वाघमारे, योगेश कानाडे, शुभम उपरे, सुग्रीव चव्हाण, यांच्यासह आदर्श मार्केट व्यापारी संघटनेचे सर्व पदाधिकारी, व्यापार्यांची उपस्थिती होती. सर्व व्यापारी बांधवांनी अल्पोपहार देवून वारकर्यांची सेवा करण्यासाठी बहुमोल परिश्रम घेतले.

# जिल्हा रुग्णालयातील तक्रारींसाठी बारकोड सिस्टीम चालू करावी-कदम

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२४ जून**

जिल्हा रुग्णालयात जिल्हाभरातून गरजवंत गोर-गरीब नागरिक उपचारासाठी येतात परंतू त्यांची या ना त्या कारणाने सतत हेळसांड होते त्यामुळे बहुतांश रुग्णांना योग्य तो उपचार मिळत नाही तसेच इमर्जन्सी वॉर्ड मध्ये कोणते डॉक्टर्स सेवेत आहेत त्या डॉक्टरांची नावे चौकशी कक्षाच्या बाहेर ठळक अक्षरात लावण्यात यावेत व त्याचबरोबर रुग्णालयाच्या साफसफाईची सुद्धा दखल घेण्यात यावी साफसफाई कर्मचार्यांना ड्रेस कोड,आयडेंटी कार्ड आणि सोबतच डॉक्टर्स नर्स-ब्रदर्स यांना बंधनकारक करण्यात यावेत अशी मागणी मनसेचे जिल्हासचिव सोमेश कदम आणि ऋषीकेश गिराम यांनी निवेदनाद्वारे जिल्हा शल्यचिकित्सक यांच्याकडे केली आहे.



पुढे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, बीडच्या पोलीस अधिक्षकांनी ज्या पद्धतीने बारकोड ची सिस्टीम चालू केली आहे त्याच पद्धतीने जिल्हा शल्य चिकित्सक संजय राऊत यांनी बारकोड सिस्टीम चालू करावी. कारण की प्रत्येक रुग्ण किंवा त्यांचे नातेवाईक सरकारी दवाखान्यातील तक्रारी नेमक्या करायचा कुणाकडे या संभ्रमात असतात तसेच प्रत्येक जण शल्य चिकित्सकांकडे जाऊ शकत नाही किंवा तक्रारी मांडू शकत नाही किंवा अधिकार्यांना त्यावेळेस वेळ मिळत नाही त्यामुळे रुग्णांच्या किंवा रुग्णांच्या नातेवाईक यांना बारकोड सिस्टीम अत्यंत उपयोगी पडेल डॉक्टर आणि रुग्ण यांच्यासाठी सोयीस्कर होईल.

तसेच मागील काही महिन्यांपासून बीडचा जिल्हा रुग्णालयात या सर्व अटींचे उल्लंघन करत डॉक्टर मनमानी करताना दिसत आहेत याचे रुग्णांवर झालेले परिणाम सर्व वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित सुद्धा झालेले आहे डॉक्टर वेळेवर उपलब्ध नसल्याने व वेळेवर रुग्णांना उपचार न मिळाल्यामुळे शेकडो रुग्णांना आपला प्राण गमवावा लागला तसेच तात्काळ उपचाराची गरज असताना डॉक्टर स्वतःची खाजगी दवाखान्यातील प्रॅक्टिस करण्यात व्यस्त असतात फोन न उचलणे फोन बंद करून ठेवणे शिकवू डॉक्टरांना रुग्णांची तपासणी करायला सांगून टाळाटाळ करणे बाहेरगावी आहे असं सांगणे रजेवर आहे असे सांगणे या अशा डॉक्टरांना निलंबित करून कायमचे त्यांच्या खाजगी दवाखान्यात बसवण्याची मागणी मनसेकडून करण्यात आली आहे आणि इमर्जन्सी वॉर्ड मध्ये कोणते डॉक्टर्स सेवेत आहेत त्या डॉक्टरांची नावे चौकशी कक्षाच्या बाहेर ठळक अक्षरात लावण्यात यावेत व त्याचबरोबर रुग्णालयाच्या साफसफाईची सुद्धा दखल घेण्यात यावी साफसफाई कर्मचार्यांना ड्रेस कोड आयडेंटी कार्ड आणि सोबतच डॉक्टर्स-नर्स-ब्रदर्स यांना देखील ड्रेस कोड व आयडेंटी कार्ड हे कंपल्सरी करण्यात यावेत जेणेकरून दलाली करणार्या लोकांकडे लक्ष ठेवण्यास सोपे जाईल असे निवेदनात म्हटले आहे या बाबींची दखल घेवून निश्चितपणे लवकरात लवकर चौकशी करून व रुग्णांसाठी डॉक्टरांसाठी सोयीस्कर असलेल्या गोष्टींचा विचार करून त्या अमलात आणण्याचा नक्कीच प्रयत्न करू असे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक यांनी दिले आहे.

# सुंदरराव सोळंके महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा




**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२४ जून**

सुंदरराव सोळुंके महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

या शिबिराचे उद्घाटन म.शि.प्र. मंडळाच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य विजयकुमार सोळंके यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. के. सानप, उपप्राचार्य डॉ. एम. ए. कव्हळे, कार्यक्रमाधिकारी डॉ. बिलास काळे,प्रा. ओमप्रकाश सारगे, प्रा.उमेश राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्राचार्य डॉ. जी. के. सानप यांनी दैनंदिन जीवनात योगाचे महत्व सांगून शारीरिक व मानसिक स्वास्थ्यासाठी योग करणे गरजेचे असल्याचे सांगितले. शिबिरामध्ये आर्ट ऑफ लिविंग या संस्थेचे योग प्रशिक्षक नंदकुमार शिंदे, श्रीकृष्ण शेजुळ, आगे सर यांनी याप्रसंगी योगाभ्यास तसेच विविध आसने करून घेण्याबरोबरच त्यांचे महत्त्व समजावून उपस्थितांना प्रशिक्षण देऊन मार्गदर्शन केले. शिबिरास राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भारतीय बौद्ध महासभेच्या शहराध्यक्षपदी मायाताई स्वामी तर सरचिटणीसपदी शारदाताई टाकणखार यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२४ जून**

भारतीय बौद्ध महासभा जिल्हा शाखा बीड पुर्व च्या वतीन माजलगाव शहर शाखेच्या बैठकिचे आयोजन सांची बुद्ध विहार डॉ आंबेडकर भवन केसापुरी कॅम्प येथे जिल्हा बीड पुर्वच्या अध्यक्षा कमलताई डोंगरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. त्यामध्ये भारतीय बौद्ध महासभेच्या





शहराध्यक्ष म्हणुन मायाताई स्वामी यांची तर सरचिटणीसपदी शारदाताई टाकणखार यांची निवड करण्यात आली. तालुका संरक्षण उपाध्यक्ष म्हणुन रेखाताई भारस्कर तर संरक्षण सचिवपदी आशाताई जावळे,सुनिताई टाकणखार यांची निवड करण्यात आली. बैठकिसाठी जिल्हा संस्कार उपाध्यक्ष एस. बी. मोरे ,लिलाताई उजगरे ,शामभाऊ वाघमारे,आशा ताई मोरे, व्ही. साळवे, एन बी राजभोज , शारदाताई तांगडे , महिला तालुका अध्यक्षा मंदाताई साळवे, कोमलताई डोंगरे, साळवे यांच्या सह शहरातील धम्म उपासिका उपस्तीत होत्या या ठिकाणी मान्यवरांकडुन नुतन कार्यकारणीस शुभेच्छा दिल्या व या निवडी मुळे शहरातील धम्म चळवळ गतीमान होईल आसी आशा व्यक्त करण्यात आली.

# मराठवाडा साहित्य परिषद,केजच्या वतीने पद्मश्री कै.मारुती चितमपल्ली यांना श्रद्धांजली



**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२४ जून**

वृक्ष वल्ली आम्हा सोयरी..म्हणत संत महंतांनी वृक्ष व वनराई चे महत्त्व खूप पूर्वीपासून सांगितलेले आहे.अधुनिक काळात आपल्या नौकरी व्यावसाया बरोबरच आपला छंद व आवड जोपासत वन्य जीव व आरण्यांचा अभ्यास करून लिखाण करणारे पद्मश्री कै.मारुती चितमपल्ली यांना त्यांच्या कार्यामुळे आयुष्यात अनेक पुरस्कार मिळाले.

आरण्य ऋषी म्हणून प्रसिद्ध असलेले मारूती चितमपल्ली यांचे दि.१८ जून २०२५ रोजी वृध्दापकाळाने देहावसान झालेले आहे.

मराठवाडा साहित्य परिषद, शाखा, केज यांच्या वतीने पद्मश्री कै.मारूती चितमपल्ली यांच्या श्रद्धांजली कार्यक्रमाचे शासकीय विश्रामगृह, केज येथे दि.२३ जून २०२५ सोमवार रोजी आयोजन करण्यात आले होते.अरण्यऋषी,वन्यजीव अभ्यासक, ललित लेखक,निसर्ग व वन्यजीव संवर्धन,साहित्यिक पद्मश्री कै.मारुती चितमपल्ली यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकून त्यांच्या जीवन कार्याचा गौरव करून त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.या प्रसंगी मराठवाडा साहित्य परिषद शाखा,केजचे संस्थापक अध्यक्ष प्रा. ईश्वर मुंडे , मराठवाडा साहित्य परिषद,शाखा,केज चे नवनियुक्त अध्यक्ष प्रा. डॉ. नवनाथ काशिद, संस्थापक कार्याध्यक्ष प्रा. हनुमंत भोसले, आश्रूबा सोनवणे,प्रा.डॉ.सुवर्णकार व प्रा. सुरज यांनी पद्मश्री कै.मारुती चितमपल्ली यांच्या प्रतिमेस पुष्पहार आर्पण करून त्यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकून त्यांना शब्द सुमनांनी श्रद्धांजली अर्पण केली.

या वेळी पद्मश्री कै. मारूती चितमपल्ली यांच्या जीवन कार्यावर शालेय विद्यार्थ्यांची तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्याचे ठरले आहे. या कार्यक्रमासाठी मराठवाडा साहित्य परिषद ,शाखा,केज चे पदाधिकारी व सदस्य यांनी उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य केले.

# कीट्टी आडगाव चे सरपंच रुख्मांगद खेत्रे यांच्यावरील गुन्हा मागे घ्यावा - केज तालुका सरपंच परिषदेची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२४ जून**

दोन दिवसापूर्वी माजलगाव तालुक्यातील कीट्टी आडगाव चे सरपंच रुख्मांगद खेत्रे यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने ताब्यात घेतले असून सदरील रक्कम ही सरपंच यांनी सदरील रक्कम ही स्वतःसाठी घेतली नाही तर विहीर मंजुरीसाठी जे अधिकारी पैसे मागतात त्यांना देण्यासाठी घेतली होती यात त्यांचा काहीही दोष नसल्याने त्यांना या गुन्ह्यातून मुक्त करावे अशी मागणी केज तालुका सरपंच परिषदेच्या वतीने तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

याबाबत सविस्तर वृतांत असा की दोन दिवसापूर्वी माजलगाव तालुक्यातील कीट्टी आडगाव चे सरपंच रुख्मांगद खेत्रे यांनी विहीर मंजुरीसाठी लाभार्थी यांचेकडून पैसे घेतल्याचे प्रकरण घडले परंतु हे पैसे सरपंच यांनी स्वतःसाठी घेतले नाहीत तर वरिष्ठ अधिकारी विहीर मंजूर करण्यासाठी २५ ते ३० हजार रु. मागतात मग ही रक्कम सरपंच कोठून देणार सदर लाभार्थी यासाठी ही रक्कम देतात परंतु ही रक्कम सबंधित अधिकारी सरपंच किंवा उपसरपंच किंवा रोजगार सेवक यांच्या माध्यमातून स्वीकारता आणि त्यासाठीच त्यांनी ही रक्कम स्वीकारली यामध्ये वैयक्तिक त्यांची काहीही चूक नसून त्यांना या गुन्ह्यातून मुक्त करण्याची मागणी केज तालुका सरपंच परिषदेच्या वतीने तहसीलदार यांना करण्यात आली आहे. यावेळी तालुक्यातील सर्व सरपंच मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# योगाने मानसिक समाधान मिळायला मदत होते-गिता भाभी पवार



**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२४ जून**

धावपळीच्या जीवनात अनेक प्रश्न निर्माण होतात. त्या प्रश्नांना सामोरे जाण्यासाठी शारिरीक, मानसिकदृष्ट्या सुदृढ असणे आवश्यक आहे. योगाच्या बळावर महिलांचे आरोग्य संतुलित राहते. म्हणून, योग महिलांसाठी काळाची गरज असल्याचे प्रतिपादन जिजामाता योगा ग्रुपच्या संचालिका सौ. गिता भाभी पवार यांनी बोलताना केले. शनिवार ता. २१ रोजी सकाळी पाच ते सात , या वेळेत आयोजित करण्यात आलेल्या जागतिक योगा दिनाच्या निमित्ताने त्या बोलत होत्या.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, २१ जून जागतिक योग दिन म्हणून जगभरात साजरा करण्यात येतो. त्या पार्श्वभूमीवर, जिजामाता योग ग्रुपच्या वतीने गेवराई येथील गजानन मंगल कार्यालयातील भव्य सभागृहात सकाळी पाच ते सात, या वेळेत योग दिन साजरा करण्यात आला. या वेळी, बोलताना सौ. गिता भाभी पवार म्हणाल्या की, धावपळीचे आयुष्य झाले आहे. काळानुरूप बदल झाल्याने, माणसांचे आयुष्य घडाळाच्या काट्यावर पळते आहे. धावपळीत आरोग्याकडे दूर्लक्ष होते.